# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७२ अंक १०-११

जानेवारी – फेब्रुवारी ९३

संपादक
**प्रा. डॉ. लेखा पाठक**

कार्यकारी संपादक
**अरूण ताम्हणकर**

मुखपृष्ठ
हेमंत चोणकर

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

कार्यालय
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई–४०० ०१४.
दूरध्वनी : ४१२२५६१

वार्षिक वर्गणी – रु. ५०/-,
आजीव सभासद वर्गणी – रु. १,०००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी – रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक – रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक प्रा. डॉ. लेखा पाठक, अध्यक्षा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांविषयीची कोणतीही कायदेशीर कारवाई मुंबईच्या न्यायकक्षेतच होऊ शकते, याची कृपया नोंद घ्यावी.

# अकरा हनुमान

(मागील अंकावरून)

श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या वादात सामान्य माणूस गोंधळून जातो. त्याला बुद्धीभ्रम झाल्याचा अनुभव येऊ लागतो.

आपली दैवते, त्यांची रूपे, त्यांचे कार्य आणि त्यांच्या जन्मकथा विचारी माणसाला संभ्रमात टाकणाऱ्या आहेत.

वायुसूत हनुमान अथवा मारूती हे असेच एक दैवत आहे की त्याच्याविषयी अधिक विचार करू लागताच अनेक प्रश्न उभे राहतात.

हनुमान हा वानरयोनी आहे. तरीही तो बुद्धीमताम् वरिष्ठम्, मनोजवम्, मारूततुल्य वेगम् आणि जितेन्द्रीयम्ही आहे. ज्या देशात वानर एवढा महान असू शकतो त्या देशात आज माणसंसुद्धा वानरापेक्षा चंचल आणि भोळसट कशी जन्मु शकतात?

असं नसेल तर आपण समजतोय तो 'वानरयुत मुख्यम्' हनुमान वेगळा असला पाहिजे. वाढता वाढता शुन्यमंडळालाही भेदणारा हा हनुमान समजून घेण्यात आपण कुठेतरी चुकलो आहोत. जड पातळीवरील हनुमान व सुक्ष्मातील हनुमान यांच्यातील सांधा शास्त्रार्थींच्या अभावी तुटल्यामुळे दैवते समजुन घेताना वैचारिक प्रदुषण निर्माण झाले आहे. या प्रदुषणातूनच श्रद्धा–अंधश्रद्धा–भक्ति असे भावुक शब्द जन्माला येऊन अवधान सुटले आहे. हे अवधान परत आणायचे असेल तर या वैचारिक प्रदुषणापासून दूर जाऊन समजाऊन घेण्याचा समजुतदारपणा वाढविला पाहीजे.

असाच समजुतदारपणा वाढवित असताना पंडित ग. रा. सावंतांना हनुमान कसा जाणवला ते पहा....

– कार्यकारी संपादक

## विराट् मारुति
## ब्रह्मांडदृष्टि

बृहद्धनुर्बृहत्पादो बृहन्मूर्धा बृहत्स्वनः।
बृहयोगी बृहन्नासो बृहब्दाहुर्बृहत्तनुः॥
बृहद्यत्नो बृहत्कार्यो
बृहत्पुच्छो बृहत्करः।
बृहब्दतिर्बृहत्सेव्या बृहल्लोक गतिप्रदाः॥
बृहच्छक्तिर्बृहज्छाफलदो बृहदीश्वरः।
बृहल्लोकनुतोद्रष्टा विद्यादाता जगद्गुरुः॥
सहस्त्रमूर्धा सहस्त्रास्थ
सहस्त्राक्ष सहस्त्रपात्॥

हे हनुमंता! तुझे कित्येक मूर्तिपूजक तुझ्या मूर्तीचे ध्यान करीत करीत मनोलयरूप समाधि साधीत असतील. पण हा अनुभव सर्वांस घेतां येतो असें नाहीं. चित्ताच्या चांचल्यादि असंख्य अवगुणांमुळें तें एकाग्र करणें पुष्कळांस दुष्कर वाटतें. तसेंच, ज्यांच्या मनास ध्यानापेक्षां विचाराची जास्त आवड आहे, अशांस तुझ्या रूढ असलेल्या मूर्तिपूजेचा पुरा लाभ घेता येत नाहीं. त्यांच्या गरजेला तुझी देवळांतील मूर्ति हें विचारावलंबन अपुरें पडतें. ते तुझ्या तात्त्विक किंवा विराट् रूपाचें चिंतन करूं पाहतात. तें चिन्तन निरालंब घडत नाहीं व तुझी देवळांतील मूर्ति हे आलंबनहि त्यांस फारसे उपयोगी पडत नाहीं.

देवकीच्या बंदिवासांत भगवंताची भव्य चतुर्भुजधारी मूर्ति प्रगट झाली, तेव्हां ती म्हणाली कीं, मला हे रूप नको; तूं लहान हो. यशोदेच्याहि वात्सल्यप्रेमास लहानग्या बाळकृष्णाची आवड होती. पण राधेनें त्या मनमोहनास घरीं एकांती नेऊन, 'तूं मजहून मोठा हो – माझा नाथ हो' – अशी आवड धरली! चंद्रहासाची ध्यानधारणा तर

(पृष्ठ क्र. १० वर)

॥ नित्य मी जिवंत, जाणा हेंचि सत्य ॥
नित्य घ्या प्रचीत अनुभवें ॥

# साईकृपा

॥ शरण मज आला, आणि वायां गेला ॥
दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥

वर्ष ७१ अंक १०-११ • श्री साईंच्या कृपाप्रसादाचे वार्तापत्र • जानेवारी-फेब्रुवारी, १९९३

## डोक्यावर पडणाऱ्या पुलाच्या स्लॅबपासून साईनाथांनी वाचविले !



(कु. निरूपमा मोरजे, जोगेश्वरी (पू.), मुंबई यांच्याकडून):

**ज्या** ज्या भक्तांनी बाबांना आर्ततेनं आळवलं त्यांची आपत्ती दूर झाली. अशाच एका संकटमय प्रसंगी आकाशातून येणाऱ्या सरीप्रमाणे बाबांनी धाव घेतली व आमची त्यातून मुक्तता केली, त्याचे हे वर्णन :

दिनांक २८ सप्टेंबर, १९९२. स्थान जोगेश्वरी रेल्वेस्थानक. रात्रीचे ठीक ८-१५ वाजले होते. मुंबईत सर्वत्र मुसळधार पाऊस कोसळत होता. वाऱ्या-पावसाचा पाठशिवणीचा खेळ चालू होता. विजा कडाडत होत्या. ह्या सर्वांचा मेळ म्हणजे संकटाची चाहूलच होती. या वादळी पावसात बचावाचा पवित्रा घेऊन प्रत्येकजण घरकुलाप्रमाणे जोगेश्वरी स्थानकातील मधल्या पुलावर उभा होता. त्यात माझी दोन नंबरची बहीण मनिषा हीसुद्धा आडोश्यासाठी मध्येच (फाटक ३ व ४) उभी होती. त्याचवेळी "साई तारी त्याला कोण मारी" या उक्तीनुसार तिची एक मैत्रीण पुढे आली आणि तिला म्हणाली, "मनिषा, पाऊस कमी झाला आहे. चल ! आपण जाऊ या !" ती पुढे निघाली आणि माझी बहीण तिच्या पाठोपाठ चालू लागली; आणि इतक्यात पुलाचा स्लॅब कोसळला ! पुलावर उभे असलेले प्रवासी रेल्वेरूळावर कोसळले. रेल्वेची ओव्हरहेड वायर तुटल्याने जोगेश्वरी रेल्वेस्थानक पूर्णपणे अंधारात बुडाले. त्यात माझी बहीण तिला काही कळण्याआधीच एकदाच "साई" म्हणून किंचाळली आणि आश्चर्य ! माणूस सहज जसा खाली उतरतो त्याप्रमाणे ती २० ते २५ फूट उंच अंतरावरून खाली पडून उभी राहिली. त्यानंतर ती रूळावर पडणार आणि तिला दगडाचा मार लागणार त्याआधीच साईंनी तिला आधार दिला. ती एका व्यक्तीच्या अंगावर पडली. तिच्या अंगावर आणखी दोन व्यक्ती पडल्या. अगोदरच माझी बहीण काठीसारखी बारीक आणि त्यात हे वजन ! परंतु त्या व्यक्तींना बाजूला करून ती उठून उभी राहिली आणि एवढ्यात दुसरा एक स्लॅब कोसळला तो एका व्यक्तीच्या मानेवर. ती व्यक्ती जागीच ठार झाली. त्यावेळी पुन्हा ती किंचाळली. त्यानंतर तिने एका बाईला उठवून बाजूला केले. दुसऱ्या एका बाईची साडी व्यवस्थित केली. आपल्या डोक्याला मार लागला आहे याची जरासुद्धा कल्पना तिला नव्हती. तितक्यात आमच्या शेजारचा मुलगा अशोक शिर्के याने तिला पाहिले. त्याने तिला घरी आणून सोडले. २० ते २५ फूटांवरून खाली पडणे व चालत घरी येणे, म्हणजे बाबा तिच्या सोबत होते, हे नक्की ! घरी आल्यानंतर ती बेशुद्ध पडली. इतक्या असंख्य जखमी लोकांमधून माझी बहीण सहीसलामत घरी पोहचली. डोक्याला जखम झाल्याने तेथे दोन टाके घालावे लागले व कमरेला जरासं खरचटलं होतं एवढंच. यापलीकडे तिला काहीच इजा झाली नव्हती. त्याच दुर्घटनेमध्ये माझा मोठा भाऊसुद्धा तिथेच खाली उभा होता. पण बाबांनीच त्याला दूर नेले. त्या भयंकर संकटातून बाबांनी आम्हाला वाचविले. •

## ऐनवेळी साईबाबांनी अब्रू राखली !

(श्री. व्ही. एम. शिंदे, गुरसाळे, सातारा यांच्याकडून):

**मी** एक २३ वर्षाचा युवक. केवळ विज्ञानावरच माझी निष्ठा होती. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्यामुळे धार्मिक भावना पूर्णपणे संपुष्टात आल्या होत्या. काही दिवसांपासून माझ्या अत्यंत जवळच्या जिवलग व्यक्तीला काही आर्थिक मदत देण्याचे मी मान्य केले होते. परंतु स्वत:चे कोणत्याही प्रकारचे उत्पन्न नव्हते. तरीही मी एक वर्षापूर्वी वचन दिले होते. अगदी महिन्याभरापूर्वी मी पुन्हा त्या व्यक्तीला एक तारखेचा वायदा केला आणि अत्यंत अवैध अशा मार्गाने प्राप्ती करण्याचा प्रयत्न करू लागलो. त्यात यश काही आले नाही. मनाची अत्यंत निराशा झाली. मृत्यूचे डोक्यात थैमान सुरू झाले. आत्मघाताच्या वेगवेगळ्या कल्पना करू लागलो; आणि त्याचवेळी अचानक 'श्री साईलीला' मासिकाचा ८२ किंवा ८३ सालातील भक्तांच्या अनुभवांचा एक अंक साईकृपेने माझ्या वाचनात आला. मी तो पूर्ण वाचून काढला; आणि केव्हा साईबाबांचा भक्त झालो, ते माझे मलाच कळले नाही. सतत "साईनाथाय नम:" हा मंत्र जपला. दोन दिवसानंतर बुधवारी रात्री १२-०० वाजता साईबाबांच्या प्रतिमेची पूजा केली; आणि अवघ्या २४ तासात करूणामय बाबांनी माझ्या हाकेला "ओ" देऊन मला मदत केली.

हा जिवंत अनुभव मी माझ्या जीवनाच्या अंतापर्यंत एक क्षणभरसुद्धा विसरू शकणार नाही. •

# आईचे अंतिम दर्शन हीही बाबांचीच कृपा !

(श्री. मोहन भोईर, टेंभीनाका, ठाणे यांच्याकडून):

**सा**लाबादप्रमाणे आम्ही सन १९९० च्या डिसेंबरमध्ये दिनांक २६-१२-९० रोजी शिरडीला गेलो होतो. शिरडीला निघण्यापूर्वी आमच्या आईची तब्येत सर्वसाधारणपणे नरम-गरम होती. थंडीमुळे तिला थोडा खोकला-पडशाचा त्रास होत होता. म्हणून तिच्या अनुमतीनेच आम्ही शिरडीला गेलो.

दिनांक २६-१२-९० च्या रात्री मला शिरडी येथे एक अशुभ स्वप्न पडले. त्यामुळे मन थोडे अस्वस्थ झाले. परंतु आपण श्री साईंच्या दारी असल्यामुळे घाबरण्याचे कोणतेच कारण नाही, अशी मनाची समजूत करून घेतली व सर्व देवदर्शन व्यवस्थित आटोपून घेतले. दिनांक २७-१२-९० रोजी गुरूवारच्या सर्व आरत्यांचा लाभ झाला. श्री सत्यनारायणाची पूजा करावयास मिळाली. मन कसे अगदी प्रसन्न झाले!

दिनांक २८-१२-९० रोजी सकाळी शिरडी सोडावयाची होती. पहाटेची काकड आरती करून निघावे, असे ठरले असल्यामुळे आम्ही पहाटे ३ वाजता उठलो आणि मी आंघोळीला गेलो; परंतु आंघोळ करावयास मन घेत नव्हते. तेव्हा बाबांचे नाव घेऊन थंड पाण्याने कशी-बशी आंघोळ केली आणि ४-३० वाजता मंदिरात काकड आरतीसाठी गेलो. काकड आरती संपल्यानंतर बाबांचा निरोप घेतला आणि सकाळी ६-३० वाजता शिरडी सोडली. शिरडी सोडण्यापूर्वी सौभाग्यवतीने एवढ्या पहाटे सामान नेण्यासाठी कोणी हमाल मिळेल काय, अशी शंका व्यक्त केली. शांती निवासमधून आम्ही खाली उतरताच एक मध्यमवयीन हमाल दोन रुपयांत सर्व सामान एस्.टी. स्टँडला नेतो, असे सांगून त्याने आमचे सर्व सामान स्टँडवर नेले. अशारीतीने बाबांनी पत्नीची इच्छा पूर्ण केली.

मुलांना आगगाडीचा प्रवास आवडतो म्हणून आम्ही कोपरगाव येथे सकाळी ८-१५ ची 'पुणे-दौंड-मनमाड पॅसेंजर' पकडून १०-३० पर्यंत मनमाडला पोहोचलो. तेथे थोडा नाश्ता घेतला; कारण 'भुसावळ पॅसेंजर' स्टेशनवर दुपारी १२-२० ला येते. परंतु त्या दिवशी ती गाडी १ तास उशिरा आली. त्यामुळे ती मनमाडहून १-२० ला सुटली. तरीही कल्याणला ती १५-२० मिनिटे अगोदरच पोहोचली आणि ठाण्याला ती ठीक ७-२५ ला आली. ठाण्याला जी गाडी नेहमीच उशिरा येते ती गाडी त्या दिवशी बरोबर वेळेवर पोहोचली. रिक्षाने आम्ही घरी ठीक ७-३५ ला पोहोचलो. घरासमोर गर्दी आणि भजन चाललेले पाहून माझ्या पोटात एकदम धस्स् झाले! पहातो तर काय! आमच्या आईची शेवटची आंघोळ होऊन, तिला सौभाग्य लेणे लावून, तिच्या शेवटच्या यात्रेची तयारी पूर्ण होण्याच्या बेतात होती. तिला शुक्रवार, दिनांक २८-१२-९० ला पहाटे ३-३॥ च्या दरम्यान हृदय-विकाराचा झटका आला होता आणि त्यातच ती आम्हाला सोडून गेली होती. म्हणूनच शिरडी येथे दिनांक २८-१२-९० ला पहाटे ३ वाजता आंघोळ करण्यास माझे मन धजत नव्हते.

मृतदेह उचलण्यापूर्वी आम्ही घरी येऊ असे वडिलांना सारखे वाटत होते म्हणून त्यांनी सर्व नातेवाईकांना आमची थोडी वाट पहाण्यास सांगितले होते. तसेच काहींनी आम्हाला सकाळपासून शिरडीला फोन लावण्याचा प्रयत्न केला होता. परंतु फोनची लाईन मिळालेली नव्हती. त्यामुळे आमच्या येण्याचा कोणालाच भरवसा नव्हता. म्हणूनच नातेवाईक मंडळी प्रेत नेण्याची घाई करीत होती. वडिलांचा मात्र ठाम विश्वास होता की आम्ही बाबांच्या दरबारी गेलो आहोत आणि बाबा त्यांना बरोबर घरी आणून सोडतील; आणि खरोखरीच बाबांनी त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. बाबांनी इतक्या लांबून आईच्या अंतिम यात्रेची तयारी पूर्ण होत असतानाच आम्हाला आमच्या घरी आईचे पुढील विधी करण्यासाठी वेळेवर आणून सोडले. त्यामुळे सर्वजण आश्चर्यचकित झाले. सर्वांना हा जणू चमत्कारच वाटला. अशाप्रकारे जो तो श्री बाबांच्या सामर्थ्याबद्दल चर्चा करीत आपआपल्या घरी निघून गेला.

वरील सर्व घटना पहाता श्री बाबा आपल्या भक्तांची कशी व किती काळजी घेतात, हे दिसून येते.

# कोपरगाव स्टेशनवर रेल्वेगाडीत बाबांनी सदेह दर्शन दिले !

(श्री. अविनाश पाध्ये, बोरिवली (प.), मुंबई यांच्याकडून):

**श्री** साईबाबांच्या भक्तीत शक्ती तर आहेच; त्याशिवाय बाबांच्या कृपाशीर्वादाने व मार्गदर्शनाने मला भक्तिमार्गातून आलेला एक विलक्षण अनुभव श्री बाबांच्या प्रेरणेने सर्व साईभक्तांना कथन करण्याची माझी इच्छा या लेखनाद्वारे पूर्ण करीत आहे.

मला श्री बाबांचे अनेक अनुभव आले आहेत. त्यांत हा अनुभव आश्चर्याचा; आणि सुखद अनुभव घेणाऱ्याला तृप्त करणारा! फेब्रुवारी, १९९१ मध्ये दोन वेळा शिरडीला जाण्याचा योग आला. एकदा श्री बाबांचे दर्शन घेऊन मी आनंदाने श्रीरामपूर येथे माझ्या नातेवाईकांकडे गेलो. दिनांक २७ फेब्रुवारी, १९९१ रोजी रात्रीच्या गाडीने मी मुंबईला यायचे ठरविले. भरपहाटे ३-२५ ला महाराष्ट्र एक्सप्रेस श्रीरामपूर (बेलापूर) येथे येते.

लवकर उठायचे म्हणून लवकर झोपलो; परंतु झोप मात्र येत नव्हती. श्री बाबांचा जप चालूच होता. मी मनातल्या मनात श्री बाबांना विनंती करून म्हणालो, ''बाबा, एकदा तरी मला स्वप्नात येऊन दर्शन द्या! मी धन्य होईन!''

पहाट फुटायच्या आत तीन वाजता उठून मी स्टेशनवर आलो. जाणारी फक्त चार-पाचच माणसं होती. माझ्यामागून कोणीही डब्यात चढले नाही. गाडीमध्ये गर्दी होती आणि सर्व झोपेत होते. मला बसायला जागा मिळाली नाही. मनमाड येईपर्यंत मला उभे रहावे लागणार होते. मी श्री साईबाबांचा जप करण्यास सुरूवात केली. कोपरगाव येईपर्यंत गाडीमध्ये कोणीही चढले नाही. कोपरगाव स्टेशन येण्यास फक्त पाचच मिनिटे असताना माझी नजर दरवाज्याकडे गेली. तो काय! श्री साईबाबांच्या रूपात एक फकीर दरवाज्याजवळ उभा! त्याचे ते रूप पाहून माझे मन प्रसन्न झाले. सुखद दर्शनाने डोळे तृप्त झाले. डोक्याला रूमाल, अंगात लांब कफनी, उजव्या हातात लोखंडी चिमटा, डाव्या खांद्यावर झोळी, झोळीमध्ये एक मळका रूमाल, तेजस्वी चेहरा, कपाळावर नुकतेच लावलेले चंदन-कुंकू, असे ते विलक्षण व्यक्तिमत्त्व पाहून मी धन्य धन्य झालो; आणि आश्चर्यचकितही झालो. माझे मित्र श्री. रामचंद्र कांबळी यांनी मला 'हिन्द प्रेस'मधून श्री बाबांचा फोटो आणून दिला आहे. त्याची मी पूजा करतो. त्या फोटोतील बाबांसारखाच तो फकीर दिसत होता. होय! मला मनापासून वाटले, ते श्री साईबाबाच आहेत. मी मनात म्हणालो, खरंच, ते जर बाबा असतील तर कोपरगाव येथे उतरून शिरडीला जातील. माझ्या मनातले बोल श्री बाबांना कळले; नि काय....

....गाडी कोपरगाव स्टेशनात आली. बाबा खाली उतरले. मीही त्यांच्याबरोबर खाली उतरलो. ते चार-पाच पावले चालून परत माझ्याजवळ आले; आणि मला म्हणाले,

''अच्छा बेटा, जाता हूँ। कल गुरूवार है। शिरडी में बहुत काम बाकी है।'' मी दोन्ही हातांनी नमस्कार केला. इतक्यात गाडी सुटली. मी गाडीमध्ये चढून मागे वळून पाहिले तो काय, तेथे कोणीही नव्हते! मी अवाक्‌च झालो. **श्री साईबाबांनी मनुष्यरूपात येऊन मला प्रत्यक्ष दर्शन दिले. मी त्यांना स्वप्नात दर्शन द्या, अशी विनंती केली होती.**

# ॥ जपता नाम अेक साई ॥ काळ आपोआप दूर जाई ॥

(श्रीमती सुशिलाबाई निंबाळकर, कलनाकवाडी, कोल्हापूर यांच्याकडून):

**ज्या** च्यावर आपली नितांत श्रद्धा आहे, दृढविश्वास आहे अशा परमेश्वररूपी साईबाबांचा संकटकाळी धावा केल्यानंतर भले मोठे वाटणारे आक्राळ-विक्राळ काळांचे खडक जीवनरूपी अथांग सागरातून अलगद बाजूला होतात आणि केलेल्या भक्तीने मिळालेली आनंदरूपी फळे चाखताना अशा थोर संतांच्या भक्तिगंगेत मन आनंदाने डुबून जाते. ऐहिक सुखाचा विसर पडून आत्म्यास भक्तीचा खरा साक्षात्कार होऊन ही जीवननौका संसाररूपी अथांग सागरात आनंदाने डोलू लागते असा अनुभव, मी श्री साईंच्या चरणी श्रद्धा ठेवून घेत आहे.

माझ्या लाडक्या धनश्री नातीला गेल्या वर्षी गोड छोकरी झाली. नातीची मुलगी बघून मन आनंदाने भरून आले. पण हा आनंद जास्त वेळ टिकला नाही. मुलीच्या जन्माच्या दुसऱ्या दिवशीच या इवल्याशा जिवाला अचानक रक्ताची उलटी झाली. जोरदार झालेल्या उलटीने त्या एवढ्या लहान जिवाची काय तगमग झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी! तिची ती अवस्था पाहून आम्हा सर्वांच्या तोंडचे पाणीच पळाले. मन फारच खचून गेलं. तो इवलासा जीव आमच्यातून फुलपाखरागत उडून जातो की काय या धास्तीनं मन सुन्न झालं! आणि मी नेहमीप्रमाणे 'साईबाबांचा धावा सुरू केला.' बाबांना एकच विनंती केली, "बाबा! तुम्ही या माझ्या बाळावरचं संकट दूर करायला हवं. बाबा! आता आम्हाला फक्त तुमचाच आधार आहे." अशाप्रकारे प्रार्थना करून मी बाबांच्या नामाचा रात्रभर एकसारखा जप केला. सकाळी पाहते तो बाळाला एकदम आराम वाटू लागला. बाळ आनंदाने हसू-डोलू लागले. डॉक्टरनेही बाळाची तब्बेत तपासून आता धोका टळल्याचे सांगितले. माझ्या नातीच्या छोकरीचे ते हसते खेळते गोड रूप पाहताना मन आनंदाने भरून आले. अखेर बाबांनी माझा धावा ऐकून बाळावरील आलेला काळ अलगद दूर केला. मी बाबांना अंत:करणापासून वंदन केले.

आज माझ्या नातीची ही गोड छोकरी खेळताना, दुडूदुडू पळताना, माझ्या मांडीवर बसताना माझे मन श्री साईबाबांच्या चरणी लीन झाल्याशिवाय रहात नाही. बाबांच्या या महान उपकाराने डोळ्यांतून साईरूपी भक्तीचे आनंदाश्रू ओघळतात आणि ओठातून शब्द येतात ॥ जपता नाम अेक साई ॥ काळही आपोआप दूर जाई ॥ •

# बाबांमुळे नात वाचली !



(सौ. अलका प्र. कामत, मालाड (प.), मुंबई यांच्याकडून):

**श्री** साईनाथांची अकरा वचने सर्व साईभक्तांना माहीतच आहेत. त्यातील श्री साईनाथांच्या "नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥" या वचनाची प्रचिती मला अत्यंत रोमांचकारी प्रसंगातून आलेली आहे. सुरूवातीस, म्हणजे श्री साईबाबांच्या चरणांपाशी येण्यापूर्वी माझ्यावर अतिशय बिकट प्रसंग गुदरल्यामुळे माझी मन:स्थिती पार ढासळून गेली होती. त्या तशा परिस्थितीत माझ्या भाचीने मला श्री साईसत्चरित हा ग्रंथ गुरूवार साधून वाचण्यास सांगितले. माझ्यापाशी ग्रंथ नसल्यामुळे तिनेच मला बुधवारी ग्रंथ आणून दिला. गुरूवारपासून ग्रंथ वाचायचा होता. श्री साईबाबांचा एक फोटो माझ्या घरी होताच. झोपण्यापूर्वी मी बाबांना मनापासून प्रार्थना केली, "बाबा, तुमच्या 'नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥' ह्या वचनाची प्रचिती मला द्या! तुमचे आणि तुमच्या पादुकांचेही दर्शन मला द्या!"

त्यानंतर मी झोपले आणि आनंदाची गोष्ट म्हणजे मला गुरूवारी पहाटेच स्वप्न पडले. त्या स्वप्नात बाबांनी मला पादुकांसोबत दर्शन दिले. जेव्हा मी जागे झाले तेव्हा माझ्या आनंदाला पारावार उरला नव्हता. कळत नकळत माझ्या मुखातून हलकेच शब्द बाहेर पडले, "अय्या, साईबाबा!" त्याचवेळेपासून माझी बाबांवर श्रद्धा बसली, मी बाबांच्या चरणांपाशी आले.

तशी मी अतिशय उतावीळ स्वभावाची होते. मनात काहीही आले तरी ते ताबडतोब व्हायला हवे असायचे. परंतु बाबांच्या "श्रद्धा आणि सबुरी" ह्या दोन अमृतरूपी शब्दांचे महत्त्व जेव्हा मला कळले, त्या शब्दांचे विलक्षण अनुभव जेव्हा मला आले, ज्या शब्दांमुळे मला अनेक फायदे झाले, त्या शब्दांना अनुसरूनच जीवनाची पुढील वाटचाल करायची, कोणतीही कृती घाईने, अविचाराने करायची नाही, असे मी मनोमन पक्के केले. कोणतेही योग्य काम श्रद्धा व सबुरी ठेवून केले तर त्याचे फळ नक्कीच मिळते, हे मी मला आलेल्या अनुभवांवरून ठामपणे सांगू शकते.

एकदा मी माझ्या मुलीच्या घरी रहायला गेले होते. दुसरा दिवस शनिवारचा होता. सकाळी उठल्यावर माझी ५ वर्षाची नात चि. अमृता हिने माझ्याकडून तिचे दात घासण्याकरिता हट्टच धरला. म्हणून मी तिचे दात घासले आणि त्यानंतर पातळ प्लॅस्टिकची पाती दोन्ही हातांच्या बोटांच्या चिमटीत धरून त्याने तिची जीभ साफ करू लागले. जीभ साफ करता करता ती पातळ पाती पटकन मोडली आणि माझ्या हातात दोन लांब पाती राहिली. क्षणार्धात माझ्या नातीने डोळे फिरविले आणि ती श्वास कोंडल्यासारखे करू लागली. मी घाबरून तिच्या घशात हात घालून पाहिले. हाताला तर काहीच लागले नाही. मी अधिकच बुचकळ्यात पडले. अमृताची अवस्था माझ्याने पाहवेना. काय करावे हेच सुचेना! मी हाक मारताच माझी मुलगी हातातलं काम तसंच टाकून धावत आली. आपल्या मुलीची 'ती' अवस्था पाहून तीही भेदरली. तेव्हा मी मुलीच्या घरात असलेल्या बाबांच्या छबीजवळ गेले आणि हात जोडून आर्त स्वरात प्रार्थना केली,

"बाबा, हे असे काय झाले हो? आता काय होणार? मी काय करू? तुम्हीच आता धावून या!" एवढे बोलून मी बाहेर नातीकडे आले, तर काय! तिला एक उलटी झाली आणि त्यातून मोडलेला प्लॅस्टिकचा छोटासा चौकोनी तुकडा बाहेर पडला. तसे पाहिले तर तोंड धुण्यापूर्वी तिच्या पोटात काहीच गेले नव्हते. रात्रीचे जेवण तर जिरले होते.

परंतु उलटीतून बाहेर आलेल्या पाण्यातून तो तुकडा बाहेर पडला. त्यावेळी माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. मी पुन्हा बाबांना हात जोडून नमस्कार केला. माझ्या प्रार्थनेला त्यांनी लागलीच साद दिली होती, भक्ताच्या हाकेसरशी धाव घेतली होती. माझे मन गहिवरून आले. तो छोटासा प्लॅस्टिकचा तुकडा तिच्या अन्ननलिकेत जर गेला असता व ती नाजूक अन्ननलिका फाटली असती तर? किंवा जर तो श्वासनलिकेत गेला असता तर? यापैकी काहीही होऊ शकले असते. परंतु बाबांनी या भयंकर संकटातून आम्हाला वाचविले. "शरण मज आला आणि वाया गेला। दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥" या बाबांच्या वचनाची प्रचिती या प्रसंगी मला आली.

खरोखरच, तुम्ही सतत साईनामाच्या जयघोषात जीवन व्यतीत करीत असाल आणि साईंवर तुमची दृढश्रद्धा असेल तर प्रत्येक संकटात बाबा हाकेला धावून येतात आणि रक्षण करतात याचा अनुभव तुम्हीही घेतच असाल. अशीच कृपा बाबांनी त्यांच्या उपदेशाप्रमाणे आचरण करणाऱ्या भक्तांवर सदैव करावी, हीच त्या कल्पतरूच्या चरणी विनम्र प्रार्थना! •

**गुरुस्थानाविषयी विद्वेष किंवा विक्षेप नको !**

# बाबांनी काळजी दूर केली आणि पोथीचं पारायण पूर्ण झालं !


(सौ. सुनिता पाठक, डोंबिवली (प.), ठाणे यांच्याकडून):

**प**रमपूज्य 'श्री साईबाबा' यांच्या 'श्री साईसत्‌चरित्' या पोथीचे वाचन आपल्याकडून एकदा व्हावे अशी मनोमन इच्छा माझ्या मनात होती. अर्थात ही इच्छा निर्माण होण्यासाठी श्री साईबाबांनीच माझी मैत्रीण सौ. शैला भांबुरे, जी बाबांची भक्ती मनापासून करते व जिला बाबांचे अनेक अनुभव आले आहेत, तिची माझ्याच ब्रँचमध्ये नेमणूक केली असावी. तिच्या तोंडून श्री साईबाबांचे चमत्कार व श्री साईसत्‌चरित् पोथीचे महात्म्य ऐकून मीही दिनांक ३०-७-९१ रोजी (अंगारकी चतुर्थी) श्री गणेशाला वंदून पोथी वाचायला प्रारंभ केला.

दररोज नित्यनियमाने मी ऑफिस सांभाळून पोथीचे वाचन करीत होते. कधी ११ ओव्या, कधी १ अध्याय, तर कधी ५ अध्याय या क्रमाने, जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे, पोथीचे वाचन करीत होते. पोथीची समाप्ती अनंत चर्तुदशीच्या आत करावी, अशी माझी मनोमन इच्छा होती. गणेश चतुर्थीच्या दिवशी माझे ३० अध्याय पूर्ण झाले होते. आता २३ अध्यायांचे वाचन बाकी राहिले होते. त्यानंतर काहीतरी अडचणीमुळे मी ४ दिवस पोथी वाचू शकले नाही. आता तर ६ दिवसांतच उरलेले अध्याय वाचून पोथी पूर्ण करावी लागणार होती. त्यातच माझे डोळे आले. ते इतके भयंकर आले की आता माझी पोथी कशी पूर्ण होणार, याविषयी मला काळजी वाटू लागली. खरोखर, श्री साईमहाराज माझी परीक्षाच घेत आहेत, असे वाटले. डोळे आल्यामुळे अर्थात मला २ दिवस ऑफिसला जाणे शक्य नव्हते. त्या संधीचा फायदा घेऊन, डोळे दुखत असूनसुद्धा मी गॉगल लावून, डोळे पुसत पुसत, पोथीचे वाचन चालू ठेवले. दिवसभरच्या वाचनामुळे रात्री माझे डोळे खूप सुजायचे; परंतु मनात पोथी पूर्ण करण्याविषयीची ओढ असल्यामुळे मला डोळ्यांचा त्रास जाणवायचा नाही. शेवटी अनंत चतुर्दशीच्या आधीच, म्हणजे दिनांक २०-९-९१ रोजी श्री साईसत्‌चरिताच्या पोथीची समाप्ती झाली. मी समाप्ती केली म्हणण्यापेक्षा श्री साईमाऊलीनेच ती माझ्याकडून पूर्ण करवून घेतली, असे म्हणावे लागेल.

माझ्या पोथीच्या वाचनास दि. ३०-७-९१ रोजी सुरूवात झाली व पोथीची समाप्ती दिनांक २०-९-९१ रोजी झाली. म्हणजे बरोबर ५३ दिवसांत ५३ अध्याय श्री साईबाबांनी माझ्याकडून कसे वाचून घेतले, याचे कोडे मला अजूनही उलगडलेले नाही. ही सर्व किमया त्या नटनाटकी साईमाऊलीची. ●

# स्वप्न-कथा



(श्री. शाम जुवळे, दादर (प.), मुंबई यांच्याकडून):

**दृ**श्य जगाला अदृश्य शक्ती कारणीभूत आहे. कार्याच्या पाठीमागे त्याचे कारण असावे लागते. स्वप्न पडण्यास निद्रा ही कारणीभूत असते. अखंड जागृतावस्थेत निद्रा आणि स्वप्न यांचा अभाव असतो. श्री साईबाबा हे अखंड जागृतीचे उदाहरण होय ! म्हणून आपण त्यांना अवतारी पुरुष असे मानतो.

भोळ्या भाविक भक्तांचे मार्गदर्शन हे साईबाबांचे अखंड कार्य होय ! आजही विदेहावस्थेत हेच सत्कार्य ते करीत आहेत. भक्तांच्या स्वप्नांचा वापर बाबा भक्तांच्या कल्याणार्थ करीत असतात. सर्व भक्तांचे कल्याण म्हणजे बाबांचा आनंद होय ! अकल्याण कोणाचेच केले नसल्यामुळे बाबांच्या आनंदाला दुःखाची बाजू नव्हती. भक्तांचे अज्ञान दूर करून त्यांना ज्ञान-प्रकाश दाखविणे, हेच या साई-सूर्याचे कार्य आहे. असाच ज्ञान-प्रकाश माझ्या जीवनात बासष्ट वर्षांपूर्वी मला माझ्या सद्‌भाग्याने लाभला. मी त्यावेळी नऊ वर्षांचा शालेय विद्यार्थी होतो. श्री दासगणू महाराज पोर्तुगीज चर्च, दादर येथील आमच्या घरी अधून-मधून येत असत. तेथे त्यांचे प्रवचनही होत असे. पार्ले येथील दीक्षित, शशितल वगैरे कुटुंबांतील मंडळी त्यावेळी माझ्या परिचयाची होती. त्यावेळचा हा सत्संग माझ्या भावी जीवनाचा पाया ठरला. या मजबूत पायावर जीवनाची इमारत आज ठामपणे उभी आहे, ही श्री साईकृपाच होय !

सुवासिक पुष्पांमुळे ज्या सुतामध्ये पुष्पांची माला गुंफली जाते त्या सुतालाही पुष्पांचा सुगंध प्राप्त होत असतो. त्याप्रमाणे श्री दासगणू महाराज व इतर थोर मंडळींमुळे माझ्या जीवनाचा सुगंध दरवळत राहिला आहे. एवढेच नव्हे तर आमच्या वरील घरी, जिथे दासगणू महाराज नेहमी बसत असत, ती जागाही पुनीत झाली होती. मी ती जागा माझ्या विद्याभ्यासासाठी आवर्जून निवडली होती. त्यामुळे मला माझ्या दादर येथील छबिलदास शाळेत काही पारितोषिके मिळविता आली. पुढे अहमदाबाद येथील ज्या कॉलेजमध्ये मी शिकत होतो तेथेही श्री बाबांच्या कृपेमुळे कै. श्री. व्ही. के. आर. व्ही. राव या प्रसिद्ध व्यक्तीच्या हातून मोठे मानाचे बक्षीस मला मिळाले. सत्संगाचा महिमा असा फार मोठा आहे.

वर उल्लेख केलेल्या निवासस्थानी मला अधूनमधून निद्रेमध्ये असताना स्वप्नं पडत असत. श्री साईबाबांवरील प्रेमामुळे जागृती, स्वप्नी मला बाबांशिवाय दुसरा आवडीचा विषयच नव्हता. हे मी माझे सद्‌भाग्यच समजतो. त्यावेळी मी रचलेल्या एका काव्याची सुरूवातही "हवा मज माझाच साईनाथ। नको मज अन्य काही जीवनात॥" अशीच केली होती. इतर सर्व वेडांपेक्षा भक्तीचे वेड चांगले, असे संतपुरूष नेहमीच म्हणत असतात, तेच खरे आहे. त्यावेळी मला जे एक अतिशय चांगले स्वप्न पडले ते अजूनही मला चांगले स्मरते. मी रामरक्षा नेहमी म्हणत असे व अजूनही रोज अनेक वेळा म्हणत असतो. रामरक्षास्तोत्र हेसुद्धा बुधकौशिक ऋषींच्या स्वप्नावर आधारित असे प्रसिद्ध स्तोत्र आहे. या स्तोत्राचे नित्य पठण म्हणून मला चांगली स्वप्नं पडत असतात, अशी माझी नितांत श्रद्धा आहे. जसे पेरावे, तसे उगवते या म्हणीनुसार असे होत असते. मला या प्रस्तुत स्वप्नात प्रथम दासगणू महाराज बसत ती जागा दिसली. बराच वेळ स्वप्नात मी या जागेकडे टक लावून सारखा पहात होतो व या कुतूहलाने माझा मीच भारावून गेल्यासारखा झालो होतो. काही वेळाने या जागी मोठा खड्डा मला दिसू लागला. याचे मला आश्चर्य वाटले. एवढ्यात श्री साईबाबा त्या खड्ड्यात उभे असलेले मी स्पष्टपणे पाहिले. मी त्या जागेच्या जवळ जावून उभा राहिलो. मला बाबांच्या चरणांवर मस्तक ठेवायचे होते. तसे मी बाबांना स्वप्नामध्ये सांगितले. तेव्हा बाबांनी मला त्या मोठ्या खड्ड्यात उतरायची आज्ञा केली. त्याप्रमाणे मी खाली उतरून बाबांच्या पाया पडलो. पुढे मी बाबांना शिरडी सोडून येथे कसे आलात, असे सहज विचारले. तेव्हा बाबा म्हणाले की शिरडी येथे असताना देहाच्या मर्यादा मला पाळाव्या लागत असत; परंतु देह सोडल्यामुळे मी आता मुक्तावस्थेत कोठेही आणि केव्हाही गमन करू शकतो. तुला दर्शन देण्यासाठी आज मी येथे आलो आहे. यापुढे तू शिरडीला येऊन माझे दर्शन घेत जा; तुझे कल्याण होईल ! येथे माझे स्वप्न भंगले आणि मी जागा झालो. त्यानंतर बाबांच्या आज्ञेनुसार शेकडो वेळा मी शिरडीस जावून त्यांच्या समाधीचे भक्तिभावाने दर्शन घेत असतो. बाबांच्या कृपाशीर्वादाने माझे जीवन कृतार्थ झाले आहे.

जीवन हे माझे कृपा तुझीच साई।
पूर्णत्वाची ग्वाही। ऐक्यभाव॥ ●

**होईल तेवढं इतरांसाठी करा !**

# स्वप्न सत्यात उतरलं !



(सौ. शुभांगिनी देसाई, वागळे इस्टेट, ठाणे यांच्याकडून):

अखिल ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज श्री साईबाबांनी अखंडपणे भक्तांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना साक्षात्कार दिल्याचे, तसेच अनेक चमत्कार घडवून आणल्याचे आपण सर्व पहातो, ऐकतो व वाचतही असतो.

दिनांक २६-९-१९८५ रोजी मला अनुभवायला मिळालेल्या चमत्कारामुळे मी साईबाबांची निस्सीम भक्त झाली आहे.

त्याचे काय झाले.... मला सुरुवातीला साईबाबा व त्यांची शिरडी हे केवळ ऐकून माहीत होते. आमच्या आजीने बाबांना पाहिले होते. त्यांच्या विभूतीचा गुण घेतला होता. ती विभूती आजपर्यंत माझ्या मामांजवळ आहे. त्यामुळे मलाही साहजिकच वाटत असे की आपल्याला शिरडीचे दर्शन कधी घडणार? वर्षांमागून वर्षे गेली. मला एवढेच माहीत होते की बाबा जेव्हा बोलावतील तेव्हाच शिरडीचे दर्शन आपल्याला होणार. एक दिवस असा आला.... त्या दिवशी २४ तारीख होती. वेळ होती सकाळची. माझ्या भावाचा माझ्या यजमानांना कंपनीत फोन आला, "आम्ही दहिसर येथून छोटचा टेंपोने शिरडीला जात आहोत. तुम्हाला जर बाबांना दक्षिणा वगैरे काही द्यावयाची असेल तर द्या ! तसं तुम्ही ताईलादेखील सांगा !" यांनी लगेच दुपारी १२-३० वाजता जेवणाच्या वेळी मला ही बातमी सांगितली. ती ऐकून मला व माझ्या मुलांना वाईट वाटले; कारण गाडी फुल झाली असल्याने आमची इच्छा असूनही आम्हाला संधी मिळणार नव्हती. परंतु बाबांना आमची इच्छा उमगल्यावाचून कशी राहणार ! मी यांना २१ रु. अर्पण करायला सांगून बाबांचा प्रसाद आणण्यास सांगितले. मन मात्र नाराज होते. एवढं सारं होता होता रात्र झाली. रात्री जेवणं झाली आणि आम्ही झोपी गेलो. मुलं मात्र सारखं म्हणत होती, मामा पक्का आहे. आमची तिकिटं काढली नाहीत. कशीतरी त्यांची समजूत घातली की बाबांची इच्छा नसेल म्हणून शिरडीचे दर्शन नाही. पण बाबांची करामत काही न्यारीच होती. त्या रात्री, म्हणजे बुधवारी बरोबर दोन वाजता, मला बाबा स्वप्नात दिसले. त्यात बाबा त्यांच्या गुरुस्थानाकडे सर्व भक्तांना आपल्या अलगंद हाताने कोळंब्यातील पुरणपोळ्या प्रसाद म्हणून देत होते. मी व माझी मुलं, गुरुस्थानाच्या डाव्या बाजूला जाण्याचा जो मार्ग आहे, तेथे उभे होतो. माझा मुलगा व माझ्या दोन नंबरच्या मुलीने तिकडे निर्देश करीत मला सांगितले, "आई, बघ ! ते बघ ! श्री साईबाबा पुरणपोळ्या देत आहेत." त्यांचे बोलणे चालू आहे तोच बाबांनी पट्कन माझ्या दिशेने दोन पुरणपोळ्या फेकल्या. मी लागलीच माझा पदर पसरून त्या झेलल्या. इतक्यात पहाटेचे पाच वाजले. आमचा दुधवाला दूध देण्यासाठी दारावरची बेल वाजवीत होता. त्या आवाजाने मी खडबडून जागे झाले. स्वप्नात व क्षणभर का होईना बाबा व त्यांच्या शिरडीचे दर्शन झाले होते. सकाळी, म्हणजे दिनांक २५ रोजी, नेहमीप्रमाणे हे कामावर जाण्यास निघाले. मी माझे स्वप्न यांना व मुलांना सांगितले, "बाबांनी आपल्याला की नाही शिरडीला न जाताच पुरणपोळ्या दिल्या. बस्स, याशिवाय आणखी काय पाहिजे !" त्यानंतर हे कामावर गेले. तेथे ते पोहचतात न पोहचतात तोच माझ्या भावाचा फोन आला, "भाओजी, तुम्ही व ताई मुलांना घेऊन दुपारी लवकर या ! काही कारणाने चार तिकिटं कॅन्सल झाली आहेत." हे लगेच घरी आले. ही बातमी ऐकल्याबरोबर मन आनंदाने नाचू लागले. नकळतच बाबांचे वचन ओठावर आले.... नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचित अनुभवे॥ अशाप्रकारे आम्ही सर्वजण सहकुटुंब दिनांक २५ रोजी शिरडीला गेलो. मी, माझे यजमान व माझ्या मुलांनी दोन दिवसांच्या आपल्या मुक्कामात बाबांचे व त्यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या शिरडीचे मनसोक्त दर्शन घेतले. ●

# साईबाबांच्या उदीने मुलास बरे वाटले !

(श्री. रविंद्र सोनार, जव्हार, ठाणे यांच्याकडून):

मी तारीख २६-२-१९९२ रोजी ऑफिसमधून घरी आलो. हात-पाय धुतले. साईपूजा केली. मुलांना म्हटले, जेवण करू चला ! तेवढ्यात चार वर्षाचा माझा लहान मुलगा दिपेश याच्या छातीत एकदम कळा येण्यास सुरूवात झाली. मी म्हटले, होईल बरा ! नंतर त्याला एवढ्या वेदना व्हायला लागल्या की त्याला बोलताच येईना ! मी घाबरलो. त्याला दवाखान्यात नेले. डॉक्टरने गोळ्या व पोटात घ्यायचे औषध दिले. त्यानंतर दवाखान्यातून मी त्याला घरी घेऊन आलो. पत्नीने मला सांगितले, "अहो, त्याला बाबांची उदी पाण्याबरोबर पाजा !"

मी बाबांना मनोमन नमस्कार केला व मुलास पाण्याबरोबर उदी दिली. काय आश्चर्य ! २-३ मिनिटांतच त्याला वांत्या झाल्या व छातीतल्या कळा एकदम नाहीशा झाल्या. नंतर मी, पत्नी व दोन्ही मुलं बरोबर जेवलो. ●

# रात्रंदिन आम्हा बाबांचा आधार !

(सौ. वैजयंती सप्रे, डोंबिवली (पू.), ठाणे यांच्याकडून):

हो ! हो !! अगदी खरं !!! सत्य घडलेली घटना आहे ही ! आम्ही ३-४ वर्षांपासून श्री साईबाबांची भक्ती करीत आहोत.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट. माझे पती कंपनीच्या गाडीने घरी येत होते. त्यावेळी जेथे तीन रस्ते एकत्र येतात अशा एका ठिकाणी कंपनीची गाडी, समोरून जड सामान वगैरे उचलणारी क्रेन व दुसऱ्या बाजूने एक ट्रक एकदम एकाच ठिकाणी येऊन एकमेकांवर आदळले. पण साईबाबांच्या कृपेने कुणाला लागले नाही. फक्त समोरच्या काचा फुटल्या.

असाच दुसरा अनुभव : एकदा माझे पती कामावर दुसऱ्या पाळीला गेले होते. त्या दिवशी रात्री अकरा वाजता अचानक घराची बेल वाजली. दार उघडून पाहिले तर कोणी नाही. म्हणून माझा मुलगा बिल्डिंगच्या कंपाऊंडमध्ये कोणी दिसते का, ते पहायला गेला; पण त्याला आसपास कोणी दिसले नाही. बिल्डिंगचा वॉचमन तर झोपा काढीत होता ! थोड्या वेळाने मी बाथरूमला गेले. तेथे पाहते तो काय ! गिझरसाठी सोडलेल्या वायरी एक-दुसऱ्याला घासून त्यामधून ठिणग्या पडत होत्या. ते पाहून आम्हाला जागरूक केल्याबद्दल मी श्री साईबाबांना मनोमन हात जोडून नमस्कार केला. ती बेल साईबाबांनीच वाजविली आणि संभाव्य अनर्थ टाळला.

आम्ही पूर्वी, म्हणजे १९९० च्या सुमारास ज्या घरात रहात होतो त्यावेळी एकदा साईबाबांच्या दर्शनासाठी गेलो होतो. समाधीच्या पाया पडत असताना मी सहज म्हटले, "बाबा, तुमच्या या लेकीचे स्वत:चे घर होऊ दे !" आणि काय आश्चर्य ! खरंच, एक वर्षाच्या आत आम्हाला साईबाबांच्या कृपेने चांगल्या लोकवस्तीत स्वत:चा ब्लॉक घेता आला. तोही कुठलीही अडचण न येता !

साईबाबांच्या कृपेने माझी प्रकृती पूर्वीपेक्षा खूपच चांगली सुधारली आहे. मला पूर्वी मधुमेह व उच्च रक्तदाबाचा त्रास होत होता. त्यावेळी डॉक्टरांनी सांगितले की मला थायरॉईडची टेस्ट करावी लागेल. ती करण्यासाठी मला मुंबईच्या टाटा हॉस्पिटलमध्ये जावे लागणार होते. परंतु त्यावेळी माझी प्रकृती अगदीच खालावली असल्याने मला मुंबईला जाणे शक्यच नव्हते. तसे डॉक्टरांनाही सांगितले. मी मनापासून साईबाबांना प्रार्थना केली, "बाबा, थायरॉईड टेस्टची व्यवस्था डोंबिवलीतच होऊ दे !"

खरंच, साईबाबांना मनापासून साद घातली तर ते आपल्या भक्ताच्या हाकेला केव्हाही धावून येतात. पुढच्याच आठवड्यात डोंबिवलीला वरील

# हा तर बाबांचाच प्रताप !

(सौ. शांताबाई पाचपुते, घाटकोपर (प.), मुंबई यांच्याकडून):

**श्री** साईबाबांच्या श्रद्धा व सबुरीचा अनुभव मला नुकताच आला. एक वेळ अशी आली होती की माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालणार, या विवंचनेत मी होते. त्यावेळी माझ्या एका शेजाऱ्याने मला सल्ला दिला, "संसाराच्या गाड्याचे अडीअडचणीत रूतलेले चाक वर काढायचे असेल तर तुम्ही श्री साईबाबांना शरण जा!" त्याप्रमाणे मी बाबांना शरण गेले आणि प्रार्थना केली, "बाबा, यातून तुम्हीच आम्हाला तारू शकता व आमच्या संसाराची नाव पैलतिरी लावू शकता."

माझ्या पतीची नोकरी गेली होती आणि त्यातच भरीस भर म्हणून की काय मुलीच्या टॉंसीलसनी त्रास देण्यास सुरूवात केली. विघ्नांवर विघ्न येत होती; पण बाबांवरील श्रद्धा काही सोडली नाही. हळूहळू मला याचा प्रत्यय येऊ लागला. माझ्या पतीला तात्पुरती नोकरी मिळाली. मुलीच्या टॉंसीलसनीं जो जोर धरला होता तो हळूहळू कमी पडू लागला. ही श्री साईबाबांच्या उदीची किमया! माझा मोठा मुलगा एस्.एस्.सी. ला ३ ते ४ वेळा नापास झाला होता. मी बाबांना प्रार्थना केली की त्याला परीक्षेत यश मिळू दे! आणि बाबांच्या कृपेने तो पासही झाला. माझ्या संसाराची विस्कळीत झालेली घडी हळूहळू नीट होऊ लागली. आज आमचा जो संसार उभा आहे तो फक्त श्री साईबाबांच्या आशीर्वादामुळेच. कालांतराने माझ्या पतीला व्यवस्थित नोकरी मिळाली. बाबांनी मला कुणापुढेही हात पसरविण्यास लावू दिले नाही. स्वतःच्या झोपडीत स्वाभिमानाने, ताठ मानेने आम्ही जे जीवन सद्या जगत आहोत ते फक्त शिरडीच्या श्री साईनाथांच्या वरदहस्तामुळेच. ●

# श्रींनी दर्शन दिले !

(श्री. सदानंद वाईरकर, बोरिवली (प.), मुंबई यांच्याकडून):

**श्री** साईबाबांनी बुधवार, दिनांक १ जानेवारी, १९९२ ला, म्हणजे वर्षाच्या प्रारंभ दिनी, माझ्या मनाप्रमाणे घडविलेली एक अविस्मरणीय घटना....

....त्या दिवशी मी काही कामाकरिता लालबागला गेलो होतो. मनात ठरविले होते की दादर येथील साईनिकेतनमधील श्री साईंना अगरबत्तीचा पुडा ओवाळायचा. परंतु तेथे अगरबत्तीच्या दुकानांत वजनावरील सुट्ट्या अगरबत्त्याच आढळल्यामुळे त्या न घेता मी घाईघाईतच साईनिकेतनमध्ये गेलो. तेथे गेल्यावर बॅगेतील हार व प्रसाद काढण्यासाठी म्हणून खाली बसलो. बॅग उघडून त्यातील हार व प्रसाद काढतोय न काढतोय तोच श्रींच्या समोर उभ्या असलेल्या एका अपरिचित वयस्कर व्यक्तीने त्वरित मागे वळून अगरबत्तीचा पुडा व आगपेटी माझ्या हाती दिली आणि ती व्यक्ती सरळ निघून गेली. हे सर्व काही सेकंदातच घडल्यामुळे क्षणभर मी अवाक्‌च झालो; आणि जेव्हा भानावर येऊन कोण बरं ही व्यक्ती असावी म्हणून मागे वळून पाहिलं तर ती पाठमोरी व्यक्ती मला श्रींसारखी दिसली. क्षणात ती नजरेसमोर होती आणि क्षणात नजरेआड झाली. त्या विलक्षण घटनेची आजही आठवण झाली की मन कसे अत्यानंदाने भरून येते! ●

# श्री साईबाबांनी पर्सची राखण केली !

(श्री. शामसुंदर हेजिब, छिंदवाडा, मध्यप्रदेश यांच्याकडून):

**आ**मच्या परिवारात श्री साईबाबांची भक्ती वडिलोपार्जित आहे. आम्हाला श्रींच्या कृपेचे अनुभव वेळोवेळी येत असतात. आम्हाला नुकताच आलेला अनुभव भाविकांच्या माहितीसाठी खाली देत आहे.

मी व माझी पत्नी सौ. सुधा नागपूरहून भोपाळला रेल्वेने जाण्याकरिता स्टेशनवर गाडी लेट असल्याने वाट पहात बसलो होतो. गाडीचे रिझर्वेशन नसल्याने मन अशांत होते. पण श्रीकृपेने गाडीत रिझर्वेशन मिळाले. गाडी फलाटावर आल्यावर (जी.टी. एक्स्प्रेस) मी व सौ. ज्या डब्यात रिझर्वेशन मिळाले होते त्यात बसलो. आमच्या रिझर्वेशनचा डबा ज्या जागी आम्ही वाट पहात बसलो होतो त्यापासून किमान एक फर्लांग दूर होता. आम्ही जागा शोधून गाडीत बसलो व बाबांचे आभार मानले. असेच गाडीत १० मिनिटं बसल्यावर (गाडी अजून सुटायची होती.) मी सौ.कडून सुटकेसची चावी मागितली. याबरोबर तिला आठवले की तिची पर्स तर फलाटावर ज्या खुर्चीवर आम्ही बसलो होतो तिथेच राहिली. झाले, मन फार निराश झाले; कारण गाडी सुटायची वेळ झाली होती व ती जागा १ फर्लांग दूर होती आणि पर्स मिळण्याची शक्यताही फार कमी होती. मला कुठून स्फुरण आले कोण जाणे, मी ताडकन् उठलो व धावतच त्या ठिकाणी गेलो. काय आश्चर्य! पर्स खुर्चीवर जशीच्या तशी होती. त्या खुर्चीच्या शेजारच्या खुर्चीवर एक गृहस्थ बसले होते. ते मला पर्स घेताना पाहून म्हणाले, "ही पर्स तुमची आहे ना?" जणू बाबाच त्या पर्सची राखण करीत बसले होते! कारण त्यापूर्वी ते गृहस्थ तिकडे नव्हते. मी पर्स घेऊन जसा गाडीत प्रवेश केला, गाडी सुटण्याची शिट्टी झाली व गाडी सुटली. मला पाहून सौ. म्हणाली, "तुम्ही एका क्षणात जावून आलातसुद्धा!" म्हणजे मला हे सर्व बळ श्री साईबाबांनीच दिले. त्या पर्समध्ये सुटकेसच्या चाव्या, रोकड, काही दागिने असा ऐवज होता. बाबांनी त्यांचा सांभाळ करून आमच्यावर कृपा केली.

टेस्टची सोय एका खासगी दवाखान्याने उपलब्ध केली असल्याचे कळले. त्यामुळे बाबांच्या कृपेने मुंबईला जाण्याचे माझे कष्ट वाचले. ●

---

आम्ही श्री साईबाबांचे मनःपूर्वक उपकार मानले व सौ. ने बोलल्याप्रमाणे रु. १०१/- घरी आल्यावर देवघरात श्री साईबाबांच्या चरणावर ठेवले. पर्सची आठवण आम्हास गाडी सुटल्यावर जर झाली असती तर! ●

## अनुभव हवेत; पण छायाचित्रांसह !

आपण सर्व श्री साईभक्त आहात. म्हणून आपल्याला बाबांच्या कृपेचे अनुभव हमखास येत असतील. अशा अनुभवांपैकी एखादाच जबरदस्त अनुभव 'श्री साईलीला'कडे त्वरित पाठवा! मात्र अनुभवाशी संबंधित असलेल्या व्यक्तींची छायाचित्रे अनुभवासोबत पाठविणे आवश्यक आहे. अशा अनुभवास आम्ही त्वरित प्रसिद्धी देऊ!

## सत्यात उतरलेली स्वप्नं पाठवा !

आपल्याला असंख्य स्वप्नं पडत असतात. पण शास्त्रज्ञांच्या मते ९० टक्के स्वप्नं आपण जागे झाल्यावर विसरत असतो. तरीही जी स्वप्नं आठवतात ती कालांतरानं सत्यात अनुभवास आल्याची असंख्य उदाहरणेही आपण पाहतो.

श्री साईबाबांनीही अनेक भक्तांना स्वप्नात जाऊन दर्शन आणि दीक्षा दिली आहे. म्हणूनच स्वप्नांचा अभ्यास होणं आवश्यक आहे.

तुमची स्वप्नं, नंतर सत्यात उतरल्याचा अनुभव तुम्हाला आला आहे का? असेल तर असा अनुभव 'श्री साईलीला'कडे लिहून पाठवा! आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ! अर्थात ज्याला अनुभव आला आहे त्यानं आपलं छायाचित्र व पूर्ण पत्ता पाठविणं आवश्यक आहे.

— कार्यकारी संपादक

(पृष्ठ क्र. ३ वरून) .

शालिग्रामाच्या एका लहान खडयावरच सिद्ध झाली. याप्रमाणें भावना आणि विचार यांच्या प्रकारांनुसार उपास्याच्या प्रतीकाचे रूप पालटतें. तान्ह्या मुलाच्या हातांत मावेल इतक्या चिमुकल्या (देव्हाऱ्यांतील) लंगड्या बाळकृष्णानें हा प्रचंड ब्रह्मांडकटाह रचला, ही भावना दुर्घट होते. यासाठींच विराट् नगरीचा विराट् गणपति व बावन फूट उंचीचा जपानचा जबरदस्त बुद्ध, अशा भव्य मूर्ति उपासक आपल्या आवडीनें घडवीत असतात. त्यांची भावना अल्पांत संतोष पावत नाहीं. देवाचीं प्रतीकें म्हटलीं कीं तीं खूप मोठीं असावींत, असें त्यांस वाटतें. पारिजातक, चमेली अथवा माका यांच्या सुकुमार पुष्पांत अथवा फुलपाखराच्या पंखांत ईश्वराचें चातुर्य दिसत नाहीं, असें नाहीं. फार काय, एखाद्या अणूला सूक्ष्मदर्शक यंत्राखाली पाहिलें तर त्यांतील परमाणूंची अघटित घटना दृग्गोचर होऊन ईश्वराच्या कृतीचें नवल वाटतें! पण यापेक्षां अथांग महासागरांतून होणारा सूर्योदय, उंचावरून दिसणारे मोठमोठ्या नद्यांचे प्रवाह व विस्तृत वनश्री, पुष्पोद्यानांवर पडलेला शरच्चंद्राच्या पूर्ण कलांचा रम्य प्रकाश, जेथें चोहोंबाजूंस क्षितिज दिसत आहे असे अफाट व सपाट भूमिप्रदेश किंवा महासागराचा गंभीर व अमर्याद पृष्ठभाग, दुर्बिणीतून दिसणारें आकाशीचें तारांगण, अशा विराट् दर्शनांत ईश्वराचे रूपवैभव अधिक उठावदार दिसतें.

हे महारुद्र हनुमंता! रुद्र असंख्य आहेत. त्यांचें कांहीं एकच रूप आहे असें नाहीं. पुराणकारांनीं तुझें जें गुणवर्णन केलें आहे, त्यांत वानर हा एक रूप-गुण-विशेष आहे. पण तें रूप हेंच कांहीं तुझें गुण-सर्वस्व नव्हे. इतकेंच काय, पण तुझें सामान्य वानर हें रूप तुझ्या इतर सर्व गुणांवर मायेचें आवरण घालणारें आच्छादनच आहे. यास्तव तुझी उपासना करितांना ज्या तुझ्या गुणमूर्तीचें चिंतन करावयाचें, त्यांत वानर हा आकार अगदींच अमुख्य आहे, असें म्हणणें गैर होणार नाहीं. तुझ्या उपासनांतील विविध मंत्र-तंत्रांवरूनहि हेंच दिसतें.

हे मारुते! दशरथाकडील पुत्रकामेष्टीनंतर सुमारें एका संवत्सराचें आंत अयोध्येच्या उत्तरेस किंवा दक्षिणेस कांहीं अंतरावरील कोणा एका देशांत तुझा जन्म झाला, अर्थात् त्यापूर्वी दुसऱ्या कोठें तूं नव्हतासच, अशी दिक्कालाची मर्यादा तुझ्या ठिकाणीं संभवत नाहीं. कारण भविष्यपुराणानें तुझा भूतकाल कृतयुगापर्यंत मागे नेला आहे. पुढें दीर्घकालानें रामावतार होणार हें तुझ्या आयुष्यांतील एक भविष्य म्हणून पद्मपुराणांत सांगितले आहे व आतां तर तो भूतार्थहि होऊन गेल्याला लक्षावधि वर्षें लोटलीं, तरी तूं चिरंजिव विद्यमान आहेसच! तुझा समकालीन जांबवान हा देवासुरांच्या अतिप्राचीन समुद्रमंथनाच्याहि पूर्वीचा म्हणून प्रसिद्ध आहे. अशा तुमच्या दिव्य स्वरूपाचें चिंतन करण्यास प्रतीकेंहि साजेशींच निवडलीं पाहिजेत, असें कित्येक विचारी मनांस वाटणें स्वाभाविक आहे. महिमा आणि तेज यांच्या अधिक्यानेंच विभूतिमत्त्व सिद्ध व व्यक्त होतें.

हे महारुद्रा! तूं अव्ययात्मा जो ईश्वर त्याचाच अवतार आहेस. वस्तुत: मी तुला अव्ययात्माच मानतों. शिव हा अक्षरपुरुष म्हणून तुज कविश्रेष्ठाला क्षरपुरुषाचे कोटींत लेखणें हा शब्दप्रपंच योग्य असला, तरी वस्तुत: अव्ययात्मा हेंच तुझें स्वरूप आहे आणि या स्वरूपाचीं प्रतीकें अथवा विभूति उपनिषदांतून आदित्त्व, चंद्र, विद्युत्, आकाश, वायु, अग्नि, पाणी, दिशा; किंवा अन्न, प्राण, मन, विज्ञान, आनंद, प्रणव, अशा अनेक प्रकारें स्थूल आणि सूक्ष्म सांगितल्या आहेत.

हे हनुमंता! तुझ्या सहस्त्रनामस्तोत्रांत तुझ्या विराट् स्वरूपाचें अनेक तऱ्हेनें स्पष्टच वर्णन आहे. हे वायुसुता! वायु हें तुझें तत्त्व आहे. आयुर्वेदासारख्या व्यावहारिक शास्त्रांतहि, ''वायु पृथ्वी धारण करतो, सूर्य-चंद्र-नक्षत्रें यांस त्यांच्या कक्षेंत फिरावयास लावतो. अग्नीस प्रज्वलित करितो. ढग उत्पन्न करतो. प्रवाहास वाहावयास लावतो. उभ्दिज्जांस उगवावयास लावतो. ऋतुचें भाग करितो. धातूंचें विभाग करतो.'' इत्यादि प्रकारें वायुच्या बहुविध व्यापक सत्तेचें वर्णन आढळतें. इतकेंच नव्हे, तर हें अखिल विश्व म्हणजे भगवान वायुचेंच शरीर होय, असेंहि म्हटलें आहे. वाल्मीकीनेंहि वायुचें महात्म्य असेंच वर्णिलें आहे. हा भगवान वायु हेंच तुझें तत्त्वत: स्वरूप आहे.

अशा तुझ्या विराट् रूपाची गंधफुलांनी पूजा करणें अशक्यच आहे. फार काय, सुमनानें किंवा वाक्सुमनांनींहि पूजा बांधणें दुर्घटच आहे. अशा अवघट मंगल कार्याच्या आरंभी नवग्रहांची पूजा व शांति करावी, अशी पूर्वापार प्रथा आहे. शन्नो ग्रहाश्चान्द्रमसा: शमादित्त्याश्च राहुणा। असें वेदवचन आहे. यास्तव तुझ्या विराट् रूपाच्या वाङ्मयात्मक पूजेच्या आरंभीं नवग्रहाचें ठिकाणींच मी अगोदर तुज हनुमंतेश्वराची धारणा करितों.

## मार्तंड मारुति

विश्वात्मा विश्वसोव्योऽथ विश्वो विश्वहरो रवि: ॥

हें तुझें स्तोत्र, रवि तो तूंच असेंच म्हणत आहे.

हे रस-बलात्मक ईश्वरा! तुझें संपूर्णतेनें ज्ञान होणें अशक्य आहे असें जाणून तुला विभूतिरूपांत पाहण्याचा प्रयत्न करीत असतां,

''हिरण्यमयपुराणश्च खेचरो भूचरो मनु:''
''ज्योतिर्ज्योति: ॥ तमोहत निरालंब:+++बृहत्कार्यो बृहत्कर: ॥''

इत्यादि प्रकारच्या तुझ्याच वर्णनाचा हा प्रतापभानु माझे नजरेपुढें येतो.

''सर्वप्रवहिकानामाश्रय: !'' हें निरुक्तांतील सूर्याचें लक्षण तुलाहि लागतें.

''सर्वदेवमयो हि स:'' हें सूर्याचें वर्णन वायुरूप जो तूं त्या तुलाहि लागतें.

''सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च'' हें औपनिषदिक वचन जगत्प्राण जो तूं , त्या तुलाहि उत्तम साजतें. सारांश, साऱ्या देवता वायूरूप असल्यामुळें व वायु हेंच तुझें तत्त्वत: स्वरूप असल्यामुळें, भागवतपुराणांतील सूर्याचीं मूलाधाररूप वर्णनें तुलाहि लागू पडतात. तुम्ही दोघेहि अंतरिक्ष लोकींचेच देवतारूप आहात.

हे मारुते! तुझ्या सहस्त्रनामस्तोत्रांत रसाधरायनम: रवये नम: जगन्नेत्रे नम:। उद्धिक्रमणाय नम:। उर्ध्वगाय नम:। द्वादशराशिगाय नम:। भास्वते नम:। महाद्युतये नम:। भास्कराय नम:। अशी तुझी नामावली पाहून तूं आणि सूर्य एकरूपच आहांत, असें म्हणावें लागतें.

सूर्य हा ज्याप्रमाणें श्रीमंताचें आणि गरीबाचें घर सारखेंच प्रकाशित करतो, त्याचप्रमाणें तूं राजाचें नगर व खेडवळांचें खेडें आपल्या विद्यमानें प्रकाशित करतोस.

तुमचें उभयतांचें समुद्राचें उल्लंघन व

तुमची आकाशांतील मोठी उडी पाहतां तुला मार्तंड म्हणावें किंवा मार्तंडाला मारूती म्हणावें, अथवा याहीपेक्षां दोघांना एकरूप मानावें असें वाटतें. त्या प्रसंगाचे वर्णनांत वाल्मीकीनें तुला ''प्रभामंडळानें युक्त असा सूर्यच काय'' असें म्हटलें आहे. सूर्य जसा तमांतून प्रकाशाकडे नेणारा मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध आहे, तसाच तूंहि अज्ञानांतून ज्ञानाकडे नेणारा भक्तिचा वाटाड्या म्हणून सर्वश्रुत आहेस. ''नांव मारूतीचें घ्यावें। पुढे पाऊल टाकावें'' असें समर्थ म्हणतात; आणि ''काय भक्तिच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा।'' असें तुकोंबाराय तुला विनवितात. सुग्रीव आणि राम यांच्या संधिसमयीचें तुझें सौख्य स्वरूप अहोरात्रींच्या संधिकालच्या सूर्याप्रमाणें सौम्य दिसतें. तेंच तुझें लंकादहनाच्या वेळचें स्वरूप माध्यान्हकाळच्या वृषभेच्या सूर्याप्रमाणें अत्यंत उग्र दिसतें.

हे हनुमंता! सूर्यमाला हेंच आमचें विश्व आहे आणि आम्हांस तेज-धृति-बल-पूर्वक देणारा ह्या विश्वाचा सूर्य हाच साक्षात् आत्मा असल्यामुळें पंचयनांतील प्रत्येक देवाची धारणा सूर्याचें ठिकाणीं करण्याची शास्त्रप्रणाली दिसते. त्याचप्रमाणें तुझ्या उपासनाग्रंथांतहि सूर्यमंडलाचे ठिकाणींच तुझी धारणा सांगितली आहे. सूर्यगोलाहून सौरप्राण अथवा सूर्यमहिमामंडळ फार विशाल आहे. त्याप्रमाणें तुझ्या देहाकृतीहून तूं महाप्राण तत्त्वत: फार मोठा आहेस. महासागरांत एखादा हिमखंड तरंगत असावा, अथवा क्षीरसागरावर नारायण दिसावा, त्याप्रमाणें अपरंपरा अशा प्राणतत्त्वांत तुझी मूर्ति दिसत आहे.

हे मारूते! ''नभासारिख रूप या रावणाचें'' असें समर्थ म्हणतात. त्या घन:श्याम रामाची अर्धांगी उषारूप सीता एकदां उत्तरध्रुवोपपत्तीप्रमाणें दक्षिणेकडील दीर्घतम्या राक्षसानें हरण करून नेली व ती दीर्घकाल दिसेनाशी झाली; तेव्हा तिला शोधण्याकरितां दक्षिणेकडे गेलेला दक्षिणायनबिंदूजवळचा, दीर्घ काळोखाच्या आधीं क्षितिजाखालीं उतरलेला सूर्य, तोच वृषाकपि म्हणजे तूं, असें लोकमान्य टिळक म्हणतात. आणि अरणींतून अग्नि प्रदीप्त करण्याच्या वेळचें ऋग्वेदांतील वृषाकपि सूक्त हें रामायणाचें वैदिक बीज आहे. असें ते मानतात. त्यावरून सूर्य तो तूंच, या कल्पनेस दुजोरा येतो.

हे मारूते! अव्यय, अक्षर आणि क्षर या त्रिमूर्तीतील मधला अक्षररूप जो सूर्य, तो तूं असें वाटतें– आकाशरूप निर्गुण राम हा ज्ञानस्वरूप अव्यय व भूमिरूप सीता ही अर्थस्वरूप क्षरप्रकृति, असें मानलें, तर ज्ञान व अर्थ यांच्याशीं संबंध ठेवणारा मध्यस्थ क्रियाप्रधान तूं हनुमानमार्तंड होय, असें मी म्हणतों. समष्टि बुद्धि आणि शरीर यांस जोडणारा जो महाप्राण, तेंच तुज मार्तंडाचें रूप होय.

हे मारूते! सुवर्चला व पुंजकस्थाला यांचा तुझ्या जन्मकथा संदर्भात उल्लेख येतो. त्या तर सूर्याच्याच शक्ति असाव्यात, असें मला वाटतें. अशा रीतीनेंही सौर तेजाशीं तुज वातनंदनाचा तादात्म्यसंबंध पोहोंचतो.

हे मार्तंडमारूते! रामायणांतील सीता व ऊर्मिला या भूमिकांचे सौभाग्यवर्णन करणारा आणि चंद्रसेनारूप चंद्रकलेला प्रकाश देणारा तुझ्यावांचून दुसरा कोण बरें?

हे हनुमंता! सुग्रीव, बिभीषण आणि राम यांच्या साम्राज्यांच्या वैभवश्रीकडे केवळ साक्षीत्त्वानें पाहाणाऱ्या तुझें नि:संगत्व, मला सूर्याप्रमाणेंच स्पष्ट दिसतें. पृथ्वी, आप आणि वायु यांतील दोष-दैत्याना जाळून टाकणारा मार्तण्ड, दैत्यांची लंका दग्ध करून टाकणाऱ्या तुज मारुतीप्रमाणेंच प्रखर दिसतो. स्वत:ला कोणत्याही लाभाची इच्छा नसतांना केवळ तीव्र कर्तव्यबुद्धीनें व अत्यंत निरलस वृत्तीनें व नियमित रीतीनें संपादित होणारा निष्काम कर्मयोग, स्वर्गात सूर्यरूपानें व पृथ्वीवर तुझ्या रूपानें प्रगट झाला, असेंच दिसतें. त्याचप्रमाणें सामर्थ्य, पावित्र्य, ओज, तेजस्विता, संजीवन, उत्साह इत्यादि दिव्यजीवनकेन्द्रवर्ति गुणसमुच्चयाचे समोरासमोरील तूं आणि सूर्य असे उभयतां उत्कृष्ट आदर्शच आहांत, असें मला वाटतें. म्हणून या दिनमणीच्या ठिकाणींच मी तुज दीनानाथाची धारणा करितों.

वायूचा तूं परमधार्मिक व प्रशंसनीय पुत्र आहेस; आणि बल शौर्य, विद्या, सत्त्व, पराक्रम, उत्कृष्टदक्षता, तेज, क्षमा, धैर्य, स्थैर्य, विनय हे व इतरही उत्कृष्ट गुण तुझ्या ठिकाणीं आहेत; ह्याप्रमाणें भूमिकन्या सीतादेवीनें केलेली तुझी स्तुति म्हणजे भूमिने सूर्याची स्तुति केल्याप्रमाणेंच वाटते. यास्तव असा प्रतापसूर्य तो तूंच.

हे प्रचंड प्रतापसूर्या! तूं आणिसूर्यदोघेहि सुप्रसिद्ध वातनंदनच आहांत. त्यातहि तुझें जें समर्थ रामदासांनीं आपल्या ओजस्वी वाणीनें वर्णन केलें आहे. त्यापुढें सूर्याचें तेजहि फिकें पडतें! श्रीसमर्थ म्हणतात;

त्रैलोकीं पाहतां बाळें
ऐसे तो पाहतां नसे।
अतूळ तूळणा नाहीं
मारूती वातनंदनू॥२/२॥

मार्तंडमंडळाऐसे दोन्ही पिंगाक्ष ताविले।
कर्करां घडिल्या दाढा
उभे रोमांच उठले॥३/४॥

अद्भूत गर्जना केली मेघची वोळले भूमीं।
फुटले गिरिचे गाभे,
तुटले, सिंधु आटले॥३/५॥

अद्भूतवेश आवेशें कोपला रणकर्कशू॥
धर्मसंस्थापनेसाठीं दास तो
उठिला बळे॥३/६॥

झळक झळक दामिनी
वितंड काळकामिनी॥
तयापरी झळाझळीं
लळीत रोम जाळली॥४/७॥

अद्भूत पुच्छ तें कैसें भोवंडी नभ पोकळीं।
फांकलें तेज तें भारी
झांकिलें सूर्यमंडळा॥५/११॥

भुवनदहनकाळीं काळ विक्राळ जैसा॥
सकळ गिळित ऊभा भासला
भीम तैसा॥९/१॥

कपिवर उठला तो वेग अद्भूत केला॥
त्रिभुवन जनलोकीं
कीर्तिचा घोष झाला॥१०/१॥

धन्यावतार केला हा भक्तांलागीं परोपरी।
रामकाजीं उतावेळा
भक्तां रक्षक सारथी॥५/६॥

निस्तेज व हतवीर्य झालेल्या तरूण भारताला खडबडून जागे करण्याकरितां जणूं अग्निशलाकेनें नभस्थलावर श्रीसमर्थांनीं लिहिलेलें हे भीमरूपी स्तोत्र सूर्यप्रकाशापेक्षांहि दिव्य आणि प्रभावी आहे! अर्थात् त्या स्तोत्राचा आत्मा जो तूं, तो तूं कोणत्याहि हतबल झालेल्या राष्ट्रास पुनरुज्जीवित करण्यास समर्थ आहेस; हें मीं काय सांगावें? यास्तव तुझ्या दिव्यगुणचिंतनास सूर्य हें प्रतीक योग्यच आहे.

हे बलभीमा! तू जन्मत:च सूर्याला गिळून टाकलेंस, असें तुझे चरित्रकार सांगतात. तुझ्या उपासनाग्रंथांत तुझी दिव्य प्रभा अनेक कोटि सूर्यप्रभेप्रमाणें वर्णिली आहे. रामाचा सूर्यवंश तूंच उज्ज्वल केलास, असें प्रभू रामचंद्र वरचेवर सांगतात. सूर्यवंश म्हणजे देवयानपंथ असें मानलें, तरी त्याहि पंथाला प्रकाशक तूंच आहेस, असें तुझे बंधू भीमसेन व तुझे स्तुतिपाठक श्री तुकोबाराय सांगतात. सारांश, रुद्र, अग्नि आणि वायु या तिघांचे तेज ज्याच्या ठिकाणीं केन्द्रीभूत झालें आहे, अशा तुज दिव्यपुरुषाची धारणा करण्यास सूर्य हीच विभूति योग्य दिसते. बुद्धिमंतावरिष्ठम् हें तुमचें साधर्म्य आहे.यास्तव समष्टिबुद्धीचे ठिकाणीं अथवा या महाकायरूप देवालयांत प्रकाश आणि गतिरूपांत म्हणजे शबल ज्ञान-कर्मरूपांत विराजमान असणारा सूर्य, अथवा माझ्या हृदाकाशांत अहोरात्र प्रकाशणारा चिदा भासरूप सूर्य तो तूं, अशीच मी तुज महामध्यस्थासंबंधी धारणा करतों. कारण सूर्य हा सौरशक्तिचा जसा एक प्रकाशक गोलक आहे. तसा तूं अथवा अंतर्यामिन् जीव हा आत्मारामकृपाप्रकाशक असा जणूं गोलक आहे.

## चंद्र मारुति

नमामि शशिनं सोमं शंभोर्मुकुटभूषणम् ॥२॥

हे विराट् पुरुषा! हनुमान हें एक व्यापक तत्त्व आहे व पुराणोक्त हनुमान हा त्याचा एक विग्रह आहे, असें ज्याप्रमाणें मी मानतों आहें, त्याचप्रमाणें सोम हें सर्व जीवसमूहांचें प्राणरूप-सर्वमय-असें एक व्यापक तत्त्व आहे व आकाशींचा चंद्र हें एक त्याचें प्रतीक आहे, असें दिसतें. इंद्रादिदेवांना सोम जसा अत्यंत प्रिय, तसाच तूं रामचंद्रादि देवांना अत्यंत प्रिय आहेस. निस्सीम त्याग हें सोमाचें लक्षण आहे. सोमाच्या त्यागातच आदित्याचा तेजोद्भव आहे. सोमाच्या आत्माहुतींतच जगाची प्रतिष्ठा आहे. ह्याप्रमाणें सोमाचें जें ब्रह्मांडांत स्थान आहे, तेंच तुझें रामायणांत अनन्यसाधारण असें स्थान आहे. तुझ्यावांचून रामायणरस आळणी लागला असता, असें मोरोपंत म्हणतात.

हे महारुद्रा! उमेसहित तो सोम, अशी 'सोम' शब्दाची व्युत्पत्ति सांगतात. या सोमाचें राम हेंच आराध्य दैवत आहे व त्याचाच अवतार तूं आहेस.

हे मारुते! वेदांतील सोमसूक्तांत सोम हा अत्यंत बुद्धीमान, सरळ मार्गानें नेणारा, मित्राचें रक्षण करणारा, युद्धामध्यें अजिंक्य, लढाईत शत्रुसेनेच्या पार जाणारा, वीर्याचा अधिपति, यज्ञामध्यें जन्मलेला, कीर्तिमान, आणि विजयी असें सोमाचें वर्णन आहे, ते तंतोतंत तुलाच शोभतें.

हे हनुमंता! भृगु (सोम) आणि अंगिरा (अग्नि) यांच्या अनुयायांची, त्यांनीं तुझें महत्त्व न जाणल्यामुळें, तूं बालपणीं जी कुचाळी केलीस, ती गोपालकृष्णाच्या गोवर्धनलीललंप्रमाणेंच मला उपरोधिक वाटते.

हे मारुते! सूर्याला एक फळ समजून तू त्यावर झेंप घातलीस, हें कवीचें वर्णन तुज चंद्रम्यासंबंधी लाक्षणिक आहे. वस्तूत: सोम आणि आदित्य यांचा संबंध अन्न आणि अन्नाद असा असल्यामुळें, तुझें तें सूर्याच्या ठिकाणी आत्मार्पणच होतें. म्हणूनच तर सूर्यानें प्रसन्न होऊन तुला वेदविद्या शिकविल्या.

हे हनुमंता! प्रवर्ग्य यागांतील सोमपात्र महावीर तो तूंच नव्हेस काय?? तुझ्या स्तोत्रांत तुला हलूखलमुख असें नांव आहे, तेहि सोमपात्रच आहे.

हे मारुते! ऋग्वेदांत एका ठिकाणीं चंद्रम्याचें असें वर्णन आढळतें कीं, ''मेघाच्या आंतून उत्तम पंख असलेला चंद्रमा द्युलोकांत दांवत आहे. त्याच्याकडेचे भाग सुवर्णासारखे तेजस्वी आहेत.'' समुद्रोल्लंघनाच्या वेळचें तुझेंच हें वर्णन नव्हे काय?

हे मारुते! ''चन्द्ररूपश्चन्द्रव न्यश्चन्द्रात्मा चन्द्रपूजक:। चन्द्रप्रेमश्चन्द्र बिम्बश्चामरप्रियचञ्चल: ॥६४॥ चन्द्रवक्त्रश्च कोराक्षश्चन्द्रनेत्रश्चतुर्भुज: ॥६५॥'' हे तुझे रूद्रयामलोक्त स्तोत्र चंद्रमय आहे. यास्तव चंद्राच्या ठिकाणीं तुझी धारणा करणें, हें शास्त्रप्रयुक्तच होईल. तुझ्या स्तोत्रांत तुला कलाधार असेंहि म्हटलें आहे. सूर्यानें ज्या तुला आपल्या तेजाचा शंभरावा अंश दिला असें वाल्मीकी म्हणतो, तो तूं चंद्रमारुतीच, नाहीं तर कोण? सूर्यानें सोळा कला चंद्राला दिल्या, त्याचाच अनुवाद करून भरताने तुला सोळा कन्या दिल्या ही कथा कवींनीं कल्पिली असें दिसतें. सुग्रीव हा सूर्याचाच अवतार व राम हा सूर्याचाच वंशज; तेव्हां त्यांच्यासाठी तूं आपलेंसारें शक्तिसामर्थ्य वेंचणारा चंद्रच नव्हेस काय! सोम ही देवांची शक्ति होय, तसाच तूं हनुमचंद्र होय. सूर्य व अग्नि हे वैदिकांचे देव असोत, पण चंद्रम्याला विचारूनच सारे धार्मिक आचार पाळलें जातात. जसा चंद्रमा, तसाच तूं रामायणांतील मार्गदर्शक आहेस. सूर्यापेक्षांहि चंद्राला उच्च स्थान दिललेलें पुराणांत आढळतें, तसेंच रामायणांतील तुझें स्थान आहे.

सूर्यवंशी आत्मारामाचें यश म्हणजेंच आत्मसूर्याचा प्रकाश वाढावा व त्यांतच आपलें तेज लीन करावें, हेंच तुज रामदासाचें (अथवा मनश्चंद्रम्याचे) उद्दिष्ट दिसतें. म्हणूनच रामसूर्य उदित होतांच त्याच्या यश:प्रकाशांत विरोधान पावणारा पूर्ण चंद्र तूंच, असें मला वाटतें.

हे हनुमंता! तुझा पिता केसरी म्हणजे सिंहाप्रमाणें किरणांचे आयाळ असलेला सूर्य व अंजना म्हणजे रजनी असें मानल्यास, हे आंजनेया! अंजनारूप रात्रीनें पोटीं वाढविलेला पुत्र प्रात:काळीं जन्मतांच, रामरूप सूर्यास अर्पण केला तो तूं हनुमचंद्र होय, असें म्हणावें लागतें, कोणी तुझी जन्मतिथी अमावास्या मानतात. कारण अमावास्येचा चंद्र हीच निस्सीम त्यागाची मूर्ति आहे; व त्यावरून तुझें रामशरणागतिरूप चरित्र रंगविलें गेलें असावें. रामाचे प्रभु रामचंद्र झाले, ते तुज चंद्राचेच लाभानें. राम स्वत: सूर्यवंशी असून त्यांनीं आपल्यानांवापुढें (राम-) चंद्र हें नांव धारण करून त्यांनीं तुझ्या भक्तिचा गौरव करण्यासाठी तुला एक प्रकारें सामीप्यमुक्तिच दिली असें म्हणावेंसें वाटतें!

हे हनुमंता! तूं ऋक्षिबिळांत शिरल्याची कथा रामायणांत प्रसिद्ध आहे. ती लाक्षणिक मानल्यास तें ऋक्षबिळ म्हणजे ज्यांत ऋक्षतारका (चंद्रासह) लपतात. म्हणजे दिसेनाशा होतात, तो दिवस होय. तेथे राहणारी स्वयंप्रभा ही सूर्यप्रभा होय. अमावास्येच्या दिवशीं या ऋक्षबिळांत शिरून बीजेला सायंकाळी बाहेर येणारा तूं हनुमचंद्र होय.

हे मारुते! सीताशुद्धीकरितां समुद्रोल्लंघन करीत असतां तुला जी सुरसा राक्षसी भेटली, ती चंद्रास गांठणारी व मोठी होत

जाणारी रात्र होय. तुला दुसरी भेटलेली राक्षसी सिंहिका, ही तर चंद्राचा ग्रास करणाऱ्या राहूचीच माता म्हणजे छाया होय. ती छायाग्राही होती, असें कवि म्हणतात. तेथें छायेचा अर्थ (चंद्र-) प्रकाश असाच होतो.

हे मारुते! निळ्या आकाशाला कवि समुद्र असेंहि म्हणतात. त्या आकाशरूप समुद्रावरून उडी मारणारा तूं म्हणजे हनुमचंद्रच नव्हेस काय? या दीर्घ उड्डाणांत क्षणभर विसावा देणारा मैनाक म्हणजे एक मोठा पर्वतप्राय ढगच असावा. कारण त्या मैनाकास पंख असून तो आकाशांत उडूं शके, असें वर्णिलें आहे. असा हा बुद्धिग्राह्य उडणारा पर्वत ढगाशिवाय दुसरा कोण? व त्यास स्पर्श करणारा हनुमचंद्रशिवाय अन्य कोण? वाल्मीकीनें त्या वेळच्या वर्णनांत तुला चंद्रच म्हटले आहे, चंद्र हा वनौषधींचा स्वामी आहे. तेव्हां दिव्य वनौषधींचा द्रोणगिरी धारण करणारा तूं चंद्रच असें मी म्हणतों.

हे हनुमंता! मृगशीर्षावरील त्रिकूटचलावर पूर्ण चंद्र गेला असतां तो त्रिकूटाचल जणूं पेटलेलाच आहे, असें पाहून त्रिकूटाचलरूप लंकाच तूं पेटविलीस, अशी कवींनीं कल्पना केली काय?

हे हनुमंता! शाखामृग ही तुझी जीवकोटि आहे. चंद्रालाहि मृग म्हणतात. जिला लोक चंद्रनाडी म्हणतात, ती तुज प्राणस्वरूपाचीच गति होय.

हे मारुते! शास्त्रग्रंथांत सोमाचा वृत्राशींहि संबंध जोडलेला दिसतो. जे पंडित चंद्राचें ठिकाणीं, सीतेला शोधणाऱ्या तुझी धारणा करितात, तेच चंद्राचे ठिकाणीं, सीतेला नेणाऱ्या रावणाचीहि कल्पना करितात. रावण आणि तूं हे तुम्ही ज्या तत्त्वज्ञानाच्या भूमिका आहांत, त्यांतहि बरेंच साम्य आहे असें म्हणतात. चंद्र अणि तूं तुम्ही दोघेहि तमोगुणप्रधान शिवाचे भूषणभूत आहांत. रावण आणि तूं तुम्ही दोघेहि शिवाचे व ब्रह्मदेवाचे वरद पुरुष आहांत. कैकसीनें रावणाला जन्म दिला व कैकयीनें तुला जन्म दिला, असें किंचित् दूरान्वयानें म्हणतां येईल. कारण तिला मिळालेल्या पिण्डांतूनच तुझा जन्म झाला आहे. कैकसी आणि कैकयी यांच्या कामनांत तमोगुणाचें आधिक्य दिसतें, म्हणून रावणाला राक्षस व तुला पशुकोटि मिळाली. शंकरानें रावणास चंद्रहास दिला व ब्रह्मदेवानें तुला भाद्रप्रकाश चंद्र दिला, असें भविष्यपुराण सांगतें. याप्रमाणें तुमच्या दोघांचा रजनीधर-चंद्रयोगच दिसतो. राघवसूर्याच्या ठिकाणीं रावणाचा व तुझा-तुम्हां दोघां चंद्राचा लयच आहे. एकाची विरोधभक्ति तर दुसऱ्याची दास्यभक्ति इतकाच फरक. सूर्याचा जसा चंद्र, तसे रावण आणि तूं रामकार्याचे सिद्ध साधक दिसतां.

हे मारुते! बंध आणि मोक्ष देणारें जसें एकच मन असतें. त्याप्रमाणें हा चंद्रमा अंधार आणि प्रकाश, भरती आणि आहोटी दोन्ही देणारा आहे. ईशनियतींतील हे तीव्र विरोध परिणामीं एकमेकांस पूरकच होतात. याप्रमाणें रावण आणि तूं या परस्परपूरक अशा दोन विरोधी भूमिका दिसतात. तुझ्या जन्मदिवशीं पौर्णिमेचा चंद्र होता किंवा अमावास्येचा चंद्र होता, या चंद्रासंबंधीं विकल्पांतहि रावणाचा रामाशीं विरोध व तुझा निस्सीम त्याग याच भूमिका स्पष्ट होतात.

हे हनुमंता! जगज्जननीं पृथ्वी हीच सीता व जगाचा जनक सूर्य हाच राम, असें म्हटल्यावर त्या दोहोंमध्ये येरझारा घालणारा चंद्र हा कामपूर्ण आहे कीं, निष्काम आहे, तो सूर्यास ग्रासूं पाहणारा आहे किंवा सूर्यप्रभेप्रमाणें त्याचें तेज शक्य तर वाढवूं पाहणारा आहे, तो पृथ्वीदेवीस आपल्या छायेंत छपविणारा आहे किंवा तिला सूर्याखालोखाल प्रकाशानंद देणारा आहे, तो रजनीचर वृत्तीनें तमोगुणी आहे किंवा एकांतिक सात्त्विक आहे, अशा अनेक विरोधी कल्पना संभवतात व त्यामुळें तुज हनुमचंद्रदास रावणकल्पनारूप अहंकाराचा वृथा कलंक लागतो. कांहीं असो, तुमचे बृहत्काय, मायावी स्वरूपें व कार्यभूमि इत्यादि दृष्टीनें रामापेक्षां तूं रावणास तारतम्यानें जवळच होतास, हें खरेंच. म्हणूनच तूं धिप्पाड वानर व तो धिप्पाड राक्षस असे अलौकिक व अमानुष दिसतां! तुझा पिता केसरी याचें वर्णन राक्षसकोटी प्रमाणेंच आढळतें.

हे हनुमंता! रामायणांतील बृहत्काय व सुसंस्कृत असे बोलके वानर हे ऐतिहासिकांस मोठें कोडें पडलें आहे. पण कित्येक अतींद्रिय शक्तिचे संशोधक ही अद्भुत वानरकोटी चंद्रलोकावरून आल्याचें सांगतात. ही गोष्ट खरी असेल, तर चंद्राचें ठिकाणीं तुझी धारणा करण्यांत विशेष स्वारस्य आहे.

हे चिरंजीव बलभीमा! तुझ्यासारख्या महापुरुषाला आपलें सारें बल देऊन चंद्र स्वतांक्षयी बनला, हा त्याचा सर्वात मोठा त्याग होय चंद्रानें सूर्याकडून घेतलेलें बुद्धिसर्वस्व तुला दिलें व चंद्र या जलदेवतेनेंच तुला समुद्र उल्लंघन करण्याचें सामर्थ्य दिलें, असा तूं हनुमचंद्र आहेस, ही धारणा मोठी उध्दोधक आहे.

हे मारुते! सूर्य आणि चंद्र या दिव्य गोलांच्या सापेक्ष संबंधांप्रमाणेंच सूर्यवंशी राम आणि तूं यांचे संबंध फार निकटचे व जिव्हाळ्याचे आहेत व या तुमच्या परस्परांच्या संबंधांत तूं आम्हांला फार जवळचा असा शांत व सुखदायक मध्यस्थ वाटतोस. विजेच्या उत्पादक यंत्राजवळ कोण जाईल? पण विद्युद्दीप हा व्यवहार्य व सुखावह असा प्रेरक वाटतो. यामुळें रामसूर्य आम्हांपासून दूर असला तरी तूं जवळ असावास, हे सुखावह वाटतें.

हे हनुमंता! ब्रह्माण्डावरून पिण्डांतर्गत धारणा करावयाची तर बुद्धिस्थानीं जर सूर्य मानला, तर मनाचे ठिकाणीं चंद्राचीच कल्पना सजते. आत्माराम म्हणजे सूर्य मानला तर मनश्चंद्रमा तो तूं ओघास येतें. मनाचे स्वरूप उभयात्मक आहे. तें सृष्टिसाक्षी आहे व मुक्तिसाक्षी आहे, तें अज्ञानानें तमोरूप किंवा विज्ञानानें सत्त्वरूप बनतें. प्राज्ञ म्हणजे सूज्ञ आणि अज्ञ दोन्ही अर्थ संभवतात. सोम म्हणजे ब्रह्मणस्पति– सोम आणि वृत्त– सोम असा उभयविध मानतात. चंद्र आणि राक्षस दोघेहि रजनीवरच. हे आंजनेया! वानर-देव हें तुझें स्वरूप असेंच उभयविध आहे. त्याची धारणा या ब्रह्मांडांतील कलाधीन चंद्रम्यावर, तशीच त्यास अनुसरून पिण्डांतर्गत मनावर, करणें योग्य दिसतें. कारण मन हे जातीनें चंचल असून साधूहि बनतें. ते बंधाला कारण आहे. तसेंच मोक्षालाहि आहे.

---

# श्री साईंचे सत्य चरित्र

## —अध्याय २४ वा—

गद्य भाष्य टीका–
**ले. कर्नल मु. ब. निंबाळकर** (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

### 'विनोद-विलसितं'
(थट्टा-मस्करीचा खेळ)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्‍गुरु साईनाथांना नमस्कार असो.

मागच्या अध्यायात दयेचे सागर (करुणा+घन) श्री साईनाथ थट्टामस्करीतदेखील कशी शिकवण देत असत ते सांगीन म्हणून मी वचन दिले होते. ''सांगीन'' हा मीपणाचा ताठा (अहंकार) आहे. (चरित्रकाराने) सदा गुरूच्या चरणी मीपणा टाकून (निर्+अहंकार) शरण असावे, म्हणजे कथा आपोआप सांगितली जाईल (कथेला पाझर फुटेल). श्रोत्यांनी ती आदरपूर्वक ऐकावी. सदा कलंकरहित (निर्मल) व पापरहित (निष्+कल्मष) असलेले साधू, सज्जन, महापुरुष ढगाशिवायच्या (निर्+अभ्र) स्वच्छ आकाशाप्रमाणे शुद्ध व कोणत्याही वाईट आचरणाशिवायचे (निर्+दोष) असतात. साई महाराजांचे भजन स्वार्थ (प्रपंचातील हित) आणि परमार्थ (परलोकातील हित) हे दोन्ही प्राप्त करण्याचे साधन आहे, तसेच आत्मस्वरूपाकडे लक्ष लावून जीवाला समाधान देणारे आहे. ज्यांच्या मनात आपले हित साधावयाचे असेल त्यांनी या कथेबद्दल पूज्यभाव धरावा, म्हणजे श्रेष्ठ आनंद भोगावयाला मिळेल आणि जीवाचे सार्थक होईल. ही कथा श्रवण केल्याने श्रोत्यांच्या आत्म्याला शांती मिळेल, संसाराबद्दलची कारणाशिवायची भीती (भव+भय+भ्रांती) दूर होईल, परमानंदाचा लाभ होईल आणि मरणोत्तर चांगली अवस्था किंवा जन्म (सत्+गति) हातोहात (रोकडी) प्राप्त होईल. साईसमर्थ दुसऱ्या माणसाच्या मनातल्या गोष्टी जाणणारे (अंतर्+ज्ञानी) असल्याने, भक्तांच्या भावनेचा हेतू (भाव+अर्थ) ओळखून, त्यासाठी जरूर ते आपले कर्तव्य पूर्ण करून, दिलेल्या वचनांची फेड करतील. साईसमर्थच माझ्या बुद्धीला प्रेरणा देणारे आहेत. तेच आपल्या वचनांचा आशय माझ्याकडून वदवून घेतात. माझ्या बुद्धीप्रमाणे स्वार्थ व परमार्थ साधून देणारा त्याचा तात्पर्यार्थ (सारांश) मी कथन करीन. आंधळे किंवा रातांधळे (ज्यांना रात्री मुळीच दिसत नाही असे) नसतानादेखील व डोळे चांगले असूनदेखील लोक आंधळे असतात (डोळ्यांनी पाहत नसतात). देहबुद्धीच्या योगाने (देह हाच आपला आत्मा आहे अशा भ्रमामुळे) त्यांना आपले हित कळत नसते. हा देह तरी कसा आहे? त्याचा क्षणाचाही भरंवसा नाही (कधीही मृत्युमुखी पडेल). आपणापुढे मी उपरण्याची ओंजळ (पदर-पसा) पसरून कळकळीची विनंती करतो की एक क्षण या कथेची गोडी (रस) चाखा! (ओ. १-१०)

थट्टाविनोदाची सर्वांनाच आवड असते. परंतु बाबांची ती थट्टा विलक्षण तऱ्हेची होती. थट्टेतूनसुद्धा ते सर्वांच्या कल्याणाचे सारच ऐकणाऱ्यांच्या मनात ठसवीत असत. लोक थट्टा करणाऱ्याच्या नादी लागत नसतात. परंतु बाबांच्या थट्टेसाठी मात्र सवकलेले, म्हणजे चटक लागलेले (लांचावती) असत. आपल्या वाट्याला ती कधी येईल याची ते आवडीने वाटच पहात असत. थट्टा बहुधा कोणाला आवडत नसते. परंतु ही बाबांची थट्टा लोकांना फार आवडत असे. त्यातून तिला जेव्हा हावभाव व अंगविक्षेप यांची (अभिनयाची) जोड मिळत असे तेव्हा तिचा हेतू लगेच साधला जात असे. सहजपणे प्रयत्नाशिवाय केलेला अभिनय (सहज अभिनय अप्रयास), हसरा चेहरा (सस्मित वदन) आणि डोळ्यांच्या गमतीदार चेष्टा (नयन+विलास) यामुळे जेव्हा त्यात रुचीची (रस) भर पडत असे तेव्हा त्या थट्टेच्या श्रेष्ठ गोडीचे वर्णन करणे अशक्य होत असे (सुरसता अवर्ण्य). (ओ. ११-१४)

आता माझ्या अनुभवाची नाविन्यपूर्ण आणि थोडी उपदेशाची एक गोष्ट सांगतो. थट्टेतून परमार्थाची शिकवण कशी उद्भवली त्याचे गौरवपूर्ण वर्णन ऐका! प्रत्येक रविवारी शिरडीत आठवड्याचा मोठा बाजार भरतो. उघड्यावर तंबू ठोकून (पाल देऊनि) खरेदीविक्रीचा व्यवहार (उदीम-व्यापार) चालतो. तेथेच मग रस्त्यावर भाजीपाल्याचे ढीगच्या ढीग पडतात आणि तेली (तेल काढून विकणारे) व तांबोळी (विड्याची पाने विकणारे) यांचे समुदाय चौरस्त्यावर (चव्हाटयावर) बसतात. अशा एका रविवारी दुपारी मी बाबांपाशी त्यांचे पाय दाबीत बसलो असताना आश्चर्यकारक गोष्ट घडली (नवलपरी वर्तली). दुपारचा तो दरबार नेहमीच फार खचून (बहु चिकार) भरत असे. त्यातून रविवार आणि बाजारचा दिवस असल्याने पुष्कळ लोकांची अनिवार (आवरण्यास कठीण) गर्दी लोटली होती. बाबांच्या समोर उजव्या (उजू) बाजूला बसून, खाली मान घालून, नामस्मरणासह मी हळूहळू त्यांचे पाय दाबीत (पाद+संवाहन करीत) होतो. माधवराव डाव्या हाताला, वामनराव (नार्वेकर? अ. २९, ओ. १८०-१९०) उजव्या हाताला (दक्षिण+अंगी) आणि श्रीमंत गोपाळराव बुट्टी त्यांच्या नेहमीच्या जागी बसलेले होते. काकासाहेब दीक्षितही तेथेच बसलेले होते. तितक्यात माधवराव हसले आणि ''अण्णासाहेब (चरित्र लेखकाला सर्वजण अण्णासाहेब म्हण्त असत), हे दाणे कसले चिकटलेले (डंसले) दिसत आहेत?'' असे म्हणत त्यांनी माझ्या कोटाच्या बाहीला (अस्तनी) बोटाने स्पर्श केला, तर त्या कोटाच्या वळकट्यांमधून (वळियांमधून) दाणे आढळले. ते कसले म्हणून पाहू जाता आणि डावे कोपर लांब करता खाली फुटाणे (भिजवून व भाजून खाण्यालायक केलेले हरभऱ्याचे दाणे) गडगडत पडताना आणि मंडळी ते टिपताना दिसले. मंडळींनी टिपून टिपून गोळा केले ते पाच-पंचवीस फुटाणे भरले आणि तेच थट्टेला कारण झाले. हे असे कसे घडले, यावर मंडळींचे तर्क चालले. जो तो विचारात गर्क झाला. फुटाण्यांचा कोटाशी संपर्क (संयोग) कसा झाला, याचे सगळ्यांना आश्चर्य वाटले. खाकी कोटाच्या वळ्या (सुरकुत्या) त्या किती आणि त्यात हे एवढे दाणे राहिले (सामावती) तरी कसे? ते कोठून कसे आले, हे कोणालाही निश्चितपणे कळेना! मी नामस्मरणी लय (नामीं अनुसंधान) लावून बाबांचे पाय चेपीत असता हे मध्येच फुटाण्याचे आख्यान कोठून उत्पन्न झाले? इतका वेळ सेवा करीत होतो तेव्हा हे का मुळीच पडले नाहीत? इतका वेळ तेथे राहिलेच कसे, याचे सगळ्यांच्या मनाला आश्चर्य वाटले. ते फुटाणे कोठून आले, कोटाच्या बाहीच्या वळीत ते अडकून राहिले (स्थिरावले) कसे, याचे जो तो आश्चर्य करू लागला. तेव्हा मग बाबा काय म्हणाले ते ऐका! (ओ. १५-३०)

शिक्षणाच्या (बोध देण्याच्या) अनेकांच्या अनेक वेगवेगळ्या पद्धती असतात. साई महाराज ज्याची जशी पोहोच किंवा प्रगती (गति) असेल त्याप्रमाणे त्याला शिकवण देत असत. त्यांची पद्धत विलक्षण (विचित्र) होती आणि त्यांची रीत (सरणी) फार मजेची व आठवणीत ठेवण्याजोगी (स्मरणीय) होती. दुसरीकडे पाहिल्याचा किंवा ऐकल्याचा अनुभव मला नाही. बाबा म्हणाले, ''ह्या हेमाडपंताला एकेकटे खाण्याच्या आवडीची वाईट सवय (खोड) आहे. आज बाजाराचा दिवस साधून हा भरपूर फुटाणे खाऊन (रगडीत) आला. एकेकटे खाणे बरे नव्हे. पण याची खोड मला माहीत आहे. हे फुटाणेच त्याची साक्ष (पुरावे) आहेत. त्यासाठी उगाच आश्चर्य कशाला करावयाचे!'' त्यावर मी (हेमाडपंताने) म्हटले, ''कोणाला दिल्याशिवाय एकटे खाणे माझ्या मनाला ठाऊक नाही. या वाईट सवयीची वार्ता मला लागू केली तरी लागणे शक्य नाही (अंगी चिकटता चिकटेना). बाबा, मी आज या घटकेपर्यंत शिरडीचा बाजार पाहिला नाही. तेथे गेलो तरच फुटाणे घेणार आणि खाण्याची गोष्ट तर मग नंतरच! दुसऱ्या कोणाला फुटाणे एकेकटे खाण्याची गोडी असेल; परंतु मला तशी खोडी नाही. दुसऱ्या कोणाला आधी थोडी दिल्याशिवाय कोणतीही वस्तू मी तोंडात टाकीत नाही.'' त्यावर मग एखाद्याची आपल्या पायी भक्ती जडविण्याची बाबांची युक्ती पहा! माझे स्पष्टीकरण ऐकून ते काय म्हणाले तिकडे लक्ष द्या! ''जवळ (सन्निध) असेल त्याला तू देतोस; पण कोणी नसेल तर तू तरी काय करणार! मीसुद्धा अशा परिस्थितीला काय करणार! पण मला आठवतोस का? मी नाही का तुझ्याजवळ! मला एखादा घास (कवळ) देतोस का?'' अशाप्रकारे फुटाण्याचे केवळ निमित्त (मिष) करून बाबांनी एक कायम टिकणारे (निश्चळ) तत्त्व ठसविले. इंद्रियाधिष्ठित व इतर देवता, प्राणापानादी पंचप्राण व गार्हपत्यादी पंचाग्नि यांना फसवून (यांच्याप्रित्यर्थची कर्मे टाळून) (देवता-प्राण-अग्नि-वचन) आणि वैश्वदेवानंतर (रोज भोजनापूर्वी अग्नीला आहुती देण्याच्या विधिनंतर) अतिथीला (अचानक येणाऱ्या पाहुण्याला) सोडून (वर्जन) जे लोक जेवण (पिंड-पोषण) करतात त्यांचे ते अन्न दूषित समजावे. (मागे अध्याय ९ मधील ओ. ५२-६३ मध्ये पंचसूनादी पातकांचा क्षय होण्यासाठी गृहस्थाला करण्याच्या पंचयज्ञाबद्दल सविस्तर विवरण आले आहे. त्यातील ब्रह्मयज्ञ सोडून राहिलेले चार यज्ञ, म्हणजे देवयज्ञ, भूतयज्ञ, पितृयज्ञ व मनुष्ययज्ञ यांचा समावेश वर म्हटलेल्या वैश्वदेवकर्मात होतो. बलिवैश्वदेव केल्याने मनुष्याच्या सर्व पापांचा नाश होतो. हा केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या अन्नाला 'यज्ञशिष्ट' अन्न म्हणतात. गीतेच्या अ. ३ मध्ये श्रीकृष्ण भगवानांनी म्हटले आहे, **यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः। भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्॥१३॥** यज्ञातील शेष राहिलेल्या भागांचे सेवन करणारे सद्‌गृहस्थ सर्व पापांपासून मुक्त होतात. परंतु जे केवळ आपल्यासाठीच अन्न शिजवितात (आणि सेवन करितात) ते पापी लोक पापच भक्षण करतात. ही झाली शास्त्रोक्त विधिची शिकवण. परंतु बाबांची शिकवण अत्यंत व्यवहारी असे. भोजनाच्या वेळी हा विधि पाळला, हे खरे; परंतु इतर वेळा आपण जे काही खातो त्याचे काय? ते हावऱ्यासारखे आपलपोट्याप्रमाणे दुसऱ्याला न देता खायचे का? असे केले तर या विधिचे मूळ तत्त्वच न पाळल्यासारखे होईल. म्हणून बाजारात घेतलेले चणेसुद्धा दुसऱ्याला देऊन मगच स्वतः खावेत. पण कोणीच जवळ नसले तर काय करावे? अशा प्रसंगी परमेश्वराला किंवा गुरूला

आठवून त्यांना ते अर्पण करावे. किती व्यावहारिक बाबांची ही शिकवण!) (ओ. ३१-४१)

हे दिसायला अगदी लहान तत्त्व वाटेल; परंतु व्यवहारात लावले तर ते अतिशय महत्त्वाचे आहे, हे लक्षात येईल. जिभेने घेण्याबद्दल (रस+स्वादन), म्हणजे तोंडाने काही खाण्याबद्दल जे सांगितले ते फक्त किंचित् लाक्षणिक सांगणे झाले. खऱ्या अर्थी हे पाचही विषयांसाठी (शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध) आहे. ज्या माणसाला विषयांचा उपभोग घेण्याची हाव (हव्यास) असते त्याला परमार्थाचा लाभ होत नसतो. विषयांवर जो ताबा मिळवितो (घालील कास) त्याचा परमार्थ दास होतो. ''यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह। बुद्धिश्च न विचेष्टति तामाहुः परमां गतिम्॥१०॥'' (योगाभ्यास करता करता जेव्हा मनासहित पाचही इंद्रिये अगदी स्थिर होतात आणि बुद्धीदेखील कोणतीही चेष्टा करण्याचे थांबविते त्या स्थितीला योगाची सर्वोत्तम स्थिती म्हणतात.) असे जे कठोपनिषदाच्या अ. २, वल्ली ३ मधील या मंत्रात म्हटले आहे तेच बाबा या थट्टेच्या निमित्ताने आणखी ठसवीत होते. शब्द, स्पर्श, रूप व गंध या बाकी चार विषयांचा याच गोष्टीशी संबंध आहे, हे दाखवून प्रस्तुत कथेशी जुळणारे किती बोधप्रद बाबांचे हे व्याख्यान (प्रबंध)! बाबा म्हणत, ''मन, बुद्धी वगैरे इंद्रियगण विषयांचा उपभोग घेण्यास लांचावले की भक्ताने आधी माझे स्मरण करावे, म्हणजे ते विषय हळूहळू (अंश-अंशे) मलाच अर्पण होतील. इंद्रिये विषयांशिवाय राहतील असे कधीच (कल्प+अंतीं) घडणार नाही. परंतु त्यांना जर गुरुचरणीं अर्पण केले तर त्यांच्याबद्दलची आसक्ती सहज कमी होईल. कोणतीही इच्छा (काम) उत्पन्न झाली तरी ती माझ्याविषयीच करावी. राग (कोप) आला तरी माझ्यावरच रागवावे. अभिमान (गर्व), दुराग्रह (हटवादीपणा) इत्यादीसुद्धा भक्तांनी माझ्याच पायी समर्पण करावेत. काम, क्रोध, अभिमान वगैरे वृत्ती जरी कडकडून (जोराने) उफाळून आल्या तरी त्या एका माझ्याकडे नेम धरून सरळ (निक्षून) सोडून द्याव्यात. या रीतिने क्रमाक्रमाने असल्या वृत्तींचा श्रीहरी नायनाट (निकृंदन) करील आणि ह्या काम, क्रोध, अभिमानरूपी विषारी (नैतिकदृष्ट्या घातक) त्रिकुटांच्या लहरी तो गोविंद दूर करील (परिहरील). किंबहुना या सर्व क्षुब्ध मनोवृत्ती (विकार-जात) माझ्या स्वरूपातच लय पावतील किंवा त्या माझे स्वरूपच बनतील आणि माझ्या ठिकाणी शांत होतील. असा सराव होत गेला (होता अभ्यसन) म्हणजे वृत्ती आपणच शक्तिहीन (क्षीण) होतील आणि कालांतराने त्यांचे निर्मूलन होऊन मन वृत्तिशून्य होईल. गुरु सर्वकाळी जवळ (सन्निधी) आहे, अशी ज्याची भावना पक्की झाली असेल त्याला विषय अशाप्रकारे कधीही त्रास देत नसतात (न बाधी कदाही). जेथे असली चांगली भावना रुजली असेल तेथेच संसाराच्या बंधनाचा उकल झाला समजावे. प्रत्येक विषयांमध्ये (इंद्रिये व मन यांना गोचर प्रत्येक वस्तूंमध्ये) गुरू प्रकटला किंवा विषयांच्या रूपाने गुरू स्वतःच नटला म्हणजे थोडासुद्धा विषयांचा उपभोग घेऊ लागता बाबा अगदी जवळ (संनिधानी) आहेत, या भावनेमुळे ते विषय भोगण्यास योग्य आहेत की अयोग्य आहेत (सेव्य+असेव्यता), याचा विचार मनात उठेल, असेव्य (भोगण्यास अयोग्य) विषय सहजच सुटतील (टाकले जातील), व्यसनी भक्तांचे व्यसन (वाईट संवय) मोडेल आणि दृढ अभ्यासाने मन मूळ ठिकाणी (नेहटें) वळविले म्हणजे असेव्य विषय भोगणे त्याला नकोसे होईल (मनही विटे असेव्यार्थी). मग तो विषयांना दाबात ठेवण्यासाठी तत्पर (नियमनीं सादर) होईल. वेद हे त्या सर्व नियमांचे मूळ स्थान (आकर) आहेत. त्यातील नियमांप्रमाणे तो मग विषयांचे सेवन करील आणि मन मानेल तसे आचरण करणार नाही (स्वेच्छाचार वर्तना). अशी मनाला सवय लागली म्हणजे विषयांबद्दल विचार (कल्पना) क्षीण होत जातील आणि गुरुभजनाची आवड उत्पन्न होऊन शुद्ध ज्ञानाला अंकूर फुटेल. मग शुद्ध ज्ञान वाढीला लागले की देहबुद्धीचे (मी आत्मा नसून देह आहे व सर्व कर्मांचा मीच कर्ता आहे अशा भ्रमामुळे उत्पन्न झालेले) बंधन (बेडी) तुटेल; आणि मग तीच बुद्धी अहंब्रह्मी (मीच ब्रह्म, म्हणजे परमेश्वर आहे, अशा विचारात) बुडी देईल आणि अनेक प्रकारचे सुख (सुख+निरवडी) प्राप्त करील. हा देह जरी क्षणभंगूर असला तरी त्यामुळेच परमपुरुषार्थ साध्य होतो आणि प्रत्यक्ष मोक्षापेक्षाही अधिक श्रेष्ठ अशा भक्तियोगाचा लाभ होतो. (खऱ्या भक्तांनी भक्तीच्या सुखापुढे मोक्ष सदा तुच्छच मानला आहे. तुकाराम महाराज म्हणतात **''मोक्ष तुमचा देवा। दुर्लभ तो तुम्ही ठेवा। मज भक्तीची आवडी। नाही अंतरी ते गोडी॥''** दुसऱ्या एका अभंगात तर ते भक्तीसाठी देवाला **''गर्भवासी सुखे घालावे आम्हासी''** अशी विनंती करतात. एकनाथ महाराजही म्हणतात, **''वारंवार जन्म घेऊ। परि पाहू पंढरपूर॥''**) चारही (धर्म, अर्थ, काम, मोक्ष) पुरुषार्थांच्यावर या पाचव्या (पंचम) पुरुषार्थाची (म्हणजे भक्तियोगाची) पायरी (योग्यता) आहे. या भक्तियोगाची (मार्गाची) सर कोणालाच येणार नाही. भक्तीची तऱ्हा (परी) अलौकिक आहे. गुरुसेवेमुळे जो कृतार्थ (आयुष्यातले आपले साध्य गाठले आहे असा) होईल त्यालाच याचे वर्म नीट कळेल. तोच परमार्थाची प्राप्ती करू शकेल. गुरू आणि देव यात ज्याचे मन भेद (वेगळेपण) पाहील त्याने संपूर्ण (अखिल) भागवतात भगवंत (श्रीकृष्ण भगवान) पाहिलाच नाही आणि संपूर्ण रामायण वाचून रामाची सीता कोण, हे त्याला कळलेच नाही, असे समजावे. म्हणून वेगळेपणा पाहण्याचे सोडून (सांडुनिया द्वैत-दर्शन) गुरू आणि देव हे एकच (अभिन्न) जाणावेत. दोषरहित (निर्मळ) गुरुसेवा घडली म्हणजे विषयांबद्दलची लालसा मूळासकट नाश पावेल, चित्त शुद्ध पापरहित (सोज्ज्वळ) होईल आणि आपले पवित्र व तेजस्वी रूप प्रगट होईल. (ओ. ४२-६५)

मनात प्रबळ इच्छा झाली तर फुटाणे काढणे हा तर बाबांचा हातचा मळ (सहज होणारे काम) असेल. एवढेच काय, काळवेळ न लागता त्याहून विलक्षण खेळही ते करतील. लोकांत प्रचलित असलेला (लौकिकी), नजरबंदीचे प्रयोग करणारा जादूगार (ऐंद्रजाली गारुडी) केवळ पोट भरण्याच्या आकर्षणामुळे (ओठी) मोह पाडणारी (भारली) हाडाची कांडी (काठी) फिरवून पाहिजे ते (माने जे) पदार्थ काढतो. परंतु साईनाथ हे अलौकिक जादूगार आहेत. त्यांच्या खेळाचे केवढे सामर्थ्य (प्रौढी)!

मनात आले तर एका क्षणात (चिपडी) असंख्य (अगणित) फुटाणे ते काढतील. पण या कथेचे सार काय याचाच आपण विचार करू या (घालू ठाय)! पाचापोटी (शब्द, स्पर्श, रस, गंध, रूप या पाचही विषयांतील) कोणताही विषय बाबांशिवाय सेवू नये, ही शिकवण जर मनाला दिली तर वेळोवेळी काही देता-घेता साईंच्या चरणांची आठवण होईल आणि नियमानुसार विषयांचे सेवन करण्याकडे लक्ष (अनुसंधान) राहील. या शुद्ध ब्रह्माची (निर्गुण तत्त्व परमेश्वराची) सगुण (आकार व गुणांसहित) मूर्ती डोळ्यासमोर निश्चितपणे राहील, भक्ती, मुक्ती आणि विरक्ती यांचा उदय होईल आणि परमश्रेष्ठ अवस्थेची, म्हणजे मोक्षाची प्राप्ती होईल. बाबांचे सुंदर रूप (ध्यान) डोळ्यांनी पाहून संसारातील इच्छा-वासना (भूक-तहान) नाहीशा होतील, ऐहिक (इह लोकातील) सुखांचे भान राहणार नाही आणि मनाला समाधान लाभेल. (ओ. ६६-७२)

ओवी (दळताना किंवा मुलांना निजविताना वगैरे स्त्रिया जे गाणे म्हणतात ते) आठवू जाता आठवत नाही. परंतु जात्यावर दळण्यासाठी बसल्यावर ती आठवते. तशीच ही हरभऱ्याच्या दाण्याची, म्हणजे फुटाण्याची गंमत (चणक+लीला) सांगत असताना सुदामाची (श्रीकृष्णाच्या बालमित्राची) कथा आठवली. एकदा बलराम (श्रीकृष्णाचा थोरला भाऊ), श्रीकृष्ण आणि सुदामा विद्यार्जनासाठी सांदीपनी गुरुंच्या आश्रमात राहिले असताना कृष्ण व बलराम यांना अरण्यातून लाकडे आणण्याच्या कामासाठी पाठविण्यात आले. गुरुपत्नीच्या आज्ञेने (नियोगें) कृष्ण व बलराम अरण्याकडे निघाले तो त्यांच्यामागे तिने लगेच सुदाम्याला पाठविले. त्यांच्यापाशी गुरुपत्नीने चणे (फुटाणे) दिले आणि ''अरण्यात फिरताना भूक (क्षुधा) लागली तर हे चणे तुम्ही तिघेही खा'', असे सांगितले. पुढे रानात कृष्ण भेटला आणि सुदाम्याला ''दादा, तहान लागली आहे'', असे म्हणाला. परंतु सुदाम्याने फुटाण्याची गोष्ट केली नाही. उलट कृष्णाला तो काय म्हणाला, ते ऐका! ''अनेशेपोटी (पोटात काही अन्न घेतल्याशिवाय) पाणी पिऊ नये. थोडा विसावा घे! मग पाणी पी!'' परंतु सुदामा, हे चणे खा! असे म्हणाला नाही. नंतर कृष्ण सुदाम्याच्या मांडीवर विसाव्यासाठी आडवा झाला (पहुडला). मग कृष्णाचा डोळा लागलेला पाहून सुदामा चणे खाऊ लागला. तेव्हा कृष्ण (जागा होऊन) म्हणाला, ''दादा, काय हो खाता? हा आवाज कसला येतोय?'' पण सुदाम्याने उत्तर दिले, ''येथे खायला काय आहे रे! थंडीने दात (दंत+पंक्ती) थुडथुड वाजत आहेत. तोंडाने धड विष्णुसहस्त्रनामही स्पष्ट म्हणता येत नाही.'' (हे श्री विष्णू भगवानांच्या एक हजार नावांचे प्रसिद्ध स्तोत्र महाभारतात अनुशासन पर्वातील अध्याय १४९ मध्ये आलेले आहे. ''या लोकात एकच उपास्य देव कोणता व कोणत्या एका देवाची स्तुती व पूजा केल्याने मनुष्याचे परम कल्याण होईल?'' असा युधिष्ठिराने प्रश्न विचारल्यावरून भीष्म पितामहांनी हे स्तोत्र त्याला सांगितले. त्याआधीसुद्धा श्रीकृष्णाच्या बालपणी ऋषींच्या आश्रमांतून बालशिष्यांना हे स्तोत्र पढविले जात असे, हे प्रस्तुत सुदाम-कथेतून आपल्याला जाणवते. त्यावरून या स्तोत्राची भारतात पूर्वापार चालत आलेली थोरवी वाचकांच्या लक्षात येईलच. पण पुढे अध्याय २७ मध्ये साईबाबा आपल्या लाडक्या शाम्याला याच विष्णुसहस्त्रनामाचा बोध बळेच देतील. ते वाचून या स्तोत्राचे अपार महत्त्व वाचकांना आणखीच पटेल. असो.) सुदाम्याचे असे उत्तर ऐकून सर्वसाक्षी (ज्याला सर्वकाही दिसते असा) परात्पर (सर्वश्रेष्ठ परमात्मा) कृष्ण म्हणाला, ''हो, खरोखर, मलाही तसेच स्वप्न पडले. एकाची वस्तू दुसरा खात असताना त्याला एकाने विचारले, ''काय रे खातोस?'' त्याने उत्तर दिले, ''काय खाऊ, माती?'' त्यावर वाग्देवता (वाणी) ''तथास्तु (तसेच होवो)!'' म्हणाली. अरे, हे स्वप्नच बरे का दादा! मला टाकून तुम्ही कधी काही खाल का! ''काय खाता?'' हा प्रश्नसुद्धा मी स्वप्नाच्या नादात विचारला.'' पूर्वाश्रमी सुदामजीला कृष्णाची ही लीला ठाऊक असती तर त्याच्या हातून ही चूक (प्रमाद) घडली नसती आणि त्याचा परिणाम भोगावा लागला नसता. तो परिणाम तरी काय साधारण होता! अठरा विश्वे अत्यंत (घन) दारिद्र्य त्याला भोगावे लागले. म्हणून जे लोक एकेकटे खातात, त्यांनी हे लक्षात ठेवावे! साक्षात् कृष्ण परमात्मा ज्याचा सखा (मित्र) असा हा सुदाम्यासारखा भक्त नीतीस यत्किंचित पारखा झाल्यामुळे (सदाचाराचे थोड्या प्रमाणातही नियम मोडल्यामुळे) त्याला संसारात जोराचा फटका (धोका) बसला. पण त्याच सुदाम्याने पुढे आपल्या पत्नीने स्वत:च्या कष्टाने मिळविलेले (स्व+स्त्री+कष्ट+अर्जित) मूठभर पोहे कृष्णाला प्रेमाने अर्पण केल्यावर कृष्णाने प्रसन्नचित्त होऊन त्याला ऐश्वर्याने तृप्त केले. असो. (ओ. ७३-८७)

आता आणिक एक बोध देणारी गोष्ट सांगतो. आधी ती थट्टेच्या आनंदाचे सुख देईल आणि मग शेवटी मुख्यत्वेकरून उपदेशपर ठरेल. कोणाला परमार्थाचा उपदेश आवडतो, कोणाला तर्काचा युक्तिवाद आवडतो, तर कोणाला थट्टाविनोद आवडतो. एकूण सगळ्यांना आनंदीआनंद हवा असतो. या गोष्टीतसुद्धा एक थट्टाच होती. एक बाई व एक बुवा हट्टाला पेटले आणि साईंच्या दरबारात तंटा माजला (भांडण झाले). परंतु काही बट्टा न लागता (बदनामी न होता) तो सुटला. ही कथासुद्धा मोठी रसाळ (परम सरस) आहे आणि श्रोत्यांना पुष्कळ (बहुवस) आनंद देणारी आहे. भक्त एकमेकांशी (अरस-परस) भांडत असताना हास्यरस (नवरसांपैकी पांचवा रस) उत्पन्न होईल (पिकेल) (सर्वांना हास्याची उकळी फुटेल). भक्त दामोदर घन:श्याम, ज्यांचे आडनाव बाबरे होते; परंतु अण्णा चिंचणीकर हेच ज्यांचे प्रचारातले नाव होते, त्यांचे बाबांवर अमर्याद प्रेम होते. त्यांचा स्वभाव मोठा झणझणीत, तिखट (खरमरीत) होता. ते कोणाची भीडभाड (मुर्वत) धरीत नसत. योग्य असो का अयोग्य असो (विहित+अविहित), अगदी स्पष्ट, उघड बोलत असत; मग त्याचा परिणाम हितकारक होईल की अनहितकारक होईल, हे ते बघत नसत. अण्णांचा स्वभाव जितका कडक (तापट) तितकाच सज्जन आणि सत्त्वगुणांनी युक्त (सालस व सात्विक) होता. त्यांच्या डोक्यावर जणूकाय भरलेली बंदूकच होती. तिच्या कानात ठासण्याची दारू चिकटविली की लगेच आगीचा डोंब उसळत

असे (लाविता रंजूक भडका घे) (थोड्याश्या निमित्ताने त्यांचे डोके एकदम भडकत असे). कोणतेही काम ते तडकाफडकी करीत असत. त्यात उधारीची वार्ताच नसे. कोणाची पर्वा न करता त्यांचा रोखठोक (अगदी स्पष्ट) व्यवहार असे. एखादेवेळी विस्तव हातात धरता येईल, पण अण्णा त्यापेक्षाही अति कडक (प्रखर) होते. असे असूनही त्यांचा स्वभाव अगदी निष्कपटी (खोटेपणा नसलेला सरळ) होता आणि म्हणूनच साईबाबांचे त्यांच्यावर प्रेम होते. (हे अण्णा चिंचणीकर स्वत: आणि त्यांचे कुटुंब हे दोघेही श्री साईबाबांची फार भक्ती करीत आणि त्यासाठी कित्येक वर्षे शिरडीत येऊन राहिले होते. अण्णांचे कुटुंब थोड्या वर्षांवर आपल्या गावी असतानाच वारले व त्यांच्या पाठीमागून लवकरच अण्णाही आपल्या गावी असतानाच कैलासवासी झाले. त्यांनी आपली स्थावरजंगम सर्व इस्टेट मोठ्या प्रेमाने श्रींच्या खर्चासाठी श्री शिरडी संस्थानला अर्पण केली. चावडीची दुरुस्ती अण्णांचे कुटुंब लक्ष्मीबाई बाबरे यांच्या नावाने झालेली असून समाधिमंदिराच्या सभामंडपासाठी अण्णांच्या ट्रस्टमधून मोठी रक्कम खर्च केली गेली. तशी त्या इमारतींवर नोंदही कोरलेली आहे. चिंचणी गांव ठाणे जिल्ह्यात आहे.) असो. (ओ. ८८-९६)

असेच एकदा दुपारी मशिदीत भरलेल्या दरबारात कठड्यावर डावा हात ठेवून बाबांची स्वारी बसली होती. बाबा असे तटस्थपणे बसत असत. मग नकळत भक्तांमध्ये भांडणे लावून देत असत आणि रागावणे, रुसणे संपले की शेवटी दोन्ही बाजूंना समजावून शांत करीत असत. कोणी बाबांची कूस (कांखेखालची शरीराची बाजू) दाबून, कोणी पाय हळूहळू चेपून, तर कोणी पाठपोट दाबून बाबांची नानाप्रकारे सेवा करीत असत. बाबा बालब्रह्मचारी (लग्न न झालेले व लहानपणापासून स्त्रीसंग न घडलेले), उर्ध्वरेते (आमरण स्त्रीसंग न करण्याचे व्रत घेतलेले किंवा मारुतीप्रमाणे वीर्य कधीही स्खलन न होता सदोदित वर चढलेले असणारे) आणि शुद्धाचारी (निष्कलंक पवित्र वर्तन असलेले) होते. पुरुष व स्त्री ह्या सर्वांना सरसकट सेवाचाकरी करू देत असत. अण्णा कठड्याबाहेर पुढे वाकून (ओणवे राहती) बाबांचा डावा हात दाबीत होते, तर उजव्या बाजूची परिस्थिती कशी होती, ते स्वस्थ चित्ताने ऐका! तिकडे बाबांच्या चरणी अनन्य भक्ती असलेली एक बाई होती, जिला बाबा आई म्हणत असत आणि इतर लोक मावशीबाई म्हणत असत. तिचे मूळ नाव वेणूबाई होते व आडनाव कौजलगी होते. तिचा साईचरणी अनुपम (ज्याला तुलना नाही असा) सर्वश्रेष्ठ भाव होता. अण्णांची पन्नाशी उलटली होती (वय पन्नासाच्या पुढे होते). तोंडात दात नव्हते (बत्तिशी नव्हती). मावशीबाईदेखील वयस्कर होती. ह्या दोघांमध्ये तंटा उद्‌भवला (भांडण लागले). अण्णा आपल्या कुटुंबासह बाबांची सेवा करीत असत. मावशीबाई विधवा (विगत+धवा, म्हणजे पती निधन पावलेल्या) होत्या. बाबांचे पोट आणि काखेखालच्या दोन्ही बाजू दाबताना त्यांना श्वासोच्छ्वास आवरता येत नव्हता (धाप लागत होती). मावशीबाई मनाच्या निर्मळ होत्या आणि साईबाबांची सेवा करण्याची त्यांची शक्ती दांडगी (सबळ) होती. दोन्ही हातांनी पीळ देऊन बाबांचे पोट त्या मळून काढू लागल्या. पाठीमागून ओटीपोटापर्यंत (निरणा+वेरी) बाबांना दोन्ही हातांनी धरून ताक करण्याच्या मथनी किंवा रवी (डेरी) प्रमाणे त्यांना दाबदाबून घुसळू लागल्या. साईनामी लय लावून मावशीबाई निर्भीडपणे दाबू लागल्या. बाबासुद्धा हायहुय करीत नव्हते. जणूकाय त्यांना काही त्रासच वाटत नव्हता (वाटे निरामय जणूं तया). दाबण्याची विलक्षण तऱ्हा होती. पोट व पाठ सपाटच होत असे. ह्या सर्वांचे मूळ जरी मावशीबाईंचे बाबांवरचे प्रेमच होते तरी पाहणाऱ्याच्या मनात (बाबांच्या शरीराचे काय हाल होत आहेत असे वाटून) दयाच उपजत असे. परंतु आपल्यावरचे हे निष्कपट प्रेम पाहून बाबा ही अनुत्तम (ज्यापेक्षा आणखी उत्तम नाही अशी) सेवा, भक्तांना आपली सदा आठवण राहून त्यांचे कल्याण व्हावे (घडो क्षेम) म्हणून स्वीकारीत असत. आपली एवढी काय मोठी तपश्चर्या की ज्यामुळे हा संतांचा सहवास आपल्याला लाभावा? परंतु साईच दीनांवर नि:संशय प्रेम करणारे आहेत. ते भक्तांची उपेक्षा करीत नसतात (सेवेमुळे त्रास झाला तरी गप्प बसतात व सेवा करणाऱ्याला झिडकारीत नाहीत). काय त्या हेलकाव्याची (खालीवर हलण्याची) कुसरी (कौशल्य)! बाबा खालीवर हलत आणि मावशीबाईपण तशीच हलत होती. सेवेची खरेच ही आश्चर्यकारक तऱ्हा होती. अण्णा पुढे वाकलेले होते; पण हलत नव्हते (स्थिर होते). बाई आपल्या सेवेत अगदी गढून गेलेली (चूर) होती. त्यामुळे तिचे तोंड खालीवर होत होते. अशावेळी मग काय प्रकार घडला तो पहा! साईसेवेच्या आनंदात पोट मळताना, खालीवर होत असताना (खातां झोकां) बाईचे तोंड अण्णांच्या तोंडासमोर आले. ती संधी पाहून आधीच मोठी थट्टेखोर असलेली मावशीबाई म्हणाली, ''काय हो अण्णा इष्कबाज (नादी)! आधी माझा मुका (चुंबन) मागता! माझा मुका घ्यावयाला पांढऱ्या केसांची (म्हातारपणाची) लाज नाही का वाटत?'' मावशीबाई असे बोलल्यावर अण्णांनी अस्तन्या वर सरकावल्या (बाही सरसावून भांडावयाला तयार झाले) व म्हणाले, ''मी इतका थेरडा (म्हातारा) झालो तो अगदीच का मूर्ख वेडा असेन (तुझा मुका कसा मी मागेन)! तूच तोंडाला तोंड लावून माझ्याशी भांडायला तयार झालीस (सजलीस).'' बाबांना दोघांविषयी मनापासून काळजी (कळकळ) होती. त्यांच्यात भांडण (कळ) लागलेले पाहून दोघांनाही शांत (शीतल) करण्यासाठी त्यांनी एक नामी (प्रबळ) युक्ती केली. ते प्रेमाने म्हणाले, ''अरे अण्णा! उगाच का हा दणाणा (रागाने आरडाओरड) मांडलास? आपल्या आईचा मुका घेण्यात गैर (अनुचित) काय आहे बरे?'' हे ऐकून ती दोघेही मनात लाजली (विरमली). थट्टेचे शब्द (विनोद वाणी) आपल्या ठिकाणीच राहिले (ठायींच जिरली) आणि प्रेमपूर्वक हास्याची उकळी फुटली. थट्टा सगळ्यांनाच फार आवडली (रुचली अवघियां). पाहू जाता गोष्ट ही लहान आहे. परंतु मर्म जाणणारे (मार्मिक) श्रोते तिची गोडी चाखतील, म्हणजे त्यांना कोणाला आपल्या जागी गप्प कसे बसवावे, याचे अनेक प्रकार हातोहात दिसू लागतील (ठाय कैसा घालावा हे परवडी, कथेत रोकडी दिसेल). मायलेकरात जशी प्रीति असते तशी प्रेमाची

भावना (बुद्धी) ह्या दोघांत असती तर हे भांडण (कळ) उद्‌भवलेच नसते आणि क्रोधाची भावना उठलीच नसती. चाबकाने मारल्यावर जोराने हसू येते आणि फुलांच्या वर्षावाने (माराने) सपाटून रडू येते. मनावर उठणाऱ्या शोक, आनंद वगैरेच्या लहरी मनाच्या कल्पनेवर किंवा समजुतीवर अवलंबून असतात (वृत्तीचे तरंग भावनाबळें) याचा अनुभव कोणाला आलेला नाही! खरेच! बाबांच्या युक्तीची कमाल आहे. वेळेवर योग्य ते (समय+उचित) बोल बोलतात की ज्यामुळे ऐकणाऱ्यांची मने शांत होतात (अंतरी निवती) आणि ते त्यापासून बोध घेतात. (ओ. ९७-१२४)

असेच एकदा मावशीबाई बाबांचे पोट रगडीत असताना त्यांची ती अतिरेकता (अमर्याद जोर) पाहून एका परम भक्ताच्या मनात कळकळ, दया आणि चिंता उद्‌भवली आणि तो म्हणाला, "बाई, दया करा. ही काय अंग दाबण्याची तऱ्हा? हृदयात थोडी तरी कीव धरा! बाबांच्या स्नायूंच्या नसा (शिरा) तुटतील ना!" एवढे शब्द (इतुकी अक्षरे) कानी पडताच बाबा आपल्या जागेवरून उठले आणि हाताने आपला सटका उचलून त्यांनी तो जमिनीवर जोराने हाणला (भूमि प्रहारे ताडिली). बाबांचा संताप अनावर झाला (चढली वृत्ति दुर्धर क्षोभा). विस्तवाच्या निखाऱ्यासारखे चमकणारे (खदिर+अंगार+प्रभा) त्यांचे डोळे सभोवार फिरू लागले म्हणजे त्यांच्यासमोर कोण उभा राहील! मांजराची बुबुळे जशी अंधारात चमकतात तसेच बाबांचे डोळे दिवसा चमकू लागले. डोळ्यांच्या ज्वाळा आता सृष्टीच जाळून टाकतील की काय असे वाटले. मग त्यांनी सटक्याचे एक टोक दोन हातात धरले व पोटाच्या खळगीत खोचले, दुसरे समोर खांबात रोवले (घट्ट बसविले) आणि खांबाला घट्ट मिठी मारली (कवळिले). सटका सव्वा हात (सुमारे २-२१ फूट किंवा ६०-७० सें.मी.) लांब होता. तो सबंध पोटात शिरला आणि आता स्फोट होऊन बाबांचा प्राणच जाईल की काय वाटले. खांब पक्का जमिनीत रोवलेला (अढळ). तो काय हलेल! बाबा जवळ जवळ सरकत गेले आणि त्यांनी खांबाला घट्ट आवळून धरले. पाहणाऱ्यांचे तर तोंडचे पाणीच पळाले (भीतीने त्रेधाच उडाली). आता स्फोट होईल म्हणून जो तो तोंडात बोट घालून (आश्चर्यचकित होऊन) बसला. "बापरे! काय अघटित (कधीही न घडणारा) हा प्रसंग! केवढे भयंकर हे संकट ओढवले! या आकांताला (अनर्थाला) काय उपाय करावा?" अशाप्रकारे लोक चिंता करू लागले. त्या मावशीकरिता एवढे संकट? पण भक्ताधीन राहणे, हे बाबांचे ब्रीदच होते ना! कधी कोणीही सेवा करीत असताना मध्येच कोणी त्या सेवेची अयोग्यता दाखविलेले किंवा सेवा करणाऱ्याला काही बोललेले बाबांना आवडत नसे. त्या प्रेमळ भक्ताच्या मनात आले की मावशीबाईला काही सूचना करावी (इशारा द्यावा), म्हणजे बाबांना त्रास होणार नाही (आराम पडावा). तर त्याचा परिणाम असा (उलटा भयंकर) का व्हावा बरे? असो. मग देवाला करुणा आली आणि साईबाबांच्या मनात शांतता उद्‌भवली. ती घाबरविणारी (भय+प्रद) कल्पना सोडून ते आपल्या आसनावर येऊन बसले. तो प्रेमळ भक्त जरी निधडा (न डगमगणारा) होता तरी बाबांचा करडा स्वभाव पाहून त्याने कानाला खडा लावला (अशी गोष्ट न करण्याचा निश्चय केला) आणि पुढे कसे वागावयाचे याचा बोध घेतला. तेव्हापासून निश्चय केला की सेवा करणाऱ्या कोणाच्या वाटेला जाऊ नये. ज्याच्या मनात जसे येईल तसे करू द्यावे. साईसमर्थ स्वत: शक्तिशाली (सामर्थ्यवंत) आहेत. सेवा करताना कोणाला अटकाव करावयाचा किंवा कोणावर कृपा करून त्याला ती मनसोक्त करू द्यावयाची हे ते जाणतात (निग्रह+अनुग्रह ज्ञानवंत). सेवा करणाऱ्याचे गुण किंवा अवगुण आपण कशासाठी पाहावेत! एकाची सेवा (चाकरी) साईबाबांना सुखदायक वाटते व दुसऱ्याची तीव्र वेदना देणारी किंवा झोंबणारी (प्रखर) वाटते हे तर आपल्या बुद्धीचेच (मनाचेच) भावनातरंग आहेत ना! खरा प्रकार कोणालाच कळत नाही. असो. आता हा थट्टाविनोद पुरे. घेणारा यापासून बोध घेईलच. साईच्या कथेचा स्वाद आणि वास (रस+आमोद) भ्रमर (मकरंद) रूपी भक्त सेवन करोत. (ओ. १२५-१४२)

हेमाडपंत साईचरणी लीन झाले आहेत. पुढील अध्याय याहीपेक्षा श्रेष्ठ (गहन) असेल. दयेचे सागर साईबाबा भक्त दामोदराची (दामूअण्णा रासने. अहमदनगरचे सुखवस्तु श्रीमंत कासार (काचकार, म्हणजे काचेच्या बांगड्या बनविणाऱ्या आणि विकणाऱ्या) जातीचे गृहस्थ) इच्छा पूर्ण करतील. तोही मोठा चमत्कार आहे. दामोदर संकटाने फार त्रासलेले होते. त्यांना आपल्यासमोर बोलावून त्यांची मनाची अस्वस्थता (घोर) बाबा घालवितील. (ओ. १४३-१४४)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या, श्री साईसमर्थ यांच्या सत्यचरित्राचा **"विनोद-विलसितं** (थट्टा-मस्करीचा खेळ)" नावाचा चोविसावा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्‌गुरु साईनाथांना अर्पण असो.**
**सर्वत्र मंगल असो.**

## अध्याय २४ ची आणखी टीका

(या अध्यायात साईबाबांच्या विनोदवृत्तीची दोन अतिउत्तम उदाहरणे आलेली आहेत.)

साईबाबा विनोदाचे आगर होते. लहानपणापासूनच त्यांना विनोद किंवा थट्टामस्करी प्रिय होती. हेमाडपंतांनी सुरुवातीलाच अ. ४, ओ. १३० मध्ये नाही का म्हटले, "पोर तो बारा मुलखाचा गमती। कथा भलतीच सांगितली॥" द्वारकामाईत म्हाळसापती व तात्या पाटील रात्री झोपायला येत. त्यांच्याशी बाबांची नेहमीच दंगामस्ती असे. हे तिघे पाय परस्परांच्या पायास लावून व डोकी तीन दिशांकडे ठेवून झोपत. कधी कधी बाबा अवचित उठत व याचे पाय त्याच्या उरावर, त्याचे पाय याच्या उरावर, कोणाचे पाय आपल्या अंगावर ठेवीत आणि सकाळी उठल्यावर दुसऱ्याने विचारले, हे कोणी केले, तर बाबा खदखदा हसत. कधी तात्या घोरू लागला की बाबा उठत आणि त्याला उलथापालथा करून त्याचे डोके दाबीत. नंतर म्हाळसापतीला मदतीला घेऊन त्याला आवळून धरीत व त्याची पाठही रगडीत.

(पृष्ठ क्र. ६५ वर)

(पृष्ठ क्र. २ वरुन)

सांगितले. मौनभंग करून मी त्यांना म्हणालो. ''महाराज ! आपल्याबरोबर माझा पूर्वी कधी परिचय झालेला मला आठवत नाही. माझी चूक तर होत नाही ना ?'' त्यावर ते म्हणाले, ''तुमचे म्हणणे बरोबर आहे.'' मग मला कशासाठी बोलावणे धाडले ?'' असे मी फक्त विचारले. बस्. एवढच विचारल्यावर त्या महात्म्याचा रागाचा पारा एकदम वर चढला. मोठमोठ्यानें बोलायला लागले. ''तुं काय सेवा करणार ?'' ''तुझ्या गावचे लोक ना साधूला ओळखत! ना त्यांची खाण्या-पिण्याची चौकशी करत! काय ? तुम्हाला मी साधारण साधू वाटतो ? प्रथम मी तुम्हाला माझा परिचय देतो.'' त्यांच्या मोठ्या बोलण्याचे धर्मशाळेचे व्यवस्थापक तसेच इतर उतारू एकत्र जमले. महाराजांचे उग्र भाषण चालूच होते. त्यांनी पुढे सांगितले, ''प्रथम तुम्हाला सर्वांना माझा परिचय देतो. या प्रजेला प्रथम मी धडा देईन, मग तुम्हाला सांगेन मी तुम्हाला कशासाठी बोलावले आहे ते!''

असे बोलून त्यांनी जवळ पडलेले लोखंडाच्या पट्टीचे बनविलेले साधारण १॥-२ फुटाचें त्रिशूळ उचलून त्याचे एक टोक तोंडात घातले, मग त्याच्या वरच्या दोन बाजूचे पंख पकडून सबंध त्रिशूळ पोटात उतरविले. तिथे उपस्थित असलेले सर्वच स्तब्ध झाले. मी पण अचानक वीज पडावी तसा विचारशून्य झालो. ह्या महात्म्याला मी ओळखत नाही, मग हा महात्मा माझ्याकडे कशासाठी आला ! आणि असा भव्य चमत्कार दाखवण्याची त्याला जरूर काय? इतक्यात तेथे जमलेल्या लोकांपैकी दोघे-तिघे पुढें आले, व त्यांनी त्यांची माफी मागितली. लोकांच्या विनंतीवरून त्यांनी त्रिशूळ बाहेर काढले. त्यांचा रागाचा पारा वाढतच गेला. ते सगळ्यांना ओरडून म्हणाले, ''अजून फक्कड तुम्हाला भेटलेला नाही. माझ्या उजव्या हातात गंगा व डाव्या हातात यमुना वाहते. बघा ! हे प्रमाण.'' असे म्हणून त्यांनी उजवा हात लांब करून, डाव्या हाताने उजव्या हातांच्या अनामिका बोटांतून, गाईच्या आचळांना दाबावे तसे दाबून पाण्याची धारा सुरू केली. १५-२० सेकंद धारा सुरूच होत्या. इतक्यात् लोकांची गर्दी वाढली. पुढे उभे असलेल्या लोकांनी जोराने गर्जना केली. ''जय बापूनी'' (गुजरातीत साधूचा आदराने 'बापूनी' उच्चार केला जातो). महात्म्यांनी दोन्ही हात उंच करून सर्वांनी उच्चारलेल्या जयघोषांचा स्वीकार केला. मग परत रागाने हातात त्रिशूळ घेऊन लोकांना शिव्या देत लोकांवर चालून गेले. सर्व लोक घाबरून पळून गेले. थोड्यावेळात सर्व निघून गेले. त्यांच्या ह्या नाटकामुळे मला खूप राग आला. मी मर्यादा ठेवून त्यांना म्हणालो, ''आपण तर सिद्ध संत आहात, महाराज ! मी आपल्याला ओळखू शकलो नाही. इथली प्रजा अज्ञानी आहे, आपल्याला क्रोध शोभत नाही, आपण शांत व्हा. आपली काय सेवा करू ते सांगा.'' मग त्यांनी शांतपणे सांगितले की, ''चल माझ्यासाठी खूप चांगली खाण्या-पिण्याची व रहायची व्यवस्था कर. तुझे जे काम आहे ते नंतर सांगेन, आता मी दुरवरून आलो आहे व मला आरामाची अत्यंत जरूरी आहे.''

माझ्या सहनशक्तीची मर्यादा संपत आली होती. मी त्यांना म्हटले, ''महाराज ! माझ्या मनाचे शंका समाधान झाले तर बरे होईल.'' त्यावर ते म्हणाले, ''काय आहे बोल ? त्यावर मी म्हणालो, ''बापू! आपण जे त्रिशूळ पोटात घातलेत, त्याचप्रमाणे एक तलवार आपण पोटात घालून दाखवा, मी ती माझ्या घरून मागवतो. दुसरे असे, आपल्या हातात गंगा-यमुना सिद्ध आहेत, मग आपल्या बोटाचा तुकडा, अगर नख कापून, आमच्या गावच्या भोगा नदीत सोडली तर खूप बरे होईल; कारण ती बाराही महिने सुकलेली असते. ती वाहू लागली तर सर्व प्रजाजन आपले गुणगान करतील. आणि कित्येकांचे आशीर्वाद मला मिळतील. बरस् इतक्या दोन गोष्टी करून दाखवा म्हणजे माझ्या मनाचे समाधान होईल. मग, आपल्याला जशी व्यवस्था, सोय पाहीजे असेल तशी करून देतो. जरा लवकर करा त्यामुळे तुमचा व माझा वेळ वाया जाणार नाही.'' माझे बोलणे ऐकून महाराज निरुत्तर झाले. मर्यादेचे उल्लंघन न करता मी पुढे म्हणालो, ''महाराज ! आपण आखाड्याद्वारा दिक्षा घेतलेले साधू आहात, असे नाटक, इतका क्रोध आपल्याला शोभा देत नाही. असा मदाऱ्याचा खेळ कशाला करता ?'' माझे बोलणे मध्येच अडवत ते म्हणाले, ''तुमचे म्हणणे बरोबर आहे. आजकाल बहूतेक लोक पाखंडाची पूजा करतात. सत्यवादी बनायला गेले तर उपाशी मरायची वेळ येते. त्यामुळे थोडा देखावा करावा लागतो''; नंतर त्यांनी स्वत:च्या झोळीतून एक पत्र काढून मला दिले. ते पत्र, माझ्या एका ओळखीच्या महात्मा रैवतगिरी यांचे होते. एकदा मी मध्यप्रदेशात असलेल्या खांडवा गावी गेलो होतो. तिथे मी जाण्याचा खास हेतू होता. तिथे ''दादा धुनीवाले'' नावाच्या सिद्ध महात्म्यांची गादी आहे. गेल्या २-३ दशकात पूर्व महाराष्ट्र, मध्यप्रदेशात सुविख्यात २-३ संत होऊन गेले. ते आजही त्यांचा सुवास पसरवित आहेत. शिरडीतील श्री साईबाबा प्रसिद्ध आहेत. शेगांवात गजानन महाराजांचे आसन आहे. ते पण महान सिद्ध भजनानंदी पुरुष होते.

खांडवात रैवतगिरीजींचा परिचय झाला. त्यांचा मुख्य विषय होता सर्प-संशोधन, जो माझ्यासाठी जिज्ञासाप्रेरक होता. सर्पांचे कुळ, खानदानी सर्प, दुष्ट जातीचे सर्प, सर्पांची भाषा, सर्पांचा सहवास या सर्व बाबींची विशिष्ट क्रिया असते. या सर्पजातींविषयी खूप अलौकीक गोष्टी, मला रैवतगिरींकडून समजल्या. मी त्यांना या सर्व क्रिया प्रयोगासहीत करण्यास सांगितले. ते मला एकदा तापी नदीच्या किनारी घेऊन गेले. तिथे उघड्या मैदानात बसविले. झोळीतून खास तयार केलेला धूप काढून सुका पालापाचोळा, गवत पेटवून, त्यावर काही मंत्र म्हणून हा धूप टाकला.

त्याचा गोड सुगंध पसरायला लागला. थोड्याच वेळानी चारी बाजूंनी वेगवेगळ्या रंगाचे, आकाराचे, वेगवेगळ्या लांबीचे अनेक सर्प आमच्यासमोर येताना दिसले. मला थोडी भीती वाटली. त्यावर ते म्हणाले, ''घाबरू नका, हे सर्व माझे मित्र आहेत. आता सर्वांना त्यांचा समाचार विचारतो. मग ते सर्व निघून जातील. जवळ-जवळ १५-२० सर्प गोलाकार उभे राहीले. जसे सर्कशीत वाघ-सिंह उभे रहातात तसे उभे होते. त्यांनी चेहऱ्याच्या हावभावावरून, तसेच ओठ, नाकाच्या हावभावावरून

वेगवेगळ्या आवाजावरून सर्पांशी गोष्टी बोलायला सुरुवात केली. कुणाला म्हणायचे, ''काय बेटमजी, कुठे रहाता?'' कुणाला सांगायचे, ''माझ्या कामाचे लक्षात ठेवा.'' कुणाला ''किती रहाणार आहात?'' थोड्यावेळाने ''चला निघा.'' असे म्हणून त्यांना निरोप दिला व ते सर्व आपापल्या मार्गाने निघून गेले. या प्रसंगावरून मला खूप आश्चर्य वाटून मी त्यांना खूप प्रश्न विचारले, ''आजच्या विज्ञानयुगात हे कसे काय शक्य होते? यामागे कुठली विद्या, कुठला नियम, उपयोगात आणतात? या विद्येचा उल्लेख कुठल्या ग्रंथात केला आहे? या क्रियेमागे आपले प्रयोजन काय आहे?''

रैवतगिरी हसून म्हणाले, ''विज्ञानयुगाबरोबर सर्पांचा किंवा साधूंचा काही विशेष संबंध नाही. ही विद्या फार पूर्वीपासून, भारतवर्षात वेगवेगळ्या प्रकारे प्रचलीत आहे. शंकर भगवानांना या विद्येचा प्रणेता समजले जाते. या विद्येला **''भुज गछत्रा''** नावाने ओळखले जाते. पूर्ण पुरुषोत्तम, योगेश्वर श्रीकृष्ण, सोळा कला, अष्टसिद्धी, नवनिधी तसेंच इतर अनेक विद्यांचे पूर्ण ज्ञाता होते. त्यांनी 'कालिया गर्वहरण' या विद्येच्या प्रयोगाने केले होते.

या सर्पजातींत, देवजाती, सिद्धजाती, नागजाती, श्रापित, प्रेतयोनी, पितृजाती, तसेंच इतर शुद्ध जातींचा समावेश केला जातो. देवजाती, सिद्धजाती व नागजातीचे सर्प कुठलेही रूप धारण करू शकतात. या सर्पांना मंत्राने, पूजा-नैवेद्याने प्रसन्न करू शकतात. पितृजातींच्या सर्पांना कौल-कराराने प्रसन्न करण्यात येते. बाकीच्या कनिष्ठ जातींना कष्टदायक क्रियेने काबूत ठेवून इच्छीत कामगिरी करून घेण्यात येते.

हे एक सिद्ध साधन आहे. या सर्पांद्वारे आम्हाला प्रत्येक बातम्या समजल्या जातात. गुप्त व प्रकट परिस्थिती समजू शकते; तसेच दंड, शिक्षा करण्यासाठी पण उपयोग केला जातो. इतकेच नव्हे तर वेळ पडली तर आर्थीक प्रश्न, दिव्य जातींच्या सर्पांद्वारा सोडविला जातो.

रैवतगिरीजींनी अनेक दाखले दाखवून माझ्या शंकांचे समाधान केले. त्यानंतर आमचे स्नेहसंबंध वाढत गेले. कधी वर्षातून एकदा, कधी अकस्मात तर कधी इच्छापूर्वक भेटी व्हायच्या. रैवतगिरीजींजवळ हा बनारसचा उदासी महात्मा डोक्याशी बसला. काही दिवस त्यांच्याजवळ राहून, गोष्टी करून त्यांना, कसेही करून, तरसाच्या कातड्याची व्यवस्था करायला सांगू लागला. (या तरसाचे मुख्य खाणे हाडे असतात, त्याची लाळ जठराग्नींत इतकी विलक्षण रितीने मिसळते; की ते हाडांना पण पचवू शकते.) रैवतगिरीजींनी पत्रात मला सांगितले की, ''तुम्ही जंगलात फिरता, त्यामुळे तुम्हाला तरस कुठे व जंगलातल्या कुठल्या दिशेला मिळेल हे माहीत असेल. हा महात्मा उग्र स्वभावाचा आहे. मी कंटाळून त्याला तुमच्याकडे पाठविले आहे. तुम्हाला योग्य वाटेल असेच करा. तसेच त्यांच्याजवळ एक-दोन गोष्टी आहेत त्या युक्तीनी जाणून घ्या; शिवाय हा मला परत दुःखी करणार नाही याची व्यवस्था करा.'' पत्र वाचल्यावर मी महाराजांना विचारले, ''बोला! काय हवे ते?'' त्यावर ते म्हणाले, ''मला कसेही करून तरसाचे कातडे हवे आहे. त्यासाठी खास मी तुमच्याकडे आलो आहे.'' त्यावर थोडा विचार करून मी त्यांना सांगितले की, ''याला एक आठवडा लागेल. तोपर्यंत आपण ह्याच धर्मशाळेत रहा. आपली खाण्या-पिण्याची, रहाण्याची नीट सोय केली जाईल.''

मी माझ्या २-३ शिकारी मित्रांना तसेच पायी चालणाऱ्या लोकांना तरसाविषयी तपास करण्यास सांगितले. २-३ दिवसांनी बातमी कळली की, चोटीला विस्तारात, कॅंपचाळच्या वन्यविस्ताराच्या मांडव बीटमध्ये तरस, वरूणी इ. ची वस्ती आहे. माझ्याजवळ मांडव विस्ताराची भौगोलीक माहीती नव्हती किंवा ती देणारी योग्य व्यक्ती नव्हती. इतक्या दिवसात उदासी महाराजांनी दोन-तीनदां माणूस पाठवून चौकशी केली. त्यांना त्यांच्या कामाची सुरुवात केली आहे असे सांगताच त्यांचे थोडे समाधान झाले. शेवटी मी माझे मित्र काठी दरबारचे 'रामकुभाई' यांच्याशी संपर्क साधला. ते थानगढजवळ २-३ कि.मी. दूर असलेल्या सोनगढ़ गावाचे भाचे होते. त्यांचे मुळ गाव 'चोटील', परंतु बालपणापासूनच सोनगढ़ला रहात होते. नवनिर्माण आंदोलनात त्यांच्याबरोबर परिचय झाला. सोनगढ़ गावाचे या युगामध्ये एक आगळे वैशिष्ट्य आहे. या गावात एकही माणूस दारुडा, व्यसनी, जुगारी नाही. कुणीही या गावात मांसाहारी आढळणार नाही. कोणत्याही एकाच जमातीच्या अगर जातीच्या लोकांचे इथे प्राबल्य नाही, सर्व जनता शांततेने रहाणारी, नैसर्गिकरित्या व सुंदर फुलझाडांनी, बागबगिच्यांने नटलेले असे हे सुंदर गाव आहे. याच विस्तारात नाथ सांप्रदायाचे सिद्ध महात्मा गैबीनाथांचे (गहनीनाथांचे) आसन आहे. त्यांच्या गुहेच्या पहाडी विस्तारात उंच भागात एक टेकडी आहे. ती आतून पोकळ आहे. वर चालताना ठराविक विस्तारात ती पोकळी जाणवते. गुहेचा पुढील भाग थोडा उघडा ठेवून मग बन्द करण्यात आला आहे. आजही तिथे गैबी आवाज, गैबी सुगंध, गैबी चमत्कार कधीकधी भाविकांना पहायला, ऐकायला मिळतात. आसपासचा परिसर अनेक धार्मिक स्थळांनी वसलेला आहे. गहनीनाथ हे जालंधरनाथांचे गुरुबंधू होते. अजूनही त्यांचे अस्तित्त्व तिथे आहे असे सांप्रदायाचे म्हणणे आहे. ज्याप्रमाणे नवनाथ, चौऱ्यांशी सिद्ध गिरनार क्षेत्रात विराजमान आहेत. त्यांत एक-दोन विभिन्न मते अशी ऐकायला मिळतात की, या सर्वांच्या ठराविक वेळी एकत्र येण्याचे स्थान गिरनार आहे. अन्यथा हे नवनाथ आणि चौऱ्यांशी सिद्ध संपूर्ण भारतखंडात गुप्त भ्रमण करतात; तसेच सतत हिमालयाच्या योगी, आणि सिद्धांच्या संपर्कात असतात. भारतवर्षात चालत असलेल्या प्रत्येक चांगल्या-वाईट प्रवृत्तींचे अवलोकन गुप्त योगी व सिद्ध करीत असतात.

रामकुभाईपण माझ्यासारखेच बुचकाळ्यांत पडले; कारण सोनगढच्या काठी दरबारांसमोर, 'भगत' हा शब्द वापरला जातो. ज्यामुळे हिंसा, क्रूरता, तिथे प्रेरली जात नाही किंवा दुसरा कुणी दुष्कृत्य करीत असला तर कसेही करून त्याला अडविले जाते. खूप चर्चेनंतर मी त्यांना तयार केले.

एक दिवस नक्की करून, शिकारीची जागा वगैरे पहाण्यासाठी जाण्याचे नक्की केले. सर्व व्यवस्था केल्यावर निघण्याआधी

उदासी महाराजांना भेटून त्यांना सर्व योजना सांगितली. ती ऐकल्याबरोबर तेपण आमच्याबरोबर यायला निघाले. त्यांचे येणे आवश्यक आहे असे ते सांगू लागले. कारण की, मेलेल्या तरसाच्या कातडीवर त्यांचे कार्य सिद्ध होणार नाही. तरसाच्या शरीरात प्राण असतानाच त्यावेळी ठराविक मंत्राने त्याला मंत्रून त्याच्या पोटाचा भाग चिरून चामडे तत्काळ खेचले पाहीजे. तरच तुमची मेहनत व माझे कार्य सिद्धीस जाईल. नाहीतर तुम्हाला पाप लागेल; व मला दुसरा तरस शोधावा लागेल. त्यांची प्रस्तावना ऐकल्यावर त्यांनापण बरोबर घेण्याचे ठरले. दुसऱ्या दिवशी नित्यकर्म आटपून, वन-दुर्गादेवीचे स्तूती तसेच स्मरण केले. एल्.जी व एस्.जी.ची काडतुसे कमरपट्टयात भरली. बंदूक घेवून स्टेशनवर गेलो. उदासी महाराज माझी वाट पहात होते. आमची गाडी ठरलेल्या वेळेला थानला पोहोचली. रामकुभाई आम्हाला घ्यायला स्टेशनवर आले. घोडागाडीतून थान स्टेशनजवळील 'अवलिया ठाकर' नावाच्या धार्मिक जागी पोचलो. तिथे उदासी महाराजांची, स्थानिक महाराजांशी ओळख करून, उदासी महाराजांना शांत रहाण्यास सांगितले. उदासी महाराजांना कार्यक्रम समजावून मी व रामकुभाई दोघे घोडा घेवून मांडव बीटला गेलो.

'पांचालभूमीला' इतिहासकारांनी खूप पुरातन तपोभूमी म्हणून नमूद केले आहे. द्वापार युगापासून पांचाल भूमीचे महत्त्व वेगवेगळ्या प्रसंगाने करण्यात येते. पाच पांडव, पत्नी द्रौपदी पांचाली याच नावाने ओळखली जाते, तिच्या भूमीचे नाव तिला पडले. याच काळात मांडव्य ऋषींनी याच परिसरात राहून तपस्या केली. म्हणून याला 'मांडव' हे नाव पडले. ते आजतागायत प्रसिद्ध आहे.

ह्या विस्तारात खूप धार्मिक स्थळे आहेत. काही गुप्त आहेत, तर काही प्रगट आहेत. तरी त्यांचा महिमा गुप्त आहे.

(१) अवलिया ठाकर, (२) रातुडडी धारेवर मोईनुद्दीन सेलानी बाबा, (३) मुनींचे देऊळ, (४) टपकिया महादेव, (५) सांढर-सुंढरचा तलाव (६) झरिया महादेव, (७) खापरा. कोंडीयांच्या गुहा, (८) अनलगढ़ (मांडवगढ), (९) मांडवांची गुंफा, (१०) अलोपी विहीर, (११) बीडीयाबेली, (१२) जुने सूर्यमंदिर, (१३) नवे सूर्यमंदिर, (१४) गहनीनाथांची गुहा, (१५) अनुसुया मातेचा आश्रम, (१६) पापमोचन, (१७) ध्रुपदकुंड, (१८) बाणगंगा, (१९) वासुकीची जागा, (२०) अस्थदची जागा, (२१) त्रिनेत्रेश्वर. इत्यादी स्थळे मांडव विस्तारात आहेत. अवलिया ठाकर आणि मांडवची धार यामध्ये ३-४ कि.मी. अंतर आहे. तो विभाग माझ्या शिकारीचे कार्यक्षेत्र होते. मी त्या परिसराची चांगली माहीती मिळवली. सुरक्षित स्थळ पसंद केले. तिथे जाण्याचा रस्ता नीट लक्षात ठेवला.

उदासी महाराजांबरोबर बसून शिकारीची योजना आखली. मी व रामकुभाईनी संपूर्ण योजना तपासून उदासी महाराजांना समजावून सांगितली. कृष्णपक्षाच्या सुरुवातीचे दिवस असल्याने चंद्रप्रकाश कुठेच नव्हता. आम्ही ठरलेल्या वेळेनुसार रात्री आठ वाजता आमच्या मुक्कामाहून निघालो. मी बंदूक व रामकूभाईंनी कट्यारीसारखे तीक्ष्ण हत्यार घेतले. त्याचे नाव ड्रेगर होते. हे हत्यार घेण्याचे कारण, कधीकधी शिकारीच्यावेळेस बंदुकीत जर अचानक बिघाड झाला आणि समोरून एखाद्या हिंसक प्राण्याचे हल्ला केला तर बचावासाठी वापरले जाते. उदासी महाराजांजवळ त्यांचे त्रिशूळ होते.

आमची सर्व मंडळी मांडव बीटमध्ये योग्यगतीने पुढे-पुढे जात होती. रामकुभाई बरोबर असल्यामुळे भौगोलिक प्रश्नाची अडचण नव्हती. आसपासच्या झाडीत लपलेले ससे आमच्या पायाच्याआवाजाने पळून जात होते. आम्ही निश्चीत केलेल्या स्थळी पोचलो. आमच्या जागेपासून तरस जाण्याच्या मार्गामध्ये जवळ जवळ तीस वाराचे अंतर होते. आमची बसण्याची जागा जरा उंचावर होती. वेळ जवळ-जवळ ११ ची होती. आमचे डोळे तरसाच्या वाटेकडे लागले होते. त्याची वाट पाहून पाहून आम्हाला कंटाळा यायला लागला; असे वाटू लागले की, तरस आम्ही येण्याआगोदरच त्याच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था करून कुठेतरी गेले असेल. पहाटेचे तीन वाजले होते.

इतक्यात ५०-६० वाराच्या अंतरावर काहीतरी हालचाल झाली. ते तरसाचे आगमन होते. रामकुभाईंनी पण इशाऱ्याने माझ्या म्हणण्याचे समर्थन केले. त्यांना सूचना दिल्याप्रमाणे त्यांनी १० सेलचा पॉईंट फोकस सिग्नल टॉर्च त्या दिशेकडे तयार ठेवला. माझी सूचना मिळताच टॉर्च चालू करण्याचे ठरवले. बंदुक उचलून आम्ही पोझीशन घेतली. वाऱ्याची दिशा आम्हाला अनुकूल होती. वाऱ्याची आम्हाला काळजी नव्हती; कारण तरसाला आमची जाणीव होणार नाही अशा रितीने वाऱ्याची दिशा होती. तरस फायरिंग पोझीशनच्या रेंजमध्ये आल्याबरोबर रामकुभाईंनी टॉर्च सुरू केला. टॉर्चच्या प्रकाशात तरस, स्पष्ट दिसू लागला. मी बंदुकीचा चाप ओढणार इतक्यात् टॉर्चच्या प्रकाशात, आमच्या उजव्या बाजुला एक मानवी आकृती उपस्थित झाली. त्याने आल्याबरोबर 'चेत-चेत' अशी गर्जना गेली. त्यांच्या त्या आरोळीने सर्व परिस्थिती एकदम बदलली. प्रथम मी बंदूक त्या आकृतीकडे रोखली. माझ्यासमोर असणाऱ्या रामकुभाईंनीपण टॉर्च त्यांच्यावर स्थिर केला. इतक्यात तरसाला निसटून जायची संधी मिळाली. एका क्षणात योजना मोडली गेली.

ती आकृती, एक अघोरी महात्मा वाटत होते. ते दिगंबर अवस्थेत होते. त्यांच्या उजव्या हातात लांब व मजबूत लोखंडाचे चकाकणारे त्रिशूळ होते. डाव्या हातात एक जिवंत साप वेटाळलेला होता. रुक्ष, सुक्या जटा, दाढी-मिशांमुळे चेहरा झाकला गेला होता. डोळे व नाकाशिवाय डोक्याचाही भाग पूर्ण दिसत नव्हता. टॉर्चचा प्रकाश त्यांच्या डोळ्यांवर केंद्रीत केला असला तरी त्यांचे मांजरासारखे लाल डोळे स्थिर होते.

एकाएकी या प्रसंगाने मी बुचकाळ्यात पडलो व थोडासा भ्यालो. क्षणात विचार आला, हा देव आहे का? राक्षस, प्रेत, पिशाच? तो महात्मा थोडा पुढे येऊन म्हणाला, ''चलाव बंदूक'' त्याच्या त्या आवाजावरून मी अनुमान केले की, हा इथे जंगलात रहाणारा अघोरी महात्मा आहे.'' मी बंदूक खाली ठेवली व रामकुभाईंकडून टॉर्च घेऊन त्यांचे

अवलोकन केले. माझ्या या कृतीमुळे उदासी महाराज चिडले व स्वत:चे त्रिशुळ घेऊन रागाने उभे राहीले. पुढे येऊन त्यांनी मोठ्याने विचारले, ''कोण तुम्ही?'' समोरून काहीही उत्तर मिळाले नाही; म्हणून उदासी महाराज अधिकच खवळले, परत जोराने त्यांनी ओरडून विचारले, ''कोण आहे?'' समोरील अघोरी महात्म्यांनी उत्तर दिले, ''खाली येऊन बोल''. मोठ्या हिंमतीने उदासी महाराज पुढे झाले. मी व रामकुभाई एकमेकांसमोर एकक्षण पाहू लागलो. एका क्षणात काहीतरी निर्णय घेणे आवश्यक होते. मी बंदूक घेऊन उदासी महाराजांच्यामागे गेलो. माझ्यामागून रामकुभाईपण येवू लागले. उदासी महाराज, अघोरी महात्म्यापासून १५-२० फुटांवर उभे राहीले. अघोरी महात्मा उदासी महाराजांना सबोधून म्हणाले, ''मी जिथे रहातो तिथल्या कोणत्याही प्राण्याला मारण्याचा अधिकार तुम्हाला नाही.'' तुम्ही तुमचे अनिष्ठ इच्छीत नसाल तर इथून परत जा.'' त्यावर उदासी महाराजांनी प्रत्यूत्तर केले, ''आम्हाला इथून निघून जाण्यास व धमकी देऊन स्वत:चा अधिकार दाखवणारे तुम्ही कोण?'' त्यावर अघोरी महात्मा म्हणाले, ''मी कोण आहे हे जाणण्याचे सामर्थ्य तुझ्यात नाही. ते जाणण्यापेक्षा तुम्ही लवकर इथून निघून जाणे, तुमच्या हिताचे आहे.'' त्यावर उदासी महाराज हट्टाने म्हणाले, ''आम्ही इथे आमचे कार्य करण्यासाठी आलो आहोत. तुमच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी नव्हे. मी तरस घेवून जाणारच!''

अघोरी महात्मा म्हणाले, ''तरस घेवून जाण्याआधी तुम्ही इथून जाल का नाही याचा विचार करा; नाहीतर असे होणार नाही की, तुमचे सेवक तुमची वाट पहात बसतील; आणि तुम्ही इथेच रहाल.''

**उदासी महाराज:** आता वेळ जास्त न दवडता तुम्ही तुमच्या आसनावर जा. आम्हाला आमचे काम करू द्या.

**अघोरी महात्मा:** जोपर्यंत मी इथे आहे तोपर्यंत कुणाही प्राण्याला मारून टाकायचे तुमच्या शक्तीबाहेर आहे. तुम्ही जर जगवू शकत नाहीं तर मारण्याचे कुठल्या शक्तीच्या आधारावर सांगता.

**उदासी महाराज:** म्हणजे तुमच्याजवळ मारण्या-जगवण्याची दोन्ही शक्ती आहे की, उगाच मोठेपणा करता?

यावर अघोरी महात्मा चिडला. ते रागाने म्हणाले, ''बघ हे खप्पर जमिनीवर ठेवत आहे'' असे म्हणून खांद्यावर दोरीने बांधलेली खोपडी जमिनीवर ठेवली; मग म्हणाले, ''या खप्परला जर तुम्ही तुमच्याजवळ बोलावून घेतले तर मी तुमचा शिष्य होईन; नाहीतर तुम्हाला माझे शिष्य व्हायला लागेल.'' उदासी महाराजाने कबूल केले.

टॉर्चच्या प्रकाशात मी व रामकुभाई ही वादावादी पहात होतो. आता काय घडणार हे पहायचे होते. जमिनीवर ठेवलेली खोपडी आमचे भविष्य बनविणारे कारणरूप प्रतिक होते. उदासी महाराजांनी खोपडीवर दृष्टी ठेवून, ओठ हलवून, काही मंत्र म्हटले व फूंक मारली. तरीपण खोपडी जागच्याजागी होती. परत त्याने उभ्या-उभ्याच दोन हाताच्या मुद्रा करून, सिद्ध केलेल्यया देवी-देवतांचे आवाहन मोठ्या स्फूर्तीने केले. परिणाम शून्य. शेवटी त्रिशुळाने खोपडीभोवती एक रेषा काढून, त्रिशूळ जमिनीत रोवले. खोपडीसमोर बसून शेवटचे प्रयास करू लागला. हे दृश्य बघून मला मजा वाटत होती व त्यांच्या नि:सहाय्यतेवर दया येत होती. उदासी महाराज एकदम घामाघुम झाले. अघोरी महात्मा स्थिर दृष्टीने खोपडीकडे पहात होते. शेवटी उदासी महाराजांनी दोन्ही हात जोडून, उभे राहून नम्रपणे म्हणाला, ''दयाळू मी तुम्हाला ओळखू शकलो नाही.'' तरीपण उदासी महाराजांनी त्यांच्या शंकेच्या समाधानासाठी शेवटचा फासा टाकला. तो म्हणाला, ''महात्मा, तुमचे खप्पर मी माझ्याकडे आणू शकलो नाही, पण तुम्ही माझे खप्पर तुमच्याजवळ बोलावून दाखवा; तर माझ्या शंकांचे समाधान होईल.'' अघोरी महात्मा सहज हसून म्हणाले, ''ठेव खाली!'' उदासी महाराजांनी त्यांची काळी खोपडी त्यांच्या खोपडीजवळ ठेवली व कुतुहलाने बघू लागला. मला हा नवीन प्रसंग होता. अघोरी महात्म्यांनी क्षणभर खोपडीकडे दृष्टी स्थिर ठेवून सांगितले की, ''चल! साथ ले के चल!'' इतके बोलून हातात जो सर्प होता तो लांब करून सर्पाला ते दृश्य दाखवावे अशारितीने हात लांब करून थोडावेळ ठेवला. टॉर्चच्या प्रकाशात सर्पाचे डोळे पाणीदार मोत्यासारखे चमकत होते. तो जिभेला वारंवार बाहेर काढून स्वत:चे तोंड उघडून जणू काही करत होता. मग नंतर आपोआप हातावर गुंडाळून बसला; त्याबरोबर अघोरी महात्मा कुणाला काही न सांगता पाठ फिरवून चालू लागले; त्यांच्या चालण्याबरोबर खोपडीपण मागून चालायला लागली; आणि उदासी महाराजांची खोपडी पण चालू लागली. अघोरी महात्मा हातात त्रिशूळ फिरवत व सर्पाला खांद्यावर बसवत चालायलाच लागले. आम्ही तिघे पूतळ्यासारखे एकमेकांकडे पहातच राहीलो. त्यांना जाताना पाहून उदासी महाराज धावत त्यांच्यामागे गेले. त्यांचा रस्ता अडवून म्हणाले, ''महात्मा! दयाळू! जे घडायचे होते ते घडले. मला आपल्या महत्तेची व माझ्यालायकीची कल्पना आली; अनुभव आला. आपण संन्यासाची दिक्षा घेतली आहे व मी ही घेतली आहे; तरी आता आपण उदार अंत:करणाने मला क्षमा करून माझ्यावर कृपा करावी, यावर अघोरी महात्मा म्हणाले, ''तुमचे म्हणणे ठीक आहे, तुम्हाला माझ्याबरोबर रहावे लागेल, तरच तुम्हाला तुमची कवटी परत मिळेल.'' (कोणत्याही सांप्रदायांची दिक्षा घेतलेल्या साधूचे कोणतेही चिन्ह, रूपक (कापड, लंगोटी, कमंडलू, झोळी, झेंडा, गळ्यातील रुद्राक्ष वगैरे त्याजवळून घेतले तर तो त्याचा अपमान होतो). उदासी महाराजांनी त्यांचे म्हणणे कबूल केले. अघोरी महात्म्यांनी स्वत:चे त्रिशूळ स्वत:च्या खांद्याला टेकवून, हात लांबवून, खोपडीला हातावर यायची सूचना केली. लगेच खाली पडलेली कवटी उडी मारून अघोरी महात्म्यांच्या हातावर जाऊन बसली. उदासी महाराज खाली पडलेल्या कवटीकडे पहात राहीले. अघोरींनी त्यालाही सूचना केल्या. त्याबरोबर कवटी उडी मारून उदासी महाराजांकडे आली. अघोरी महात्म्यांनी आमच्याकडे पाहून आम्हाला सांगितले की, आपण आता जावू शकता, महाराजांची चिंता करू नका.'' आम्ही दोघे एकमेकाकडे बघून काय निर्णय घ्यायचा हे ठरवित होतो. मी अघोरी महात्म्याकडे पाहून नम्रपणे म्हणालो,

''महाराज! आता थोड्या परिचयात व अल्प सहवासात मी आपल्यापासून प्रभावित झालो आहे, तसेच माझ्या मन-आत्म्याला अगम्य शांतीचा तसाच सुखाचा अनुभव आला आहे. मी असे इच्छीतो की, आपण परत मला आपल्या दर्शनाचा लाभ द्याल का?'' क्षणभर वेधक दृष्टीने माझ्याकडे पाहून, मला कडव्या शब्दात म्हणाले, ''मला तुमच्या परिचयाची काही जरूर नाही, तुम्ही जावू शकता.'' त्यांच्या नीरसपणाने व बेपर्वा वर्तनाने माझी जिज्ञासा आणखीनच तीव्र झाली. मांडव विस्तारात या गुप्त अघोरीना कुणी ओळखत नव्हते; किंवा कुणाच्या ध्यानात आले नाही, एकाएकी झालेल्या ह्या मुलाखतीचा शक्य तितका सदुपयोग करून घ्यायची माझी इच्छा होती. अनेक साधु-महात्म्यांच्या संपर्कात आल्यामुळे कुठल्या प्रकारच्या साधुबरोबर कसे वर्तन करावे तसेच त्यांना कसे रिझवावे, यांची थोडी रिती व पद्धती मला येत होती. त्यांच्याबरोबर नम्र शैलीने साधुशाहीचा भाषेचा प्रयोग केला. त्यांची व त्यांच्या गुरुंची, सांप्रदायांची उचित स्तूती केल्यावर त्यांना समजले की, मी साधु-समाजात राहीलेला माणूस आहे. दुसरे ते स्तूती-प्रशंसेने प्रसन्न झाले. त्यांनी मला दहा दिवसानंतर परत भेटायला यायला सांगितले. याशिवाय कुठल्याही दिवशी प्रयत्न करू नका. असेही सांगितले!

मी उदासी महाराजांना म्हणालो की, ''आपल्याला या महान महात्म्याजवळ रहाण्याचे सौभाग्य लाभले. माझ्यासाठी काही सेवा असेल तर सांगा. त्यावर शांत स्वराने ते म्हणाले, ''माझे दिशा परिवर्तन होईल असे मला वाटते. हा प्रसंग एक निमित्त होता. परंतु तुम्ही मला इतके सहकार्य दिल्यावर मी त्यांचा ऋणी आहे. अशा समर्थ महात्म्यांची सेवा करीन, तुम्ही माझी चिंता करू नये. माझे मन पण आनंदाचा अनुभव घेत आहे. मी व रामकुभाईंनी अघोरी महात्म्यांचे चरणस्पर्श करून त्यांचा निरोप घेतला. आम्ही परत फिरताना कितीतरी प्रश्न माझ्या मनात उद्‌भवत होते. या महात्म्यांना कुणी ओळखत नाही; याचे कारण काय? ते स्वत:च्या हाताला सर्प गुंडाळून ठेवतात व स्वत: दिगंबर अवस्थेत रहातात, ते कशासाठी? या सर्व प्रश्नांची उत्तरे फक्त ते महात्माच देऊ शकत होते; व त्यासाठी १० दिवस वाट पहावी लागणार होती. मी रामकुभाईंना या गोष्टींविषयी कुणाहीबरोबर चर्चा न करण्याची विनंती केली. कारण जे त्यांच्याकडून जाणून घ्यायला मिळेल त्यात अडचण वगैरे यायला नको अशी अपेक्षा होती; त्यांनी शपथपूर्वक कुणालाही काही न सांगण्याचे वचन दिले. मी त्यांना आगामी कार्यक्रमाची सूचना दिली. थोडी गांजाची, खाण्यापिण्याची व्यवस्था करायला सांगितली व दोन चांगल्या घोड्यांची व्यवस्था करण्यास विनवले.

## प्रतिशोध

अघोरी महाराजांविषयी माहीती मिळवण्याचा मी मान्य साधूसमाजात बराच प्रयत्न केला, पण काही माहीती मिळाली नाही. दहा दिवस मोठ्या मुश्कीलीने गेले. त्यात रामकुभाईंचे पत्र आले, त्यांनी सर्व तयारी करून ठेवली होती. शेवटी निश्चीत दिवशी सकाळी मी जनता ट्रेनद्वारा थानगढला जाण्यास निघालो. एका तासाच्या प्रवासानंतर मी थानगढला रवाना झालो. तेथे आगावू सर्व सामग्रीची व्यवस्था केलेली होती. ती सर्व घेऊन आम्ही परत थानगढला आलो. तेथे २ घोडे घेवून मांडव बीटला रवाना झालो.

रस्त्यात मी रामकुभाईंना जरूरीची सुचना दिली. साधूबरोबर कसा व्यवहार करावा वगैरे वगैरे– कानिफनाथांनी सांगितले की,

'राजा, जोगी, अगन, जल,<br>
इनकी उल्टी रित!<br>
'इनसे संभाल के रहना,<br>
थोडी पालो प्रीत''

अग्नी, पाणी, राजा, जोगी, यांची समजणार नाही इतकी गती असते, तसेच त्यांच्यापासून नेहमीच दूर रहाणे श्रेयस्कर असते, त्यांच्यापासून नेहमी समजून-विचारून काम करणे आवश्यक असते. हितावह असते.

आम्ही ठराविक ठिकाणी दूपारी येऊन पोहोचलो. तिथे एका झाडाला घोड्यांना बांधून, एका दगडावर आम्ही त्या अघोरी महात्यांची वाट पहात होतो. अर्धा-एक तासानंतर एका उंच (विस्तारावर) टेकडीवर नदी-किनाऱ्याने येताना ते दिसले. त्यांची स्फूर्ती व वेग मी पहातच राहीलो. दुरवरून त्यांनी आम्हाला पाहीले, आम्ही दुरूनच हात उंच केला. हात जोडून अभिवादन केले. जवळ आल्यावर 'ॐ नमोनारायण' म्हटले. त्यांनी स्मित करून 'नारायण' म्हटले. दिवसाच्या उजेडात व रात्रीच्या अंध:कारात जो फरक आहे, तितकाच फरक त्या दिवसाच्या वर्तनात व त्यांच्या आजच्या वर्तनात दिसत होता. मी त्यांना स्पष्ट पणे विचारले ''आपण इथेच बसू की आपल्या स्थानावर जाऊ'' ते माझ्या द्वीअर्थी प्रश्न समजले. त्यावर त्यांनी त्यांच्या स्थानाकडे चलण्यास सांगितले. त्यामुळे माझ्या शंकांचे समाधान होईल असे ते म्हणाले. त्यांचे स्वरूप-दर्शन मी लक्षपूर्वक पहात होतो. एक गोष्ट ध्यानात आली की, त्यांच्या शरीरावर काहीच अलंकार, साधू-शाहींचे आभूषण, रुद्राक्ष, कंठी, कडे, माळा वगैरे काहीच नव्हते. फक्त डाव्या हातावर निळ्या रंगाचा साप, व उजव्या हातात त्रिशूळ–

ते ज्या दिशेने आले, तिथे न वळता दुसऱ्या दिशेला वळले; त्यांच्यामागून आम्ही जाऊ लागलो. जवळजवळ अर्धा तासानी एक उंच जागा आली. त्यावरच्या भागात समांतर जमीनीसारखे दगड पसरविलेले होते. त्याच खडकात एका गुहेसारखा आकार निर्माण झाला होता. अघोरी महाराज त्रिशुलाच्या मदतीने लवकर चढून गेले. आमच्याबरोबर घोडे होते. त्यांना तिथेच बांधून आम्ही वर गेलो. ४-५ फूट उंच व ४०-५० फूट लांबीची खोल गुहा होती. जो भाग खूप खोल होता, तिथे अघोरी महाराजांचे आसन होते. गारा-मातीपासून बनवलेली चौरस धूनी होती. जी प्रज्वलित होती. त्याच्याजवळ दगडात एक शेंदूर लावलेले त्रिशूळ खोदलेले होते. धुनीजवळ संपूर्ण आकाराचे डोक्यासहीत व्याघ्रांबर होते. ज्याची पंजा व नखेपण ठेवली होती. लहान-मोठ्या ५-६ चिलीमी व्यवस्थित पडलेल्या होत्या. आसनाजवळ एक जूनी पत्र्याची पेटी पडलेली होती. छतांवर षट्‌कोन यंत्र शेंदूराने कोरले होते. त्यात वाचता येणार नाही अशी अक्षरे लिहीलेली होती. वातावरण स्वच्छ, शांत व सुगंधित होते. उदासी महाराज दुसऱ्या आसनावर बसून

काही शिवत होते. आम्हाला पाहून ते खुश झाले. आम्ही आत गेलो; व सर्प खाली उतरून आजुबाजूला हळू गतिने फिरू लागला.

आमच्याकडे पहात महाराज म्हणाले, ''पहा! तुमचे उदासी महात्मा आता योग्य साधनांचा अभ्यास करू लागले आहेत. आपण त्यांचे कुशल त्यांना विचारू शकता. मी त्यांचा भावार्थ ओळखला. त्यांनी उदासी महाराजांना दु:खी केलेले नव्हते पण साधु-धर्म काय आहे ते समजावून त्या धर्माचे दृढ पालन करण्याचे बीज रोवले होते. उदासी महाराजांच्या बोलण्यावरून समजले की, ते खूपच आनंदात आहेत; व संन्यासाची दिक्षा घेतल्याचे सार्थक झाल्याचे त्यांच्या आनंदावरूनच कळते.

अघोरी महात्म्यांबरोबर बोलण्याची सुरूवात कुठल्या विषयाने करावी त्याविषयी मी विचार करीत होतो. ते स्वत:च्या आसनावर सिद्धासन घालून आमचे अवलोकन करीत होते. बोलणे सुरू व्हायच्या आधी मी महाराजांना विचारले, ''आपण चिलीम, साफी इत्यादींचा उपयोग करता का?'' ते जरा खुश होऊन म्हणाले, ''हो, माझा खूप अभ्यास झाला आहे परंतु इथे मिळत नाही. खूप दिवसापासून फक्त सुक्या तंबाखुवर वेळ निभावून नेतो. तुम्ही जर आणला असेल तर चिलीम बनवा.'' मला आनंद होत होता. इतक्या लवकर त्यांच्याशी जवळीक साधली जाईल अशी कल्पना पण मी केली नव्हती. गांजाची प्रस्तावना ठरवूनच केली होती. कारण बहुतेक साधूंना चरस, गांजा, अफू, भांग, चंडूल इत्यादी व्यसन असते. या वस्तू जंगलात पहाडी प्रदेशात मिळणे मुश्कील असते. जर या वस्तु कुणी त्यांना दिल्या तर खूपच लवकर त्यांच्याशी जवळीक साधू शकते. ही पद्धती पण एका माध्यमासारखी उपयोगात आणतात. अर्थात् त्याची सुरूवात, वर्तन, बोलणे, अवलोकन इ. चे पण थोडेबहुत महत्त्व असते.

मी त्यांना उत्साहाने विचारले, ''गांजाची की चरसची चिलीम ओढणार? त्यांनी खुश होऊन सांगितले, ''आज तर गंगा-जमुना होऊ द्या. आज मस्त होऊ या.'' मी लगेच पाकीटांतून गांजा-चरस काढला. गांजा धुवायला लागलो तेव्हा, उदासी महाराजांना चिलीम-साफी तयार करायला विनंती केली. ते पण दहा दिवसापासून उपाशी होते. रामकुभाईंनी २ सिगारेट तोडून त्यांत चरस मिश्रीत करायला सांगितले. चांगल्याप्रकारे गांजा धुवून, साफ करून सुक्या तंबाखुबरोबर भेसळ करून चरसयुक्त सिगारेटच्या तंबाखुबरोबर मिळवून चांगल्या प्रमाणात मिश्रण तयार करून चिलीममध्ये भरून त्यावर कोळसा ठेवून अघोरी महाराजांना चिलीम दिली.

'अलख' जोराने नाद झाला. जणू शंख फुंकला. 'बमबम खुश रहे हरदम' 'शिव जोगी काया रहे निरोगी' 'गिरनारी शिखर पर बैठकर खबर ले हमारी' - एवढे बोलून एक जोरात श्वास घेतला गेला. जणू काही लहानशी चिलीम दाही दिशेच्या वायुमंडळाला खेचून स्वत:मध्ये सामावून घ्यायला आवाहन करीत होती. अघोरी महात्म्यांनी चिलीम उदासी महाराजांना दिली; असे क्रमवार चालले. चिलीम कसदार बनल्यामुळे सर्वांवर कमी अधिक प्रमाणात नशा चढत होती.

थोड्यावेळाने जणू शांत सरोवराच्या सपाटीवर वेगवान हंस आकाशातून सरळ सरोवरात उतरतो आणि सपाटीची शांती खंडीत होते त्याप्रमाणे महाराज गंभीर स्वरात बोलले, ''जिसका चुन, उसका पुन (पुण्य) जोगी अवधूत को पाप ना पुन.''

या दोन ओळीत त्यांनी समग्र वेद, पुराण, उपनिषद, भागवत्गीता तसेच सर्व ग्रंथरत्नांच्या सारतत्त्वाचा अर्क काढून दिला. माझ्या अल्पबुद्धीप्रमाणे मी याचा अर्थ असा समजतो की, 'कर्मवादाच्या रचनेप्रमाणे स्वयंसंचालीत चक्रगतीच्या अनुसंधानात या ओळी सुचना करतात. याचा सरळ साधा अर्थ असा करता येईल की, जो कुणी जे काम करतो ते चांगले की वाईट त्याच्या परिणामाला तोच जबाबदार असतो. जोगी-अवधूताला काही घेणे-देणे नसते. पण यात एक रहस्य आहे. ही गोष्ट तेव्हाच खरी ठरू शकते. जेव्हा जोगी-अवधूत संपूर्ण जागृत द्रष्टा भावात असेल. तसेच संकल्प-विकल्पाच्या अवस्थेपासून दूर असेल. तरीसुद्धा कर्मयुक्त रहात असेल त्याच्याबाबतीत या दोन पंक्ती योग्य आहेत.

अघोरी महात्मा मला म्हणाले की, ''तुमची जिज्ञासा, विचारसरणी, प्रकृती मी ओळखतो; त्यामुळेच मी तुम्हाला इथे बोलावले. नाहीतर या दुनियादारीत मी रहात नाही. तुमच्या शक्तीमर्यादेनुसार तसेच साधु-संपर्क करीत आहात, त्यामुळे त्यांचे योग्य दर्शन लोकांना दाखवू शकाल. याकारणामुळे मी तुम्हाला भेटायला बोलावले आहे. आता तुम्ही काय जाणण्यास उत्सुक आहात ते सांगा.''

त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीवरून तसेच बोलण्यात गोष्टीच्या रहस्यावर भारपूर्वक स्पष्टता यावरून असे वाटले की हे महात्मा शिक्षीत तसेच संस्कारी असले पाहीजे. मी त्यांना नम्रपणे विचारले की, ''महाराज! आपल्या बोलण्याच्या शैलीवरून असे अनुमान केले की, आपण चांगल्या प्रमाणात शिक्षण घेतले असावे?'' त्यावर ते हसून म्हणाले, ''तुमचे अनुमान बरोबर आहे.आता मी माझा परिचय थोडक्यात आपल्याला सांगतो; मी पूर्वाश्रमी अलाहाबादेत ॲडव्होकेट होतो; माझी वकिली चांगली चालली होती. माझी पत्नी-मुले होती. लहानपणीच मी मातृ-पितृप्रेमाला पारखा झालो. स्वबळावर माझा संसार, नोकरी व प्रतिष्ठा चांगली संभाळली जात होती. परंतु एक दिवस माझ्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला. संध्याकाळी कोर्टातून घरी आलो त्यावेळी घरचे दृश्य व पत्नीची दशा पाहून मी दि:गमुढच झालो. तिच्यावर क्रूरतेने व घातकीपणाने बलात्कार करण्यात आला होता. त्या व्यक्ती कोण होत्या हे विचारपूस केल्यानंतर समजले गेले की, त्या माझ्या अशिलाच्या प्रतिवादी होत्या. या प्रसंगामुळे माझ्या रोमारोमांत क्रोधाग्नी व्यापला गेला, परंतु मी पत्नीची सेवा-चाकरी, मुलांची देखभाल तसेच दुष्कृत्य करणाऱ्यासमोरील माझी नि:सहायता यामुळे मी अगतिक होतो, लाचार होतो. इतकेच नव्हे तर एका रात्री माझ्या पत्नीने गळफास लावून आत्महत्या केली. या प्रसंगाने माझे मन खळबळून उठले. पत्नीच्या चितेच्या अग्नीज्वाला मी माझ्या हृदयात एकत्र केल्या. माझ्या हृदयात वैराची आग भडकत होती. मी प्रत्येक गोष्टीने दुर्बल होतो. माझ्याजवळ काहीच उपाय नव्हता. खूप विचारानंतर मी तंत्रविद्येने वैर घेऊ शकतो असे वाटू लागले. कारण आसामच्या सिलीकुडी पहाडात एका तांत्रिकाबरोबर आधी ओळख झाली होती; त्याच्याबरोबर परिचय झाल्यानंतर मला तंत्रविद्या विषयाची वाचनाची गोडी लागली

होती. मी मंत्रतंत्राची पुस्तके, तसेच जुने साहीत्य लक्षपूर्वक वाचू लागलो. त्यांच्याकडे जाण्याचा निर्णय घेतल्यावर दोन्ही मुलांना अनाथाश्रमात सोडून मी आसामला रवाना झालो. सुदैवाने मला ते तांत्रिक भेटले. मी त्यांच्याजवळ २-३ दिवस राहून गंभीरपणे माझी इच्छा दर्शवली. माझे बोलणे नीट ऐकल्यानंतर, त्यांनी माझा दृढनिश्चय पाहून मला कामाक्षीदेवीला त्यांच्या गुरुकडे पत्र लिहून पाठवले. तेथून कामरूपदेश– बंगालला आलो. कामाक्षीमंदिरात त्यांची विचारपूस केल्यावर समजले की, ते तेथेच जंगलात रहातात. खूप शोधानंतर मी तांत्रिकांच्या गुरूजवळ पोचलो. त्यांची वेशभूषा, प्रभाव व जागेच्या प्रभावावरून मी अनुमान केले की, इथे जर आश्रय मिळाला तर जरूर माझी इच्छा पूर्ण होईल. कोणत्याही प्रकारे मी त्यांचा शिष्य होण्याचे नक्की केले. मी थोडक्यात माझा परिचय दिला व तांत्रिकाचे पत्र दिले. त्यांनी मला स्वत:लाच ते पत्र वाचायला सांगितले. मी पत्र वाचून ऐकवल्यावर, माझी वैर घेण्याची इच्छा त्यांच्याकडे स्पष्टपणे जाहीर केली; त्यांनी क्षणभर विचार करून मला विचारले; ''तुला सूड घ्याववयाचा आहे ना?'' मी म्हणालो, ''मला कसेही करून सूड घ्याववयाचा आहे'', त्यावर ते म्हणाले, ''तुला माझा शिष्य बनायचा असेल तर मी सांगेन ते करायला लागेल.'' मी सर्व मंजुर म्हणून त्यांना सांगितले.'' त्यांनी मला कडक आवाजात सांगितले, ''चल तर! मी मुत्रत्याग करतो, तु ओंजळ धरून प्यायला लाग.'' मी लगेच ओंजळ धरली. त्यांनी मुत्रत्यागाला सुरूवात केली. पण त्या मुत्राच्या जागी दुधाची धार येवू लागली. मी सर्व दुध पिवून टाकले. माझा विश्वास दृढ झाला. मी साधना सुरू केली. नागाजी बोलता-बोलता थांबले.

भूतकाळातील प्रसंग एकत्र करून सांगण्यासाठी. त्यांनी डोळे बंद केले. ते भूतकाळात हरवले होते, असे त्यांच्या चेहऱ्यावरच्या परिवर्तनाने वाटले. मी लगेच गांजाची चिलीम बनवून तयार ठेवली. त्यांनी डोळे उघडल्यावर त्यांच्या हातात चिलीम दिली. थोडावेळ विचार करून त्यांनी परत बोलायला सुरूवात केली. ''किती मानसिक यातनेचे दिवस होते ते! एकीकडे पेटत राहीलेला वैराग्री, दुसरीकडे कठोर तपस्या. तो भयंकर उलथापालथ करणारा वैराग्री नसता तर कदाचित् मी इतकी भीषण साधना केली नसती. माझे गुरू उदयनाथजी ह्यांच्याजवळ राहून सेवा-पूजा आणि तंत्रक्रियेचे अध्ययन सुरू केले.

उदयनाथजी कामरूप देशात असलेल्या नीलपर्वतातील गुहेत राहून कामाक्षीदेवीची उपासना करीत. आदीतंत्राचे ते महान सिद्ध होते. शांतीकर्म, विद्वेषण, उच्चाटण, मारण, मोहन, वशीकरण इ. षट्तंत्रांचा अनेक रीतीने ते खूप सहजपणे उपयोग व्यवहारात करीत.

आसाम-बंगालच्या पूर्वेच्या सीमेवर नैरोगेज गौहत्तीचे टर्मिनस स्टेशन आहे. तेथून कामाक्षीदेवीच्या शिखराकडे जाऊ शकतो. मी उदयनाथजींबरोबर ज्या भागात रहात होतो, तो दोन पर्वतांतील मधला भाग होता. त्या सपाट मैदानात पर्णकुटी करून रहात होतो. कामाक्षीदेवीचे शिखर तेथून स्पष्ट दिसे. कामाक्षीमंदिराजवळ एक लहान सरोवर आहे ज्याचे पाणी अनेक रहस्याने भरलेले आहे. तेथून पर्वत उतरून गौहत्ती नगराच्या समोर ब्रह्मपुत्रा नदीमध्ये एक टापू आहे. तिथे उमानंद महादेव विराजमान आहेत. ज्यांना कामाक्षीदेवी तसेच कामरूप देशाचे रक्षणकर्ता भैरव मानण्यात येते. त्या सर्व क्षेत्रांची माहीती मी आपल्याला अशासाठी सांगतो की, माझ्या साधनेच्यावेळी ही सर्व क्षेत्रे माध्यमरूप होती. उदयनाथांनी मला दिक्षा देण्याआधी माझे जन्मनक्षत्र, योग, स्वर, संज्ञा, (अवकडाहृचक्र) अकडचक्र वगैरे महत्त्वाच्या बाबींचा सुक्ष्म अभ्यास केला.

गुरु ज्यावेळेस मंत्र देतो तेव्हा सर्व गोष्टींची चौकशी केल्यावर मंत्रदिक्षा देतो. साधकाला हा मंत्र साध्य, सुसाध्य, असाध्य आहे का? मंत्र मित्र राहील वैरीराहील की सम राहील? मंत्र दोषित आहे की निर्दोषीत? त्यात कुठल्या कुठल्या बीजाचे कमी-अधिक प्रमाण करून तो मंत्र सुसाध्य करणे. साधकाच्या नावाबरोबर मंत्राच्याअक्षराची मोजणी करून त्याचा मुळ आधार अकडमचक्राच्या मदतीने शोधणे. या सर्व कार्यांची पारख केल्यावर तंत्रक्रियेचे पहिले काम सुरु करता येते. उदयनाथजींनी माझ्या सर्व बाबींचा अभ्यास केला; व मला 'बालकनाथ' असे नाव दिले. त्यानंतर महाराजांनी माझ्यासाठी सुसाध्य असे दैवत कोणते? याचा शोध घेतला, व 'चंडभैरव' तसेच 'कापालभैरव' ह्या २ भैरवांची निश्चीती झाली. आठ भैरवांपैकी हे २ भैरव माझी अभिलाषा पूर्ण करतील हे निश्चीत झाले. प्रथम चंडभैरवाच्या साधनेला आरंभ झाला. जवळपास स्मशान नसल्यामुळे, स्मशानभूमीतून राख, माती, जळलेली हाडे आणून पूर्वनियोजित जागी त्याची स्थापना करून स्मशान बनविण्यात आले. उदयनाथजींनी आकर्षणक्रियेद्वारा एका रेड्याला गावातून बोलावून आणले.

अमावस्येच्या रात्री उदयनाथजींनी हविष्य-सामुग्री एकत्र करून रचना केलेल्या स्मशानात बलिदानविधी सुरू केला. स्वत: दिगंबर होऊन मला दिगंबर व्हायचा आदेश दिला. आम्ही दिगंबर बनून स्मशानभूमीत आलो. भूतनामाचे पूजन करून त्याला आवाहन केले. स्मशानभूमीच्या मध्यभागी पूजा करून चंडभैरवाच्या उपासनेसाठी आसन स्थापित करण्यात आले. उदयनाथजींनी रक्षाबंध करून स्मशानाच्या बाहेर अग्नी प्रज्वलित केला. एका तीक्ष्ण तलवारीचे विधीपूर्वक पूजन करण्यात आले. मी आणि उदयनाथजी समोरासमोर बसून अग्नीत मंत्रोच्चार करीत आहूती देऊ लागलो. उदयनाथजींच्या सांगण्यावरून मी आहूती द्यायचे बंद केले. ते नंतर उग्र होऊन मंत्रोच्चार करू लागले. वातावरण हळूहळू उग्र बनू लागले. उदयनाथजींनी नंतर एक फटका मारून मोठ्याने मंत्रोच्चार केला. त्याचबरोबर माझ्या शरीरात एक प्रचंड विद्युत (आवेश) शक्ती निर्माण झाली. मी तलवार पकडून मोठ्याने गर्जना केली; व आसनावर उभा राहीलो. उदयनाथजींनी रेड्यावर मुठ भरून विभूती फेकली. मला काय होत होते याचे भान नव्हते. माझ्यात इतके बळ व्यापले होते; की त्याची कल्पनाही मी करू शकत नव्हतो. उदयनाथजींनी बलीसंज्ञा दिल्यावर, मी तलवारीच्या एका प्रहाराने रेड्याचे मस्तक धडावेगळे केले. कापलेले डोके स्मशानभूमीमध्ये चंडभैरवाच्या स्थापन केलेल्या आसनावर जावून पडले. रेड्याच्या धडातून किंवा मस्तकातून एकही रक्ताचा थेंब बाहेर पडला नाही. सर्व रक्त शोषले गेले होते. एवढे झाल्यावर चारही बाजूंनी घोर, भयानक आवाज येवू लागले. जणू जंगल व नील पर्वतातील गुहा थरथरत होत्या. मी पूतळ्यासारखा उभा राहीलो. उदयनाथजींनी घाईघाईने येवून माझे केस

पकडून स्मशानभूमीत खेचून नेऊन रेड्याच्या कापलेल्या मस्तकावर बसवले. माझ्या मस्तकावर हात ठेवून मला चंडभैरवाच्या उपासनेचा मंत्र दिला. बरोबर आणलेले नैवेद्य चारही दिशांना फेकल्यावर वातावरण शांत झाले.

मंत्रदिक्षेचे कार्य पूर्ण झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी स्मशानभूमीत पडलेले रेड्याचे धड चिरून त्यातील आवश्यक वस्तु काढण्यासाठी मी व उदयनाथजी स्मशानभूमीत गेलो. उदयनाथजींनी तीक्ष्ण हाडाचे हत्यार देऊन रेड्याचे धड चिरायला सांगितले. ते हत्यार साजरी प्राण्याच्या हाडापासून बनविलेले होते.

मी दिगंबर होऊन रेड्याच्या नाभीत तीक्ष्ण हत्याराचे टोक खुपसून गळ्यापर्यंत हत्यार चालविले. कुठल्याही प्रकारच्या परिश्रमाविना हत्यार अगदी सहज गळ्यापर्यंत पोहोचले. केळ्यावरचे साल सहजपणे काढावे तशी कातडी सुटी झाली. धडातील मांस सुकून कापसासारखे झाले होते. रक्ताची लाली कुठेच दिसत नव्हती. हत्याराने त्याची हाडे वेगळी करण्यात आली. पाठीच्या कण्याची हाडे घेण्यात आली; तसेच त्याचे कातडे, सुकलेले काळीज घेण्यात आले. त्याच्या मस्तकाची चामडी, डोळे साफ करून वेगळे ठेवण्यात आले. महिष मुंडक्याला राखेने साफ करून स्वच्छ करण्यात आले. आत सुकलेला त्याचा मेंदू तसाच ठेवण्यात आला. ज्या जागी मस्तक कापून पडले त्याच जागी खड्डा खणून खालील भागात त्याच्या डोक्याची चामडी तसेच डोळे पसरवून ठेवून त्यावर त्याची स्थापना करून राखेने बंद करण्यात आला. त्याच जागी उपासना करण्याचे आसन तयार करण्यात आले. त्यानंतर धडातून निघालेल्या नको असलेल्या गोष्टी खड्डा खोदून पुरण्यात आल्या. तो सबंध दिवस रेड्याच्या पाठीच्या कण्याला घासून त्यापासून माळा तयार करण्यात आली. सत्तावीस मणक्याना रेड्याच्या केसांच्या दोऱ्यात ओवण्यात आले. उदयनाथजींनी ती माळा अभिमंत्रित करून बीजेच्या रात्रीपासून जप करण्यास सांगितले

द्वितीयेच्या बीजेपासून साधना सुरू होणार होती. उदयनाथजींनी फक्त झाडाची पाने खाऊन दिवस-रात्र जप करण्यास सांगितला, ज्यामुळे लवकर सिद्धी प्राप्त होते. कुठल्याही प्रकारच्या भयानक दृश्याला घाबरू नका, कुठल्याही भीषण आवाजाने चलीत होऊ नका; निर्भयतेने परिश्रम करा. मी तुमची रक्षा करीन असे सांगितले. बीजेच्या संध्याकाळपासून चंडभैरवाची साधना सुरू केली. पहिला दिवस निर्विघ्नपणे पार पडला. मी स्मशानभूमीतच राहू लागलो. झाडाची पाने खाऊन स्मरणजप करीत राहीलो. परंतु १० दिवसानंतर जपाला सुरूवात केल्याबरोबर असंख्य विंचू चावल्यावर जशा वेदना होतात; तशा होऊ लागल्या. कंबर आता फाटते की काय अशी पिडा व आग व्हायला लागली. जप बंद होऊ लागला. डोळ्यासमोर अंधारी आली.

तरीपण दिवसरात्र सर्व सहन करून जप चालू ठेवला. शरीर हळूहळू सुकू लागले. सबंध शरीरात अग्नीचा प्रवाह श्वासाबरोबर चालत असल्यासारखे भासत होते. स्वभावात उग्रता, क्रूरता येऊ लागली. उदयनाथजी नियमितपणे रोज दुपारी माझ्याकडे यायचे. ते माझ्या परिवर्तनाची नोंद ठेवीत होते. ते माझे गुरू असले तरी माझ्या वाढणाऱ्या उग्र स्वभावाला लक्षात घेऊन मर्यादीत गोष्टीतून सल्ला-सुचना करीत. माझ्या कठोर तपस्येवर उदयनाथजी खूप खुश होते. दोन महिन्याच्या जपानंतर माझे शरीर सुकले होते. परंतु मनोबल आणि आत्मविश्वासाचा अद्‌भुत विकास होत होता. दोन महिन्याच्या काळात पहायला मिळणारी दृश्ये, ऐकू येणारे हृदयद्रावक भीषण आवाज आता माझ्यापासून दूर राहू लागले. एका रात्री जप चालू असता, अचानक, चारी बाजूंनी आवाज येवू लागले, माझे आसन खालून हलल्याचा मला भास झाला. मी दृढपणे जप चालूच ठेवला. थोड्यावेळाने वातावरण शांत झाले. दुसऱ्या दिवशी मी उदयनाथजींना रात्रीच्या प्रसंगावरून बोललो त्यावर ते म्हणाले, ''आता चंडभैरव प्रकट होण्याची वेळ जवळ आली आहे. आज रात्री लाल कर्णफुलांची माळा– स्वत:चे रक्त, शेंदूर, लवंगांची जोडी– चार ज्योतींचा दिपक जवळ ठेवून मंत्रजप करा. जेव्हा चंडभैरव प्रकट होईल, तेव्हा घाबरून न जाता, उभे राहून नमस्कार करा व त्यांच्या गळ्यात लाल कर्णफुलाची माळा घालून शेंदराचा टिळा लावून, एक लवंग स्वत:च्या रक्तात ठेवून दुसऱ्या हातात दुसरी लवंग ठेवा; व त्यांना नैवेद्य ग्रहण करण्याची प्रार्थना करा. ज्यावेळेस भैरव रुधिरपान करून दातांचे कचकचाटीसारखे कर्कश आवाज करतील, तेव्हा दुसरी लवंग त्यांच्या हातात ठेवा, प्रसन्न झाल्यावर तीन वेळा ते प्रश्न विचारतील, ''काय इच्छा आहे ?'' त्यावेळेस त्यांना वश करून नेहमी सहाय्य करण्याची मागणी करा. या मागणीची तीनवेळा अनुमती घ्या; त्यानंतर त्यांची आरती करून नमस्कार करा. त्यांची आरती झाल्यावर चंडभैरव तुमच्या जपमंत्राला सिद्ध करून, तुम्हाला वचन देऊन त्यांच्या स्थानी निघून जातील.

उदयनाथजी सर्व सामुग्री संध्याकाळी घेवून आले. सुर्यास्तानंतर मी नेहमीप्रमाणे जप करायला सुरुवात केली. कालच्यासारखे सर्व दिशांनी आवाज येवू लागले. कसे कोण जाणे मला समाधी लागली. मी अंतर्मुख बनलो. जप बंद झाला. मला माझ्या अस्तित्त्वाचे भान राहीले नाही. सर्व सामुग्री जशीच्या तशीच राहीली. सकाळी ध्यानातून जागे झाल्यावर खूप नाराज व दु:खी झालो. तीन महिन्याच्या मेहनतीवर पाणी पडले. मी हताश झालो. आता मी वैर घेऊ शकणार नाही; असे वाटू लागले. मी लहान मुलासारखा ओक्साबोक्शी रडू लागलो. दुपारी उदयनाथजी आले, त्यावेळेस मी खूप उदास होतो. रात्रीचा प्रसंग सांगितल्यावर मला परत रडू आले. उदयनाथजींनी आश्वासन देत सांगितले की, ''बालकनाथ! तुमच्या पराकाष्ठेच्या तपस्येचा परिणाम शून्यात होणार नाही. जपाबरोबरच चंडभैरवाला भेटण्याची प्रबळ इच्छा जागृत ठेवा. सहजपणे अहंकाराला प्रवृत्त होऊ देवू नका. आज परत तीव्र वेगाने अणुरेणूत जागृत चेतनेला पसरवा. मग कार्य सफल होण्यास जराही संदेह नाही. उदयनाथजींनी माझी मानसिक अवस्था पाहून सोयीस्कर सल्ला दिला. ''तुम्हाला वाटत असेल की, तुमचे कार्य सिद्धीस जाणार नाही तर तुम्ही तुमच्या शत्रूंची नावे सांगा, मी इथे बसल्या बसल्या त्यांना यमसदनाला पाठवेन.''

त्यांच्या बोलण्याने माझा स्वाभिमान जागा झाला; माझ्या दुर्बलतेवर घातलेला मार्मिक घाव मी समजलो. मी क्रोधाने उदयनाथजींना म्हणालो, ''माझ्या शत्रूंचे निकंदन मीच करीन; नाहीतर माझे अस्तित्त्व

या पृथ्वीवर रहाणार नाही. आज हे कार्य तरी सिद्ध करीन; किंवा आत्महत्या करून माझे निष्फल जीवन नष्ट करेन.''

संध्याकाळी परत उदयनाथजींनी मला सर्व सामुग्री आणून दिली, मी उग्रपणे जप करायला सुरूवात केली. क्षणाक्षणाला माझी उग्रता वाढत गेली. मध्यरात्री चारही दिशा कंप पावू लागल्या. माझे आसन खालून हलू लागले. त्याबरोबर मी दृढपणे जप चालूच ठेवला. चारीबाजुंनी येणाऱ्या आवाजांची गती वाढली. मी वेळ जवळ आली असे समजून ४ ज्योतींचा दिप लावला. माझ्या आसनाखाली असलेले महिष-मुंड वर यायचा प्रयत्न करू लागले, त्यामुळे मी आसनासहित हलू लागलो.

एकाएकी असंख्य घंटांचा नाद ऐकू येऊ लागला. माझ्या आसनाखाली असलेले महिष-मुंडके आपोआप जमिनीतून बाहेर येऊन माझ्यासमोर उभे राहीले; असे कुठलेही भयंकर क्षण सहन करण्याची माझी पूर्ण मानसिक तयारी होती. मी तिकडे दुर्लक्ष करून जप चालूच ठेवला. महिष-मुंडक्याचे डोळे अंगाऱ्यासारखे पेटत होते. त्याबरोबर त्याने गर्जना केली; त्यावेळेस चंडभैरवाची रुद्र भयानक आकृती महिष-मुंडक्यावर स्पष्ट व्हायला लागली. एका हुंकाराबरोबरच आसपासचे वातावरण कापू लागले. मी उभे राहून लाल कर्णफुलाची माळा चंडभैरवाच्या गळ्यात घातली. शेंदूराचा टिळा लावला. टिळा लावतेवेळी आंगठ्याला, तापलेल्या लोखंडाला अंगठा लावावा व चटका बसावा, तसा अनुभव आला. लगेच माझ्या आसनाजवळ असलेली कवटी घेवून, त्यावर करंगळी कापून तिचे रक्त एकत्र केले; व त्यात एक लवंग घालून मन:पूर्वक ग्रहण करण्याची प्रार्थना केली. रक्त प्याल्यावर त्यांनी दात उघडून भयंकर आवाज केला. जो सहन करणे मला असह्य होत होते. मी हिंमतीने दुसरी लवंग त्यांना दिली. चंडभैरवांनी गंभीर स्वरांत मला विचारले, ''काय इच्छा आहे?'' मी हात जोडून मंत्रजप चालूच ठेवला. तिसऱ्यांदा मला जेव्हा विचारले, ''काय इच्छा आहे?'' त्यावर मी शांतपणे म्हणालो, ''देवा! मला वश होऊन मला सर्व कार्यात सहाय्य करावे.'' त्यांच्याकडून तीन वेळा वचन घेतल्यावर चार ज्योतींच्या दिव्यानी त्यांची आरती केली. त्यावेळेस त्यांनी मला स्मरण केल्यावर सहाय्य करण्याचे कबुल केले. मी हात जोडून नमस्कार केल्यावर ते अदृश्य झाले. सकाळपर्यंत मी स्मशानभूमीच्या आसनावरच होतो. उदयनाथजी आल्यावर त्यांनी मला प्रसन्न पाहीले. मी आभारी होऊन सदगदीत होऊन त्यांच्या चरणावर पडलो. त्यांनी मला प्रेमाने उठविले व सांगितले की, अजून तुमचे कार्य अपुरे आहे. या साधनेबरोबर तुम्हाला कपालीभैरव तसेच कर्णपिशाचीनीला पण सिद्ध करायचे आहे. ज्यामुळे तुम्ही तुमचे कार्य संपूर्ण आत्मविश्वासाने निर्विघ्नपणे पार पाडू शकाल. एका कार्यात सफलता मिळाल्यामुळे मी उत्साही बनलो होतो.

एक आठवडा पूर्वतयारी केल्यानंतर कपालीभैरव व कर्णपिशाचीनीची साधना क्रमवार करण्याचे ठरविले.

वाचक मित्रांनो, नागाजींनी (बालनाथांनी) केलेल्या अथांग प्रयत्नामागे मला एक गोष्ट स्पष्ट समजत होती की, वैर, प्रेम, भक्ती, त्याग, तप जेव्हा पराकाष्ठेच्या पराकोटीस जातात तेच मुळ तत्त्वाची अनुभूती होते. जे केलेल्या परिश्रमांपेक्षा अनेक पटींनी संतोषकारक असते.

नागाजींनी बोलणे पुढे चालू केले. जेव्हा कुठला पण एक मंत्र किंवा एक सिद्धी सुसाध्य होते, त्यानंतर त्या क्षेत्रातील दुसऱ्या सिद्धी प्राप्त करण्यास साधकाला कठीण परिश्रम करावे लागत नाही.

कपालीभैरवाच्या साधनेसाठी मानवाची कवटी मिळवली होती, ती अशा माणसाची हवी की, ज्याने कधी मंत्रदिक्षा घेतली नसेल, ज्याचा कुणी गुरु नसेल उदयनाथजींनी सांगितले की, ''हा प्रयोग ४० दिवसांचा असतो. रोज स्मशानात बसून कपालीभैरवाचा जप करायचा व आकाशात दृष्टी ठेवायची. जेव्हा कुठलाही तारा निखळताना दिसला की, लाल दोऱ्याला एक गाठ बांधायची, अशा वीस गाठी बांधल्यावर त्या दोऱ्याला कवटीच्या कपाळावर बांधायचे. त्यानंतर रोज रात्री मद्यपात्र (कांशाचे) तसेच हांडीत हाताने सडलेल्या तांदुळाचा भात करून ठेवायचा. तेलाने एक चौक करून, पित्त (कुष्ठ) आणि विषानी यंत्र काढायचे. त्यात खोपडीला स्थापन करून जप करायचा. तिसाव्या दिवशी जेव्हा मद्यपात्रात ठेवलेली दारू व हांडीतला भात आपोआप अदृश्य झाला तर समजायचे की, कपालीभैरवाचे प्रेतगण अन्न स्वाहा करीत आहेत. हा क्रम रोज चालेल. उपद्रवपण होईल. भूत, प्रेत, पिशाच्च इत्यादि उपस्थित होऊन वेगवेगळी मागणी करतील; किंवा विघ्ने उपस्थित करतील. याठिकाणी लक्ष न देता आपले कार्य शांतीपूर्वक करावे. चाळीसाव्या दिवशी कपालीभैरव उपस्थित होतील. त्यांचा रक्तवर्ण असेल. हातात खड्ग व मद्यपात्र असेल; ते हुंकार करून मद्यपात्र पुढे करतील; त्यावेळेस त्यात काठोकाठ भरून सांडेल इतकी दारू पहिल्याच वेळेस भरावी. एक गोष्ट खास ध्यानात असावी की, प्रथम पात्र भरले नाही तर ते परत भरणार नाही आणि कपालीभैरव क्रोधीत होऊन प्रहार करतील. जेव्हा कपालीभैरव मद्यपान करतील, तेव्हा पशुबलीकडे निर्देशन करावे. ज्या मंत्राने जप करण्यात येतो त्या मंत्राने स्वत:चे रक्त अभिमंत्रून त्या पशुबळीवर शिंपडावे. याचक्षणी कपालीभैरव त्याचे भक्षण करून, प्रसन्न होऊन, वर मागायला सांगेल; त्यावेळेस मानवी कवटी हातात घेऊन त्यावर त्यांचा हात ठेवून वचन घ्यावे, ज्यामुळे कवटीच्या माध्यमाद्वारा नेहमी त्यांची छाया तुमच्याबरोबर राहील.''

उदयनाथजींनी सांगितल्याप्रमाणे मी प्रत्येक कार्य धीराने, आणि गंभीरतेने करू लागलो. मध्यरात्री भूतप्रेत, येऊन तुफान-भरती करायचे आणि दारू पिऊन, भात खाऊन जायचे.

चाळीसाव्या दिवशी संध्याकाळी प्रथम चंडभैरवाचे आवाहन करून त्यांना विनंती केली की, कपालीभैरवाचे मद्यपात्र अर्धवट रहाणार नाही याची काळजी घ्या. चंडभैरवांनी एका कलशाच्या आकाराचे सुरापात्र मला देऊन सांगितले, ''या पात्राने कपालीभैरवाचे पात्र भरा.'' सुरापात्र माझ्याजवळ ठेवून सर्व वस्तूंची नीट पहाणी केली. मध्यरात्र उलटून गेल्यावर कपालीभैरवाचे आगमन झाल्याची चाहूल लागली. आकाशातून प्रेतगण, पिशाच्च असे अनेक जीव वजनदार दगडासारखे पडत होते. मंत्रजप शांतपणे एकाच गतीने चाललेला होता. समोर पडलेल्या कवटीतून लाल रंगाचा धूर निघू लागला. कुठलातरी विचित्र वास त्या धुरात मिसळलेला होता.

हळूहळू त्या धुरातून रक्तवर्णीय कपालीभैरव प्रकट झाला. नशेने चूर, कपाळावर आठ्यांचे जाळे, खेचलेले डोळे, असे भयानक स्वरूप कपालीभैरवाचे दिसत होते. उदयनाथजींनी सांगितल्याप्रमाणे कपालीभैरवाचे मद्यपात्र, चंडभैरवांनी दिलेल्या सुरापात्राने भरले. ओथंबणारी दारू पाहून कपालीभैरवांना कल्पना आली की, मद्यपात्राला भरणारा कोण आहे? मद्य पिऊन त्यांनी खड्ग असलेला हात उंच केला. मी त्यांचे स्मरण जरून जवळ बांधलेल्या बकऱ्याला स्वत:चा आंगठा कापून त्याच्या कपाळाला रक्ताचा टिळा लावला. त्याबरोबर बकरा धारातीर्थी पडला. त्याच्या गळ्यातून आवाज निघण्याआधीच त्याचे प्राण पंचतत्त्वांत विलीन झाले. कपालीभैरव त्यांच्या जागेवरून हलले नव्हते; तरीपण बकरा शोषला गेला होता. कपालीभैरवांनी प्रसन्न होऊन, मानवी कवटीवर हात ठेवून वचन दिले.

दोन्ही भैरवांचे साधन झाल्यावर मी खूप उतावळा बनलो. सकाळीच उदयनाथजींना सर्व हकीकत सांगितली, त्यावर ते म्हणाले, ''अजून उतावळे होऊ नका, धीर धरा. कर्णपिशाचीनीची साधना झाल्यावर तुम्ही गेलात तर पुढील कार्य तुम्हाला अनुकूल होईल.''

मी विचारले, ''या कार्यात कर्णपिशाचीनीची साधना आवश्यक आहे?'' त्यावर ते म्हणाले, ''जी काही कामगिरी तुम्ही कराल, त्यांची माहिती तुम्ही कशी मिळवाल? ती तुम्हाला तुमच्या शत्रूंची इत्थंभूत माहिती देत राहील. फक्त २१ दिवसांचा प्रयोग आहे; तो पूरा करून थोडी विश्रांती घेऊन मगच जाल तर बरे होईल.''

उदयनाथजींनी मंत्र देऊन विधी समजावला. २१ दिवसांत, १० लाख जप करून काळे तीळ, उडीद, तूप, इत्यादींपासून बनवलेला पिंड आकाशात फेकायचा आणि उजव्या खांद्यावर लाल कापडाचे आसन ठेवायचे. आकाशात फेकलेला पिंड कर्णपिशाचीनी घेते; व उजव्या खांद्यावर येऊन कानात स्वत:ची प्रसन्नता प्रकट करते. उदयनाथजींच्या आदेशानुसार, नक्षत्र, वार, वेळ, निश्चीत करून मी कर्णपिशाचीनीची साधना सुरू केली. कुठल्याही विघ्नाविना २० दिवस पूर्ण झाले. जपसंख्या पण पूर्ण झाली होती. २१व्या दिवशी सर्व तयारी करून, संध्याकाळी पूजास्थानावर बसून कर्णपिशाचीनीचे ध्यान सुरू केले. आसपासचे वातावरण, वृक्ष, पक्षी, लहान-मोठे प्राणी, सर्व एक झाले होते. एका अगम्य आत्मीयतेचा भाव अनुभवास येत होता. हळूहळू मध्यरात्रीची वेळ झाली. उदयनाथजींनी सांगितल्याप्रमाणे पिंड बनवून आकाशात फेकला. तो कोण घेवून गेले हे काहीच कळले नाही; कुणाचे प्रत्यक्ष दर्शन झाले नाही; मी उजव्या खांद्यावर लाल आसन ठेवले. कर्णपिशाचीनीचा मधुर आवाज कानांमध्ये ऐकू आला. ''जी अभिलाषा असेल ती सांगा.'' मी उदयनाथजींनी सांगितल्याप्रमाणे लाल आसनाच्या कपड्याचा थोडा तुकडा फाडून, उजव्या मनगटाला बांधला. कर्णपिशाचीनीला मी म्हणालो, ''या लोकांविषयी जी काही माहीती असेल, ती माझ्या इच्छेप्रमाणे मला सांगण्यासाठी मी जेव्हा तुझे स्मरण करेन तेव्हा हजर रहा'', असे वचन मी तिच्याकडे मागितले.

या सर्व प्रक्रियेनंतर कर्णपिशाचीनीची साधना पूर्ण झाली.

## रक्तपात

वाचकमित्रांनो, या साधनेचा उल्लेख करताना, त्यांची माहीती सांगताना काही गोष्टी साधुंच्या मर्यादांमुळे जाहीर करू शकत नाही; व काही गुप्त गोष्टी मलाही माहीत नाहीत.

नागाजी एका आवेशाने हकीकती सांगत होते, मी अनिमिषपणे त्यांचे बोलणे ऐकत होतो.

''मी तीन साधना खूप कष्ट करून साध्य केल्या. माझ्या जीवनाचा एकच हेतू होता, माझ्या शत्रूंना मृत्यूच्या दारात पाठविण्याचा. याशिवाय कुठलीही महत्त्वाकांक्षा नव्हती. मी नीलपर्वताच्या गुहेतच, कर्णपिशाचीनीद्वारा, माझ्या शत्रूंची माहीती मिळविली. चारापैकी एक अलाहाबादेच्या बाहेर होता. बाकीचे तीन अलाहाबादेत होते. मी त्यांना तिथेच बसून मारू शकत होतो; परंतु मला त्यांना आव्हान देऊनच मारायचे होते; तरच माझ्या मनाला शांती मिळाली असती. मी दहा दिवस कामाक्षीदेवीलाच राहीलो. त्या दिवसात उदयनाथजींनी माझ्याकडून वचन मागितलं की, मी हे कार्य पूर्ण झाल्यावर कधीही या साधनांचा अकारण उपयोग करणार नाही.'' मी त्यांना सांगितले, ''मी हे कार्य पूर्ण केल्यावर आपल्याकडे येईन. इथे ३ महिने राहून आपल्या आज्ञेप्रमाणे करीन.'' उदयनाथजींनी मला वात्सल्यपूर्ण निरोप दिला.

तेथून चालत गौहत्तीला आलो. तेथून ट्रेनने अलाहाबादला पोहोचलो. अलाहाबादपासून थोडे दूर झुत्सी स्टेशनवर मी उतरलो. झुसीचे स्मशान मी माझ्या वास्तव्याकरता पसंत केले. तेथेच रात्री चंडभैरवाला व कपालभैरवाला आवाहन करून त्यांना माझ्या झुसीला येण्याचे प्रयोजन सांगितले; त्यांनी सांगितले, ''तुम्ही सांगाल तसेंच होईल.''

दोन दिवस तेथे राहून मी सर्व सामुग्री एकत्र केली. तिसऱ्या दिवशी मी अलाहाबाद शहरात पोहोचलो. मी सर्वात प्रथम माझ्या चार शत्रूंपैकी गोपाल टंडन, भेरूमल, विरेंद्र मेहरा, देवचंद बन्सल मधून मी प्रथम भेरूमलला जावून भेटलो. माझ्या साधुवेषात त्याने मला ओळखले नाही. माझे कृश शरीर, वाढलेली दाढी, जटा यांनी माझे मुळ स्वरूप बदलले होते. मी त्याच्या घरी गेलो तेव्हां तो दुपारची झोप काढून बाहेर हात-तोंड धूत होता. तो आत गेल्यावर त्याने अंगणात चूळ भरून टाकली होती, तेथील ओली माती एकत्र करून मी फडक्यात बांधली. मी त्याला बोलावले, ''भेरूमल! तो आवाज ऐकून ''कोण?'' विचारीत बाहेर आला. मला ओळखण्याचा प्रयत्न त्याने बराच केला. मी माझी ओळख करून दिल्यावर त्याला खूप आश्चर्य वाटले व व्यंगपूर्ण भाषेत म्हणाला, ''अरे वकिलसाहेब! आपण! मी समजत होतो की, आपण त्रिवेणीसंगमांत समाधी घेतली असेल.'' त्याचे ऐकून माझा क्रोध वाढला. मी त्याला त्वेषाने म्हणालो, ''भेरूमल, आजपासून तिसऱ्या दिवशी मी तुला असा भयानक मरणप्राय करेन की, यमदूत पण तुला घेवून जायला तयार होणार नाहीत.'' – यावर तो म्हणाला, ''तुम्ही निर्णय तुमच्या बाजूंनी घेवू शकला नाहीत! तर मृत्यू कसा काय आणणार! आता भीक मागून पोट भरा, धमकी देण्याचे सोडा, नाहीतर तुरुंगाच्या जाळीमागे सर्वच विसरून जाल.''

अशारितीने माझा त्याने उपमर्द केला. एकतर मला त्याच्याविषयी तिरस्कार व घृणा होतीच, पण अशा वर्तनाने त्याने मला आणखीनच चिथवले.

तेथून मी सरळ झुसीला आलो. संध्याकाळपर्यंत स्मशानात पोहोचलो. मध्यरात्री मी चंडभैरवाचे आवाहन करून महिष-चर्मावर बसून मारणक्रिया सुरू केली. भेरूमलच्या चुळ भरून ओल्या झालेल्या मातीने स्मशानात त्याचे चित्र काढले. त्याच्या छातीवर त्याचे नाव विषाच्या शाईने लिहीले. इतकी क्रिया केल्यावर मी कर्णपिशाचीनीचे स्मरण केले. ती हजर होताच मी तिला भेरूमलची दिशा, नाव, गृहप्रवेशाची माहीती दिली व तासातासाने मला त्याची बातमी घेऊन यायची कामगिरी सांगितली. स्मशानातील कोळसा घेवून भेरूमलच्या चित्रावर ठेवून, अग्नीने प्रज्वलीत केला. माकडाच्या पायाच्या नळीपासून बनविलेले चार खिळे, त्याच्या हातापायात ठोकले. ज्यामुळे त्याचे स्तंभन होईल. त्यानंतर चित्रावर आवाहन केलेल्या चंडभैरवाला तीन दिवस प्रवेश करून, ज्याप्रमाणे मी सांगेन त्याप्रमाणे पीडा करून मारण्याचा आदेश दिला.

चंडभैरमवाने चित्रात प्रवेश करताच मातीचा रंग निळ्या-जांभळ्या रंगाचा झाला. स्मशानात माझ्याशिवाय कुणीच नव्हते. माझ्यासमोर भूतकाळ दिसू लागला. माझ्या पत्नीचा टांगलेला मृतदेह, माझ्या मुलांचे अश्रू, भेरूमलचा निर्लज्जपणा आठवला. माझा क्रोधाग्नी खूप भडकला. मी सुई मंत्रून भेरूमलच्या चित्रात जननेंद्रियाच्या स्थानी खुपसली. कर्णपिशाचीनी मिनिटामिनिटाची बातमी मला देऊ लागली. जणूकाही असे वाटत होते की, भेरूमल माझ्यासमोर तडफडत आहे, त्याच्या जननेंद्रियात खुपसलेल्या सुईमुळे त्याला खूप वेदना व्हायला लागल्या. त्यामुळे विव्हल होऊन ओरडायला लागला. मी स्मशानात माझ्या आसनावर बसून विचार करू लागलो. याला कशारीतीने त्रास द्यावा. ज्याप्रकारे त्याने माझ्या पत्नीचे स्त्रीत्त्व हरण केले तेथून सुरूवात केली.

सकाळपर्यंत भेरूमलला वेदनेपासून सुटका करून घेण्यासाठी डॉक्टरांना धावाधाव करायला लावली. घरचे सर्व त्याला हॉस्पीटलमध्ये जाण्यास सांगत होते; परंतु त्याचे स्तंभन केले असल्यामुळे तो सर्वांना नको सांगत होता. दुसऱ्या दिवशी मी तीक्ष्ण हत्याराने त्याचे जननेंद्रियाला छेद दिला. त्याबरोबर त्याचे जननेंद्रिय सुकून तुटून पडले. असे झाल्यामुळे तो मोठमोठ्याने ओरडून सर्वांना सांगू लागला. ''आता मी जिवंत राहू शकणार नाही. माझा शत्रू मला मारून टाकील. त्याने मला तीन दिवसांची मुदत दिली आहे. त्यावेळेस मी बाभळीच्या मंत्रून घेतलेल्या काट्याने जिभेला भोक पाडले; त्याबरोबर तो चित्कार करून उठला. त्याची जीभ बन्द झाली. जितकी मी त्याला वेदना देत होतो, तितकी क्रूरता माझ्यामध्ये वाढत होती. संध्याकाळपर्यंत त्याचे मित्र नातेवाईक यांनी खूप प्रयत्न केले; पण तसुभर त्यात बदल झाला नाही. २-४ जण बुवा-फकिरांना घेवून आले. त्यांनी क्रिया सुरू करण्याआधीच भेरूमलच्या शरीरात राहीलेल्या चंडभैरवाने त्यांना घाबरवून सोडले. संध्याकाळपर्यंत भेरूमल आपले कपडे फाडू लागला. त्याच्या घरचे त्याच्याजवळ उभे राहू शकत नव्हते. मी शेवटची क्रिया सुरू केली. त्याच्या सर्व शरीरावर अंगार पसवरून दिला व मंत्र म्हणू लागलो. इथे त्याच्या शरीरावर भाजल्यासारखे फोड आले. भेरूमल भयंकर यातना सहन करीत होता. त्याला सर्व आठवावे म्हणून त्याच्या बुद्धीवर कुठलीही क्रिया केली नव्हती. तो हात जोडून काही सांगण्याचा प्रयत्न करीत होता. पण बोलू शकत नव्हता. त्याच्या तोंडातून रक्त हळूहळू बाहेर येऊ लागले. मध्यरात्री मी त्याच्या चित्राजवळ तोंड ठेवून मोठ्याने ओरडलो, ''भेरूमल, माझे शब्द आठव, उद्याचा सूर्य तुला दिसणार नाही.'' कानाजवळ बोललेले हे शब्द ऐकून भेरूमल थरथरू लागला. त्याने हात जोडले, भिंतीवर डोके आपटले. मूक विनंती केली पण त्याचे ऐकणारे, समजणारे कुणीच नव्हते. सकाळी ४ वाजता त्याच्या हृदयाच्या भागातील थोडी माती घेवून धोत्र्याच्या रसात मंत्रून चोळली. तिथे भेरूमलचे हृदय दाबाने फाटले गेले. त्याच्या तोंडातून रक्ताचा फवारा उडाला. आणि तो मृत झाला. सकाळीच त्याचा अग्नीसंस्कार केला गेला. त्यावेळेस हजर राहून मी लोकांना विचारले, ''याला काय झाले! पण कुणीही काही उत्तर देऊ शकले नाही. फक्त 'मेला' एवढच सांगू शकले.

मी एका शत्रूच्या मृत्यूने खुश होतो. माझा मारणप्रयोग सफल झाला त्यामुळे माझा आत्मविश्वास आणि उत्साह वाढला.

माझा दुसरा नेम होता गोपाल टंडनवर! ज्याच्या विरुद्ध मी केस लढीत होतो. कर्णपिशाचीनीद्वारा, मला समजले होते की, गोपालने बलात्काराच्यावेळी माझ्या पत्नीचे खूप हाल केले होते; तिला घायाळ केले होते, त्याला मारण्याची योजना मी आखली. दुसऱ्या दिवशी त्याच्या दुकानात गेलो. त्याला विचारले, ''गोपाळ! मला ओळखलेस का!'' तो लुच्चा व धूर्त होता. त्याने बारीक डोळ्याने पाहून मला म्हटले, ''ओ हो! वकिलसाहेब तुम्ही! तुमची आणि ही दशा! तुम्हाला तर मी ओळखलेच नाही! बसा, बसा'', असे म्हणून तो लबाडीने हसला. मी विचारले, ''गोपाल तुला परस्त्रीच्या शीलाबरोबर खेळायला खूप आवडते ना?'' त्यावर तो जरासा अडखळून मला म्हणाला, ''वकिलसाहेब! माझ्याविषयी तुमचा गैरसमज झाला आहे किंवा तुमच्या पत्नीच्या मृत्युमुळे तुमची बुद्धी भ्रष्ट झाली आहे.''

मी त्याला सांगितले की, ''होय, तू म्हणतोस तसा मी बुद्धीभ्रष्ट झालो आहे आणि तेव्हाच तुझ्या मृत्यूचा संदेश द्यायला आलो आहे. तू खूप भाग्यवान आहेस. तुझ्या मृत्यूची बातमी तुला चार दिवस आधी मिळत आहे.''

त्याने खोटे हसून सांगितले, ''खरोखर! तुमची तब्येत बरोबर नाही. हे ५० पैसे घ्या; चहा-विडी घ्या, थोडा आराम करा आणि इथून स्थलांतर करा. ज्यामुळे तुम्हाला तुमच्या जुन्या मित्राची आठवण येणार नाही.'' मी त्याच्या हातातील ५० पैसे घेताना त्याच्या मनगटावरील केस एका झटक्यात खेचून घेतले.

मध्यरात्री स्मशानात एक लहान खड्डा खणून त्यात घुबड, आणि कावळ्याच्या पंखामध्ये गोपाळचे केस ठेवले. स्मशानातील जळलेली लाकडे एकत्र करून, त्यात ठेवून खड्डा बुजवला.

त्याच्यावर खैराच्या लाकडाचा अग्नी प्रज्वलित करून कपालीभैरवाचे आवाहन केले. कपालीभैरवाला आदेश दिला की, ''माझा वैरी गोपाल टंडन इथून उत्तर

दिशेला रहातो. त्याच्या घराचा प्रवेश पूर्वेला असून त्याच्या आईचे नाव 'किशोरीदेवी' आहे. त्याला मानसिक आघात करून, घोर पीडा देऊन आजपासून चौथ्या दिवशी त्याला मारून टाका.'' असे सांगून त्याचे आवाहन पुरलेल्या केसात उतरविले. गोपालच्या केसाचे माध्यम पकडून, कपालभैरवाने आपले काम सुरू केले; बरोबर कर्णपिशाचीनीला रवाना केले.

गोपाल एकदम झोपेतून दचकून जागा झाला. त्याच्या शरीरातून दुर्गंधी येऊ लागली. तो आंघोळ करण्यासाठी बाथरूममध्ये गेला. तेथे बाथरूमच्या भिंतीवर रक्ताचे डाग व फरशीवर ताज्या मांसाचे तुकडे विखुरलेले होते. ते दृश्य पाहून तो घाबरून किंचाळत बाथरूममधून धावत स्वतःच्या खोलीत गेला; त्याने पत्नीला उठवले. त्यांचा पांढरा फटफटीत पडलेला चेहरा पाहून ती स्तब्ध झाली. त्याने कसेबसे बाथरूमकडे बोट दाखवून सांगितले की, तिथे कुणाचा तरी खून झाला आहे. तिने बाथरूममध्ये जाऊन पाहीले तर तिथे काहीच नव्हते. ती त्याला म्हणाली, ''तुम्हाला वाईट स्वप्न पडले असेल.'' त्या रात्री तो झोपू शकला नाही. सकाळी उठून तो बाहेर गेला; परंतु वाहने अंगावर येतील म्हणून खूप भिऊ लागला. रस्त्यावरील वळण पार करायलाही त्याला खूप वेळ लागला. संध्याकाळी दुकानात न पोहोचता तो गंगाकिनारी वेड्यासारखा भटकत होता. तहानभूकेचे त्याला भान नव्हते. गंगाकिनारी पसरलेल्या गवतावर तो बसला. तंद्रीतच मुठभर गवत खेचून घेतले. त्याचबरोबर रक्ताचे थेंब त्यातून टपकू लागले. ते पाहून तो किंचाळून बेशुद्ध पडला. त्याच्या घरी शोधाशोध सुरू झाली, दुसऱ्या दिवशी सकाळी तो बेशुद्धावस्थेत गंगाकिनारी सापडला. त्याला घरी आणले. संबंध दिवस तो बेभान अवस्थेत बडबडत होता. संध्याकाळी त्याला ताप भरला व त्याच्या शरीरातून दुर्गंधी येवू लागली. दुर्गंधीमुळे त्याच्या घरातील वातावरण खराब व भयानक वाटू लागले. घरची माणसे दुर्गंध सहन करूनही त्याची सेवा करीत होते.

मध्यरात्री भयानक किंकाळी मारून तो एकाएकी उभा राहीला. त्याची पत्नी घाबरून उठली. त्याचे आई-वडील, भाऊ सर्व धावत आले. तो सर्वांकडे वैरभावनेने पाहू लागला. रागावून त्याने स्वतःच्या चेहऱ्यावर नखाने ओरखडा ओढला. त्यातून रक्त आलेले पाहून तो जास्तच गोंधळला. त्याने स्वतःच्याच हाताने अनेक ठिकाणी ओरबाडून स्वतःचे मांस काढले. रक्ताच्या धारांनी त्याचे सर्व शरीर माखून गेले. त्याच्या घरातील माणसांचे सर्व उपाय व्यर्थ ठरले; त्याच्या आसपासच्या लोकांनी त्याला दोऱ्यांनी बांधून टाकले. बांधलेल्या अवस्थेतही तो सर्वांवर गुरगुरत होता दांत-ओठ खात होता.

तिसऱ्या दिवशी त्याच्या संपूर्ण शरीरातून असह्य दुर्गंधी येऊ लागली; त्यामुळे त्याच्याजवळ जायची कुणाची हिंमत होईना. गोपाल स्वतःची असहाय्य स्थिती विवशतेने पहात होता. शरीरातील तापामुळे त्याचे रक्त डोळ्यात उतरले होते. संध्याकाळी त्याच्या कुटुंबियांनी दोघा तांत्रिकांना आणले; त्यांनी आपल्या विद्येने सांगितले की, हे कुणा शक्तीशाली माणसांनी केलेली भूतबाधा आहे, ती दूर करण्यास संबंध रात्र उपाय करावे लागतील. गोपाल त्यांना काही सांगण्याचा प्रयत्न करीत होता; परंतु मानसिक अस्थिरतेमुळे सांगू शकत नव्हता.

तांत्रिकांनी धूप लावून दुर्गंधी दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मंत्रोचार करून पाणी गोपालवर शिंपडले. त्याला वाटले, त्याच्या अंगावर रक्त शिंपडीत आहेत; त्यामुळे तो अधिकच वेडा झाला. 'बंद करा', 'बंद करा'. सांगू लागला. तांत्रिकांना समजले, पाण्याच्या शिंपडण्याने गोपालमधील भूताला त्रास होत आहे. त्यानी परत पाणी शिंपडले.

गोपालच्या त्रासाला सीमा राहीली नाही. क्रोधामुळे त्याच्या डोळ्यातून रक्त वाहू लागले. ते पाहून तांत्रिकाची हिम्मत खचली. त्यांनी अर्धवट प्रयोग टाकून पलायन केले. रात्री शेवटच्या प्रहरी त्यांच्या रोमारोमांतून दुर्गंधीयुक्त रक्त वाहू लागले. सर्वत्र रक्त जमून सुकून गेले. चौथ्या दिवशी सकाळी मात्र त्याच्या अंगात खूप शक्ती संचारली. त्याने दोरखंड तोडून टाकले. टपकणाऱ्या रक्ताला थांबविण्यासाठी त्याने स्वतःच्या नखाने ओरखडा ओढून शरीराला चिरले. त्याचवेळेस मी कपालभैरवाला त्याच्या रक्ताचे शोषण करण्याचा आदेश दिला. गोपालचा रक्तस्राव थांबला असे वाटून थोडे समाधान वाटले. सर्व रक्त शोषल्याने रक्तहीन देह सुक्या पानासारखा जमिनीवर पडला. अशारितीने माझा दुसरा शत्रू संपला.

माझी तिसरी शिकार होती वीरेंद्र मेहरा. नकाशा बनवण्याचे काम तो करायचा. त्याला एका सेकंदात मी मारू शकत होतो. पण त्याला त्याच्या कुकर्माची आठवण रहावी म्हणून भेरूमल, गोपाल टंडनसारखे त्याला मारायचे ठरवले.

रात्री चंडभैरवाचे आवाहन करून त्यांना वीरेंद्र मेहराची माहीती, नाव, रहाण्याचे ठीकाण देऊन त्याच्या बुद्धी व मनावर कब्जा करायला सांगितले; व नपुंसक बनवायला संगून नंतर मी सांगेन त्याप्रमाणे मेहराला करायला भाग पाडायला सांगितले. त्याबरोबर कर्णपिशाचीनीला त्याची माहीती आणून द्यायला सांगितली.

वीरेंद्रने या सर्वांना माझ्याविरूद्ध उत्तेजित करून माझ्या पत्नीवर बलात्कार करायला सांगितला. बलात्काराद्वारा त्याने त्याच्या शक्तीचे प्रदर्शन केले होते. त्यांची योजनासुद्धा सफल झाली होती. परंतु त्याचा परिणाम इतका भयानक होईल याची त्यांना जरासुद्धा कल्पना नव्हती.

चंडभैरवाचा प्रभाव वीरेंद्रावर काम करू लागला. त्याच्या शरीरात अशक्तपणा, बेचैनी निर्माण झाली. लघूताग्रंथीने पीडा होऊ लागली. ४-५ दिवसानंतर माझ्या मनाप्रमाणे जेव्हा त्यांची परिस्थिती झाली तेव्हा त्याला भेटण्याचा मी निर्णय घेतला.

दुसऱ्या दिवशी मी त्याच्या ऑफीसच्या कंपाउंडमध्ये वाट पहात उभा राहीलो. संध्याकाळी तो घरी जायला निघाला तेव्हा त्याला अडवून मी विचारले, ''काय वीरेंद्र! तुझी तब्येत कशी आहे?'' त्यावर माझ्याकडे तो साशंकतेने पाहू लागला. मी म्हटले, ''काय! जुनी ओळख विसरलास!'' त्यावर त्याने मला ओळखले व म्हणाला, ''अरे तुम्ही! आणि या वेषात कसे!'' मी हसून म्हणालो, ''माझे जावू दे, तुझी तब्येत बिघडली आहे असे ऐकले, तू नपुंसक झाला आहेस!'' त्यावर रागावून तो म्हणाला, ''माझ्यासंबंधी चर्चा करण्य तुम्हाला अधिकार दिलेला [illegible] अफवा पसरवून तुम्ही माझे शकत नाही.'' मी म्हणाला, माझ्या खासगी जीवनाची विल्हवाट


(पृष्ठ क्र. ६७ वर)

# तुमचं नशीब तुमच्या हातात

(मागील अंकावरून)

–पंडित ग. रा. सावंत

**हृदयदर्शन!**




हृदयरेषा गुरुग्रहस्थानावरं किंवा त्या स्थानाच्या आसपास उगम पावून तशीच पुढे, शनि, रवि यांच्या ग्रहस्थानावरून पुढे येऊन बुधग्रहस्थानाच्या टोकाशी स्थिरावते. ही रेषा सामान्यपणे खोल व मधुपिंगट रंगाची असणे अतिशय चांगले. या रेषेवरून व्यक्तीचा, स्वभाव व प्रेमळपणा याचे ज्ञान होते.

हृदयरेषा हातावर नाही असा हात सहसा पाहण्यात येत नाही. जर ही रेषा हातावर नसेल तर मनुष्य अतिशय कठोर, निर्दयी स्वभावाचा असतो. अशी व्यक्ती अतिशय स्वार्थी वृत्तीची असून स्वार्थासाठी कोणतेही कृत्य करावयास मागेपुढे पाहणार नाही.

हृदयरेषा बोटांच्या जवळ असेल तर ती व्यक्ती ईर्ष्यावान व जबरदस्तीने एखादी वस्तू घेणारी सुचविते.

ही रेषा लहान असेल तर व्यक्ती स्वार्थी असते. हृदयरेषा गुरुच्या उंचवटयाखालून किंवा बाजूने जात असेल तर ती व्यक्ती विषयी असून एखादा गुन्हा किंवा अपराध करू शकेल.

ज्या हातावर हृदयरेषा नसेल ती व्यक्ती हृदयरोगी, लफंगी, पापपुण्याची चाड नसणारी, कठोर स्वभावाची व अल्पायुषी असते.

हृदयरेषेतून एक रेषा निघून चंद्रग्रहस्थानावर जाऊन मिळत असेल तर व्यक्ती खुनी व घातकी असते. अशा व्यक्तींना विरोध करणे चूक असते.

ही रेषा बुधाच्या खाली मंगळाच्या उंचवटयावरून निघून गुरु व शनिग्रहस्थानाकडे जाणारी व मस्तकरेषेला मिळणारी असेल तर आकस्मिक मृत्यू होतो.

हृदयरेषा व मस्तकरेषा यात कमी अंतर असेल तर व्यक्ती द्वेषी, दुष्ट व पैसा खाणारी असते.

फार लाल रंगाची अंत:करणरेषा कठोरता व दुष्टत्व यांची द्योतक असते.

अंत:करणरेषा पिवळ्या रंगाची असून, गुरुग्रहस्थानी जीवनरेषेवर यवचिन्ह असेल तर व्यक्तीला फुप्फुसविकार व कफक्षय होतो.

अंत:करणरेषा शनिग्रहस्थानावर जात असेल व ती शाखायुक्त नसेल तर मनुष्य अल्पायुषी असतो. तो स्त्रियांवर विश्वास ठेवत नाही.

ही रेषा शनिग्रहस्थानावर थांबत असेल तर व्यक्ती अप्रामाणिक, असंतुष्ट, विषयी, निष्ठूर व कृतघ्न असते.

हृदयरेषा अस्पष्ट होऊन गुरु ग्रहस्थानावर जात असेल तर ती व्यक्ती स्वार्थी व लोभी असते.

ही रेषा गुरुच्या बोटाकडे गुरुस्थानावरून जात असेल तर ती व्यक्ती सदाचारी असते.

अंत:करणरेषेतून एक रेषा निघून आयुष्यरेषेवर जात असेल तर अधिक प्रिय व्यक्तीचा मृत्यू सुचविते.

गुरुग्रहस्थानाजवळ या रेषेला एक किंवा दोन शाखा असल्या तर व्यक्ती भाग्यवान, परिश्रमी, स्त्री व मित्र यांच्याशी प्रेमव्यवहार ठेवणारी असते व वृद्धपणात अशा व्यक्तीला सुख श्रीमंती प्राप्त होते.

शाखाहीन हृदयरेषा प्रीतिशून्य, निष्ठूर व स्त्री द्वेष्टी अशी व्यक्ती दर्शविते.

हृदयरेषेवर चौकोन असल्यास प्रेमाच्या दु:खापासून व शारीरिक दु:खापासून संरक्षण होते.